मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.


सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

जाने.२००३ ते डिसें. २००३ वर्ष, ५४ वे

मूल्य : पंचवीस रुपये

संपादक : डॉ. सुलभा हेर्लेकर

कार्यकारी संपादक : केशव जोशी

अनुक्रम

पत्रव्यवहाराचा पत्ता संपादक, युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल,

झाशीराणी चौक, सीतावर्डी, नागपूर - १२, दूरध्वनी : २५२३९२९

प्रकाशक : सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ नागपूर - १२

मुखपृष्ठ मांडणी : शैलेप देशपांडे, नागपूर

रेखाचित्र (युगवाणीतुन पुर्नमुद्रित) : संजय धोतरकर, नागपूर

संपादकीय

'युगावाणी ' चा हा वार्षिक अंक रसिकांच्या हातात ठेवताना आम्हाला आनंद होत आहे. युगवाणी चे अंक अनियमित झाले तरी वाचकांना 'चांगले' देण्याची तयारी, हा पूर्वीपासूनचाच आमचा विश्वास आहे. वाचन संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी आणि वाचकांची अभिरुची वाढावी, सुजाण, जागृत वाचकांनी कृतिशील व्हावं, वाङ्मयीन संस्कृतीच्या संवर्धनाचे कार्य करावे हाच युगवाणीचा उद्देश आहे.

सामान्य माणसाचं जीवनच उद्ध्वस्त व्हाव अशी परिस्थिती आजूबाजूला आहे. रोज घडणाऱ्या घटना, शिक्षण क्षेत्रातही आलेली अराजकता, आणि भ्रष्टाचार यातून सामान्य वाचकही सुटला नाही. अशा परिस्थितीही युगवाणी त्यातल्या साहित्याद्वारे काही चांगले देऊ इच्छिते. कलावंताच्या आकलनाविषयी किंवा एकूणच जीवनातील संघर्षाविषयी वाचकाना कुतूहल वाटत आले आहे. या अंकात प्रसिद्ध कथाकार 'शांताराम' (के. ज. पुरोहित) ह्यांच्या साहित्यावर घेतलेल्या चर्चासत्रातील महत्त्वपूर्ण लेखांचा समावेश आहे. अस्थिर जीवन आणि या सर्वातून घडत असलेला 'माणूस' त्यांच्या साहित्यातून प्रतीत होतो. डॉ. आशा सावदेकर ह्यांच्या लेखातून शांतारामांच्या कथाविश्वाचे आपल्याला सखोल दर्शन होईल, तर डॉ. रवींद्र शोभणे ह्यांनी शांतारामांच्या कथातून स्त्री-पुरुष चित्रणांवर भर दिलेला दिसेल. शांतारामांच्या ललित वाङ्मयावर डॉ. किशोर सानप यांनी संपूर्ण ललित वाङ्मयाविषयी उहापोह करून शांतारामांच्या ललित वाङ्मयावर एक वेगळाच प्रकाश टाकलेला आहे. स्वतः शांतारामांनी महेश एलकुंचवारांच्या नाटकांवर लिहून ते कसे वेगळे आहे याचे स्पष्टीकरण त्यांच्या नाटकाद्वारेच दिलेय. एकूण शांताराम ह्या जाणकार साहित्यिकाविषयी वाचकाला त्यांच्या लेखनाचा एक सलग प्रवास पाहता येईल. या दृष्टीने या अंकाचा पूर्वार्ध आहे. तर यंदा अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलनाच्या अध्यक्षपदी अविरोध निवडून आलेले प्रा. रा. ग. जाधव यांचेवर प्रा. वसंत आवाजी डहाके, प्रा. डॉ. ज्योती लांजेवार आणि डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी त्यांच्या संपूर्ण वाङ्मयावर समीक्षापर लेखन केले आहे. रा. ग. जाधव यांचे आम्ही मनापासून अभिनंदन करतो.

अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलनाचे अविरोध निवडून आलेले माजी अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर आणि यंदाचे अविरोध निवडून आलेले प्रा. रा. ग. जाधव या दोन्ही मान्यवरांच्या निवडक कविता हे या अंकाचे आकर्षण ठरावे. अविरोध निवडून आलेल्या अध्यक्षांनी एकत्र यावे हा आणखीन एक चांगला योग जुळून आला आहे.

युगवाणीवर वाचकांचा लोभ आहेच. तो असाच वृद्धिंगत व्हावा - हीच या नववर्षाच्या सुरवातीला अपेक्षा !

- सुलभा हेर्लेकर

अनुक्रमणिका

शांतारामांचे कथाविश्व

◗ डॉ. आशा सावदेकर

नवकथा, तिचा काळ आणि संदर्भ तपासून पाहू गेले तर आज वेगवेगळे निष्कर्ष हाती येतील. सूक्ष्मपणे विचार करता नवकथाकारांनी कथेला अनुभवगर्भ वनविले. गंगाधर गाडगीळांनी वापरलेले उदाहरण देऊन म्हणावेसे वाटते की घड्याळ पुढून वेळ दाखवते पण त्यातील जटिलता कळते ते दुरुस्त करण्यासाठी मागून उघडले म्हणजे. नवकथेने अनुभवाची जी रूपे दाखविली ती तशीच व्यामिश्र म्हणून अपूर्व होती; ती माणसा - माणसांच्या संबंधाचा वेध घेणारी होती. म्हणूनच साचेबंदपणावर प्रहार करणारी होती. शब्दचित्रे, व्यक्तिचित्रे आणि ललित निबंध कथेमध्ये मिसळू लागले. कोणतेही मर्यादित झापडबंद तत्त्वज्ञान न स्वीकारता विनीचे नवकथाकार गाडगिळांनी तरल अनुभूतीही टिपली आणि क्षुद्रतेचा उपहासही केला. अरविंद गोखले यांनी आत्यंतिक व्यक्तिवादी भूमिका टाळून पराभूत आणि एकट्या माणसाची चित्रे कौटुंबिक पार्श्वभूमीसह रंगवली. पु. भा. भावे यांनी जीवनाची जाण समृद्ध करण्यासाठी भावनेची उत्कटता, तीव्रता यातून कथेला एकाचवेळी मूल्यनिष्ठ बनवले आणि प्रवाहीही. व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या धारणा ओळखल्या आणि सूक्ष्म निरीक्षण व वास्तवाभिमुखतेतून मातीची

अनुक्रमणिका

माणसे जिवंत केली. या कुठल्याही अभिनिवेशी तत्त्वाकडे न जाता आपल्या काळाचे भान ठेवून आणि वैदर्भीय चोरघडे आणि कुसुमावती यांचे कथावळ वेचून कथाकार शांतारामांनी आपले खरे कथालेखन 'शिखा' या संग्रहापासून केले. स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला प्रमाण मानून माणसाचे माणूसपण वेगवेगळ्या कोनांनी न्याहाळत राहणे, अभिनिवेश आणि आग्रह टाळणे या वृत्तीतून प्रतीक - प्रतिमांच्या वेगळ्या विश्वातून त्यांनी आपल्या भूमीच्या गर्भातून खोलवरचे रस शोषून घेतले. विषयाचा साचेबंदपणा झुगारणे, भावनाविवशता टाळणे, मानवी मनाच्या गुतांगुतीच्या डोळ्याला डोळा भिडवू पाहणे, हे सारेतर गाडगिळादि नवकथाकरांनी केलेच पण स्वतःची अनुभव वेचण्याची शक्ती आजमावण्याच्या या नवप्रवाहात माणसामाणसातील अभेद्य अंतर आणि मनाच्या गूढतेबरोबरच समाजातील गूढांचा अंधार यांचा एक वेगळा शोध शांताराम यांनी चालविला. गंगाधर गाडगीळ म्हणाले होते त्याप्रमाणे '' भाषेचा केवळ वर्णनात्मक (descriptive) उपयोग न करता सूचक (evocative) उपयोग'' नवकथेने केला. प्रतिमा आणि भाषा अनुभवाचा भाग बनून अवतरणे हे गंगाधर गाडगिळांइतक्याच तोलाने पण वेगळ्या दिशेने करु पाहणारे कथाकार म्हणजे शांताराम होत.

व्यक्तिचित्रे, शब्दचित्रे केवळ वर्णनात्मक असतात तर कथा पात्र व परिस्थिती यातील बदल आणि मानसिक बदल यावर लक्ष केंद्रित करीत असते याच्या नेमक्या भानामुळे कुसुमावतीबाई यांची चिंतनशीलता आणि वामनराव चोरघडे यांची कलास्पर्श व भावस्पर्श यांना महत्त्व देण्याची वृत्ती यांचे अद्‌भुत संपृक्त रसायन शांतारामांना घडवता आले. पु. भा. भावे यांनी ते करू पाहिले पण दुर्बोधता - अश्लीलता यांच्या चिडीने त्यांना करता आले नाही ते कुठलाही अभिनिवेश न बाळगता शांतारामांनी केले. कथेची सूक्ष्मता आणि व्यापकता, अनुभवांची तरलता आणि मन मोडून पडेल अशी विखारीधार दोन्हींचा सुवर्णमध्य त्यांना गाठता आला.

नवकथेने पात्रांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि मनाच्या सुसंगतीची कल्पना आंतरिक वास्तवाच्या दिशेने खेचली; जाणीव - नेणीव यांच्या क्षेत्रात संचार केला आणि वातावरणाला पात्रनिर्मितीच्या सहभागाची आकृती दिली हे सारे शांतारामांनी आपल्या पिंडधर्मानुसार स्वीकारले. कथन, वर्णन, संवाद आणि भाष्य यांचे स्थान कथेनुरूप बदलते याची जाणीव ठेवली आणि उपरेपणाचे भास न होतील अशी योजना करण्याचे सामर्थ्यही प्रकट केले.

विशिष्ट भाषारूपाची निवड, भाषाशैलीचा वापर, कथेकडे पाहण्याची दृष्टी, निवेदन यानुसार कथेचे रूप निश्चित होत असते. हे जाणून भाषेचा स्तर त्यांनी सांभाळला. गाडगिळांनी एकाकीपणाची जाणीव आपल्या कथेतून वारंवार चितारली. शांतारामांच्या कथेतील एकाकीपण कधी माणसामाणसातील विसंवादातून वाट्याला येते उदा १)

'अपेशी' मधील रमाबाई या वृद्धेचे चित्रण. कुटुंबासाठी खस्ता खाणे हेच तिचे जीवन. तिला अनुभव येतो ''एका भयंकर वेगानं धावणाऱ्या गाडीच्या चाकात हात घालून ती आपण अडवण्याचा प्रयत्न करीत आहोत - निष्फळ प्रयत्न करीत आहोत कशाला देवानं आपल्याला इतकी शक्ती दिली, आसक्ती दिली, शक्ती दिली ? कशाला मला दुर्भाग्याला प्रेमाचं ममतेचं इतकं ओझं दिलं की ते धड सांभाळताही येत नाही अन् वाटताही येत नाही.'' कधी माणसाचे सुप्त मनच त्याला एकाकी ठेवत असते, कधी एखाद्या कोंडीत अडकून गृहिणीची वाट अडवून एकाकीपण उभे असते. उदा. २) 'चंद्र माझा सखा' मधील चित्रणे व्यक्तींची असतात पण म्हणून ती केवळ व्यक्तिनिष्ठ नसतात. तो केवळ स्वगताचा भाग नसतो. तिथे व्यक्ती व समाज यामधील ताण अंतर्भूत असतो. उदा. 'मावशी' या कथेतील रन्नूचे मनोविश्वदर्शन. व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधातूनच कथेचा ताणा - वाणा ठरत असतो. उदा. ३) 'वहिणी' या कथेतील सुमनचे अंतर्मन तिला विमलवर रागवायला लावते आहे तर तिच्या भोवतालचे ताण तिला आईवडिलांचे ओझे कमी करायला सांगत आहेत. पारंपरिक मूल्यव्यवस्थेच्या चौकटीत कोंडली गेलेली स्त्री कधी कधी अनेक अर्थाने पांगळी होऊन जाते. उदा. ४) 'सामर्थ्य' मधील वामनरावांची पत्नी. व्यक्तीच्या बदलत्या मनोवृत्तीचा अनुबंध सामाजिक स्थितीगतीशी असतो. आपली क्षुद्रता जाणवल्यामुळे वामनराव जगावर, ऑफिसवर, भोवतालच्या माणसांवर चिडले आहेत. डबा खाल्ला नाही म्हणून बायकोही फैलावर घेते. मग वामनराव चिडतात, ताट फेकतात, बायकोला गप्प बसायला सांगतात. पुरुषी बळाने खेचत नेऊन रानटीपणाने तिच्यावर बलात्कार करतात. लोळागोळा झालेली बायको या उद्दाम, क्रूर वागण्याने अर्धमेली झालेली असते पण त्यातून वामनरावाला शक्तीचा, बळाचा प्रत्यय येतो. उन्मादात, गुंगीत बडबडत झोपी जातात. समकालीन जीवनव्यापाराची असंगती, असंबद्ध रूपे मानवी जीवनाच्या विपरीततेचे भान देतात.

कधी हेच दर्शन काव्यात्म रूपात घडते. ५) 'रात्र' या कथेत कायदेपंडित श्रीपादराव काळे यांना झोप येत नाही. त्यांना जाणवणारे आभाळाच्या सुंदरतेचे गहिरेपण कुणीतरी समजून घ्यायला हवे होते. बायकोकडून साधे चार शब्द हवे होते. आवडते पदार्थ करूनही श्रीपादरावांना ते कळत नाही, कोटावर गुलाबाचे फूल लावले तरी त्यांच्या लक्षात येत नाही म्हणून बायकोही काहीतरी हरवल्याच्या दुःखाने झोपू शकत नाही. घरात चोर आल्यामुळे सगळे जागे होतात. काही गेले नाही म्हणून श्रीपादराव बायकोला खूण करून बाहेर पडतात. तिला चंद्र सुंदर दिसतो तर पतीला सावल्याही सुंदर वाटतात. मग एकात्म प्रत्यय येतो ''ही रात्र फार सुंदर आहे !''

शांतारामांच्या ६) 'खार' ७) 'शिखा' ८) चंद्र माझा सखा' या कथांमधील

भावविश्व तरल, तलम आणि सूक्ष्म आहे. त्या कथांची भाषा वर्णनात्मक नव्हती तर सूक्ष्म होती. शब्दांच्या साह्याने ''वाचकांच्या मनाची कळ दाबून त्याच्यावर इष्ट ते संस्कार करण्याचे सामर्थ्य तिच्यात होते. तीमध्ये साचेबंदपणा नव्हता.

अनुभवावर भर देणे, अनुभवाचा नवा अन्वयार्थ साकार करणे यावर शांतारामांची कथा लक्ष केंद्रित करते. ललित्याचा बंध आणि मध्यवर्गीय जीवनातील नीतीचे तारतम्य यातून ९) 'लाटा' सारखी कथा फुलते. ती मधील पात्रचित्रणाइतकेच महत्त्व प्रतिमासृष्टीला असते विशिष्ट भावावस्था आणि व्यक्तिचित्रण यांचा समन्वयच जणू तेथे सूचकतेने, हळुवारपणे व संयमाने साधल्या गेलेला असतो.

चित्रपटसृष्टीत नाव कमावू पाहणारा तरुण प्रकाश हा 'लाटा' चा नायक. कथेची सुरुवात स्वप्नाने होते. जाग येते ती बायकोच्या आवाजाने. 'नकोसा झालेला तो आवाज ऐकताच वाटलं की आपल्या अंगावर लपेटलेली मऊ मऊ शाल कुणीतरी टरकन् फाडली आणि आपल्या कोवळ्या कातडीला खरचटून काढलः त्याला वास्तवाची जाणीव होते ती विशेषणांच्या मालिकेतून. ''आपल्या एकेरी खोलीत.... तिमजली खुराड्यातल्या एका कुबट कप्प्यात बसला होता आणि त्याच्यासमोर वाळून खोड झालेली, पिचलेली निःसत्त्व निर्मला ऊभी होती.''

प्रकाशचे दुःख आपल्या गुणांची कदर झाली नाही हे आहे. बरोबरीचे कित्येकजण किती तरी पुढे निघून गेले. आपल्याला शहाणपण शिकवू लागले. त्याला प्रश्न पडतात ''आपण किती दिवस असे रखडणार? की सदैव रखडणार?'' तो समुद्रावर जातो. त्याला घडणारे दर्शन हाच कथेचा महत्त्वपूर्ण भाग.

''पाणी दूरवर आत गेलं होतं. सारखं आत चाललं होतं. मेहाचे चट्टे पडलेल्या कातडीसारखा किनारा विद्रूप दिसत होता. रोग उमटून यावा तशा सगळी घाण, केरकचरा वर ऊसळून आला होता व कावळे त्यावर टोच मारत होते.'' फिरणाऱ्या बेफिकार हौशी स्त्रीपुरुषांकडे पाहून तिरस्काराने त्याचे मन वेफाम झाले. त्याला वाटले - ''इथे रूपाचा बाजार मांडला जात आहे. त्यात लाज नाही, संकोच नाही, संस्कार नाही.'' तो वाळूत पडून दुःख हलके करतो. एकदम समुद्राचे रूप बदलते. त्याचे कण्हणे संपते. 'त्याचा धीरगंभीर नाद' जवळ येऊ लागतो. प्रकाशचे मन उजळते. इथे प्रतिमासृष्टीतून प्रकाशच्या मनाची हालचाल बदलते, हे सूचित केले गेले आहे. विशिष्ट अनुभवातून सामाजिक वास्तवाचा, घटितांचा अन्वयार्थ ध्वनित होणे, व्यक्तीच्या चित्रणातून सहज सामाजिकता साकारणे हे नवकथेने, तिच्या काळाने आणि संस्काराने दिलेले सामर्थ्य आहे. हीच कथेची मूल्ययुक्तता ठरते. व्यक्ती व तिचा विचारव्यूह यातील बंदिस्त नात्यापेक्षा आतून बाहेर धावणारे व्यक्तीचे अंतरंग ध्वनित होणे हे महत्त्वाचे. पात्रांच्या संवेदनांद्वारे मानवी मनाची

अतर्क्यता आणि संदिग्धता सूचित करणे हे शांतारामांच्या कथेचे मर्म आहे.

त्यासाठी जी भाषा स्वीकारली जाते, ज्या शैलीतून हे सारे मन आपल्यासमोर येते हीही तितकीच महत्त्वाची असते. ती फक्त काव्यात्म तरल अशा कथांमध्ये प्रभावी ठरते असे नाही तर कथेच्या पिंडधर्मानुसार येणाऱ्या प्रतिमांच्या घडणीतून माणसांच्या अनुभवाच्या मूळ सत्त्वाला स्पर्श करण्याची दुर्मिळ वृत्ती शांतारामांमध्ये आहे. नवकथेच्या आसपास लेखनाला सुरवात करून सतत आत्मभावाने स्वतःला उजळत जोखत राहून विकासोन्मुख होणारा असा हा कथाकार आहे. भावजागृती आणि उत्कटता यांचा वेध घेता घेता स्त्रीच्या सूक्ष्म मानसप्रश्नांमागील अस्वस्थतेवर नजर खिळविणे त्यांना साधले आहे. हा गाभा एकसंस्कारी भासला तरी त्यात अनेक स्पंदनाची लय एकवटलेली आहे. सूक्ष्म भावोत्कटता, आत्यंतिक तरलता आणि चढा सूर न लावताही काळीज कापीत जाणारी जाणीव यांनी त्या कथा - समर्थ बनविलेल्या आहेत. त्या कथा फक्त स्थळकाळाशी अथवा भोवतालच्या वातावरणाशी बांधलेल्या नाहीत, तर काळ ओलांडून जाणाऱ्या ठरल्या आहेत. कारण त्यातील जीवनानुभूती ही मनाच्या सगळ्या बेड्या तोडून टाकण्याच्या निर्धाराची म्हणूनच स्वातंत्र्याच्या आंतरिक जाणिवेची आहे. ती जणू काय दीर्घ पण भावोत्कट अशी स्वगते आहेत. स्वत्वाने भारलेली, आत्मनिष्ठेने संपृक्त बनलेली आणि सूक्ष्म तरलता व वटवटीत व्यावहारिकता यातील भेदाने व्याकुळलेली अशी ती मनोगते आहेत. त्यांना रूप लाभले आहे आत्मसंवादाचे आणि त्यातून प्रकटतो आहे तीव्र होत जाणार विसंवाद. म्हणून तशा कथा एका अंगाने भावना भेटवतात आणि दुसऱ्या अंगाने विलक्षण धारदार अनुभवाला सन्मुख करतात. शांतारामांच्या 'शिखा', 'चंद्र माझा सखा' या अशा कथा आहेत. एका साध्याभोळ्या दुबळ्या स्त्रीला अपार्थिवाच्या ओढीने देहाला सौंदर्याचे डोळे फुटतात, चांदण्यांच्या सुंगधाने ती भारून जाते पण पार्थिव जगाच्या संशयाचे दर्शन पतीच्या डोळ्यातून होताच खिडकीच्या चौकटीत निबद्ध असा चंद्राचा चेहराही खडबडीत दिसू लागतो.

माणूस म्हणून माणसाला ओळखता ओळखता त्याचे मन शोधत जाण्याची किमया महत्त्वपूर्ण अभिव्यक्तीतून करून शांतारामांनी कथेला एक वेगळा घाट दिला. १०) 'मावशी' या कथेत दोन बहिणींचेच चित्र आहे जे अभिव्यक्तीच्या सहजतेने एकीकडे मानसचित्र ठरते तर दुसरीकडे समाज, संस्कृती यांची घडणही सूचित करते. जीवनाविषयीच्या सूक्ष्म आणि प्रगल्भ जाणिवा देत 'कल्पनेचा आकार व परिणामकारकता' कथेद्वारे शोधणे हेच कथेचे तंत्र ही गंगाधर गाडगिळांची दृष्टीच या कथेत समूर्त झालेली आहे.

'मावशी' या कथेची सुरुवातच सूचक आहे. रामी आणि रन्नू या ''बहिणींचं नातं ही रक्तानं मारलेली गाठ होती पण नव्या नात्याच्या कात्रीनं ती गाठ जवळ जवळ तोडली होती.'' रामी रन्नूच्या संसारात सवत म्हणून येते, रामी रन्नूची कमतरता पूर्ण करून

बाबूरावला मुले देते, आता रन्नूला मूल होणार आहे आणि तिने रामीला घराबाहेर पडायला सांगितले आहे. त्यातून रामीच्या मनात उठलेले प्रश्नांचे एक वादळच शांतारामांनी उभे केले आहे. हे सगळे प्रश्न रामीच्या जीवनाशी संबंधित आहेत. आदिवासी मुलुखातील धोव्याचा व्यवसाय करणाऱ्या बाबूरावची ती बायको. पण तिचे प्रश्न स्त्रीजीवनातील सार्वत्रिक सत्याला स्पर्श करतात.

''मनाला न पटणारं चांगुलपण दाखवीत जगायचं ? कशासाठी ? लोकलाज, रक्ताचं नातं, घराण्याचं नाव   हे सगळं खरं; पण त्याहून खरं स्वतःचं सुख - फार मोटं नव्हे सामान्य सुख. ते सामान्य सुख तिला सवतीकडून मिळत नव्हतं आणि तिला बाळ झाल्यावर तर मुळीच मिळणार नव्हतं. असं असता माणसांन मन स्वच्छ कसं राखावं ? माणसानं एकाच वेळी रडण्याचे आणि हसण्याचे सूर कसे काढावे ? मनानं एकाच वेळी दोन भावना - सुखाच्या आणि दुःखाच्या भावना कशा सोसाव्या ?''

हे प्रश्न उपरे नाहीत, कळीचे आहेत. हेच ती सोसते तिथे कथा संपते. रन्नू आणि रामीचा नवरा धोवी. म्हणून कथेतील प्रतिमाही त्याशी सुसंगत अशा आहेत. रामी बोलताना बाबूरावच्या चांगुलपणाला 'कच्च्या रंगाचा' म्हणते. आपल्याशी केलेल्या लग्नाचा आणि आपल्याला घराबाहेरचा मार्ग दाखविण्याचा अर्थही तिचा मते - ''एका तळ्यांच पाणी कपडे धुवायला निरुपयोगी झालं म्हणून जसं दुसऱ्या तळ्याकडे वळायचं ...' आपल्यापेक्षा रन्नूची ओढ त्याला का वाटली असावी यावेळी ती - ''वाळंतपणांमुळे खरोखर आपण म्हातारे झालो आहोत. आपलं शरीर अनेकदा फाटलेल्या, पुन्हा जोडलेल्या वाकळीसारखं आहे.'' नवऱ्याच्या वर्तनाबद्दल ती म्हणते, ''कपड्यावर नीळ झोकली आणि वाईट वर्तनावर मऊ शब्द पांघरले की काहीही लपून जातं अशी त्याची समजूत होती.''

''कसली दगडाची जबाबदारी पाळणार आहे ? वेळेवर कपडे परत करण्याची साधी जबाबदारी ज्याला पाळता येत नाही तो कसली जबाबदारी पाळणार ?''

''त्या दोघांनी मजा मारावी आणि आपण कपडे मुकाट्यानं वाहून नेणाऱ्या गाढवासारखं जगावं.''

कथेत येणारे निवेदनही विलक्षण सूचक आहे. विशिष्ट शब्दांची पुनरावृत्ती अर्थाला अधोरेखित करीत राहते. वर्णन आहे रन्नूचे बाळंतपण करणाऱ्या रामीच्या मनोवस्थेचे आणि रन्नूच्या वेणांचे. एका अंधाऱ्या खोलीत दोघींची तडफड - एकीची शारीरिक, दुसरीची मानसिक. एकीची शारीर वेदनांची मूर्च्छा - दुसरीला मानसिक आंदोलनांनी ग्लानी. ''अंधारी खोली, अंधारी भवितव्यता, अंधारे विचार, अंधारलेल्या भावना, कृष्णविचार, कृष्णविकार, काळ्या काळ्या इच्छा.''

रामीच्या अंतर्मनाची तडफड चारदोन फटकाऱ्यांसारख्या शब्दांनी स्पष्ट होते. "ऊशिरा झालेल्या वाळंतपणाला पुष्कळदा वळी लागतो. तसं होईल काय? तसं व्हावं काय ? तो विळा, तो दोरा, तो खड्डा."

विशिष्ट क्रियापदरूपे - झोकली, पांघरले, उरावर नाचवलं, मजा मारावी अशा रीतीने तीव्र होत जात आंदोलनांची गती वाढवतात व वेगळा परिणाम साधला जातो. कथेचे केंद्र हे व्यामिश्ररूप धारण करीत धुळीच्या भोवऱ्यासारखे गरगरत वरवर चढत जाते. जे पूर्ण व्यक्त होत नाही तेच महत्त्वाचे असते. रन्नूला सूड घेणे शक्य होते पण ती तसे करीत नही हे दाखविण्यासाठी एक भासदृश्य येते.

"एकाएकी तो विळा हवेत फिरू लागला आणि त्याच्यावरून रक्ताचे थेंव निथळू लागले. एकाएकी त्या दोऱ्याला पीळ पडला आणि त्याच्या गाठीनं मासाचे लचके तोडले. तो खड्डा छाती भरून आल्यासारखा फुगला आणि हाडं, रक्त, मांस यांनी तो भरून गेला. त्या भयंकर दृश्याकडे पाहून रामीनं किंकाळी फोडली."

लगेच अनुभवाचे अगदी विरोधी असे दुसरे रूप विरोधीधर्मी विशेषणांच्या आधाराने साकारते.

"नुकतंच जन्मलेलं वहिणीचं मूल तिनं हलकेच हातात घेतलं फुलासारखं. त्याचं नाळ वांधलं आणि तोडलं, हळुवार हातानं तिनं ते जमिनीत पुरलं. वाळाला न्हाऊ घालताना तिचं अंग पुलकित झालं. वहिणीचं रक्तानं भरलेलं अंग साफ करताना, तिला धुवारा देताना ती रोमांचित झाली. पणती लावून तिनं हात जोडले. त्यावेळी तिचं हृदय भरून आलं. वावूलालनं मुलाला मध चाटवला त्यावेळी ती आनंदानं रडू लागली."

कथेची आशयात विरघळलेली शैली अनुभवाचे रूप आपल्या डोळ्यापुढे उभे करते. समतोलातून निर्माण झालेली लय आणि विरोधातून साधणारा अर्थप्रसरणाचा आलेख यातून कथेला वेगळे सौंदर्य प्राप्त होते. निवेदनातील उत्तरगर्भ प्रश्न नाट्यात्मता साधतात. यातून वाचकांचे तादात्म्य वाढत असते. एका सर्वसामान्य कष्टकरी स्त्रीच्या माध्यमातून स्त्रीचे दुःख, वेदना आणि तिच्या मनातील वादळे पचवून परिस्थितीला स्वतंत्रपणे सामोरे जाण्याचे वळ शांताराम असे चितारतात. कथेच्या शेवटी तू मला दोन मुले दिलीस हे मी कधी विसरणार नही असे म्हणणाऱ्या नवऱ्याला ती सांगते "दोन नाही, तीन." अंधारातून वाहेर पडून ती 'प्रकाशाच्या पायघड्यांवरून' चालत जाते.

मानवी भावविश्व, मानवी अनुभव आणि वाह्य विश्व यांच्यातील क्रियाप्रतिक्रिया आणि घडणारे स्थित्यंतर म्हणजेच 'कल्चरल क्रायसिस' शांतारामांना नेहमीच मोलाचा वाटलेला आहे. त्या दृष्टीने त्यांची ११) 'देवी' ही कथा मला विशेष मोलाची वाटते. त्याही कथेत पतिपत्नींमधील ताणाचे चित्र आहे. वर्षानुवर्षे अंतर्वाह्य पाहिलेल्या पत्नीकडे वघताना भालचंद्रला ती परकी, अनोळखी भासते. आता तिच्या डोळ्यात 'अशरिरि' भाव

आहेत; 'पारलौकिक चमक' आहे. महाराजांची सेवा, प्रसाद हे तर त्याला प्रिय होते, तिने त्याला साथ दिली होती. आता तिच्या व्यक्तित्वातील तेज, अनेकांच्या शंकांचे निरसन करणे, प्रश्नांची उत्तरे देणे यामुळे त्याला वाटू लागले होते की ती 'जुन्या अर्थानं' त्याची पत्नी राहिली होती का ? त्याचे ओझे आणि भीती त्याला भेडसावते. आपल्याला तिच्याकडून नेमके काय हवे ? ती कशी हवी ? या प्रश्नांची उत्तरे त्याला सापडत नाहीत, मग तो चुटपटत, चाचपडत राहतो.

''साधे, क्षुद्र विनोद, क्षुद्र रुसवे - फुगवे. सामान्य माणसांचे राग आणि लोभ. देहाच्या आणि मनाच्या साध्या, सामान्य हरकती - मुरकती - ते सगळं आता गेलं का? असलं तर त्याची आता शरम वाटते ? एकमेकांना थोडंसे छळत, थोडंसं सुख देत, एकमेकात विरून, जिरून जाण्यात आता कमीपणा वाटू लागला आहे काय ?'' तो अस्वस्थ होतो ते ती आभाळात उडू पाहाते आणि आपण तिला खाली उतरून जमिनीवर 'वळवळायला' लावतोय की काय या विचाराने. रात्री ती स्फुंदताना दिसते. तीही अस्वथ आहे. आपले काही चुकले म्हणून तो आपल्याला टाळतो असे तिला वाटते आहे. ती सांगते- ''लोक माझ्याकडे येतात; प्रश्न विचारतात. त्या प्रश्नांची उत्तरं मला दिसतात. पण केव्हा? तुम्ही दूरदूर जात होतात, तसतशी माझी शक्तीही दूरदूर जात होती. मला सोडू नका. मला टाळू नका. तुमच्या सहवासाची शक्ती जर मला मिळाली नाही, तर'' व्यक्तीच्या बदलत्या मनोवृत्तीचा अनुबंध समाज - संस्कृतीशी निगडित आहे हेच इथे ठसठशीतपणे अधोरेखित होते. सुप्त मनातील असंबद्धतेचे हे दर्शन कधी काव्यात्म रूपात, कधी उद्ध्वस्त रूपात तर कधी चिंतनात्मक पातळीवर कथेत उतरते; नुसते उतरत नाही तर विरघळून जाते आणि आशयाच्या गाभ्याला भिडून कथेच्या संस्काराला मूर्त करते. त्यासाठी प्रतिमा येतात, शैली येते पण कथेतील माणसांच्या मूल्यनिष्ठेचे, सचोटी आणि प्रामाणिकपणाचे रूप अधोरेखित होते.

माणूस म्हणून प्रत्येकाला समजून घेणारी दृष्टी शांतारामांच्या कथेत दिसते. 'मावशी' सारख्या कथेतील दोन बहिणींमधील ताण हा कष्टकरी पातळीवरील होता. मध्यमवर्गीय पातळीवरील ताण तितके टोकाचे नसतात पण असतात. ही जाण, 'बहिणी' सारख्या कथेत दिसते. सुमन ही विमलची मोठी बहिण, मास्तरकी करणारी पण 'धुवून धुवून विटलेल्या वस्त्रा' सारखी दिसते. पाहायला आलेला मुलगा सुमनला पसंत न करता विमलला पसंत करतो आणि कुटुंबातील चित्र थोडे बदलते. वडिलांना ती मोठेपणाने ''विमलचे लग्न ठरवून टाका; माझ्यामुळे तिचं का थांबवायचं असं सांगते.'' पण तिचे अंतर्मन तिला दगा देते. शांत झोपलेल्या बहिणीकडे पाहून तिला वाटते - ''आपण अस्वस्थ असताना तिनं शांत झोपावं ?'' केस ओढून उठवावे आणि गळा दाबावा असे तिच्या मनात येते आणि लगेच तिला आपल्या दुष्ट विचाराची भीती वाटते.

मोकळेपणाने आसवे ढाळून विमलला जवळ घेत आपल्या मानाने तो तरुण लहान वाटला असे कारण पुढे करीत ती तिला समजावते. ''आई वापांना किती बरं वाटेल ! अग किती काळजी लावायची आपण त्यांना ! जेवढं ओझं कमी करता येईल तेवढं लवकर लवकर नको का करायला ?'' हसावेसे वाटत नाही म्हणणाऱ्या विमलला ती सांगते - ''अग, असंच असतं. दुसऱ्याच्यासाठीच हसायचं जगात.'' पुन्हा पुन्हा ती सांगत राहते - ''मी चांगली नाही गं ! तुला नाहीत नाही. तू समजतेस तशी मी चांगली नाही.

स्त्री पुरुषसंबंधाच्या संदर्भात देहाच्या संदर्भातील खेच आणि मानसपातळीवरील तरलता दोन्हींचा वेध शांतारामांची कथा घेते. 'चंद्र माझा सखा' मध्ये चांदण्यांचा स्पर्शाने अपार्थिवाचा अनुभव घेतल्यावर पुन्हा पार्थिवाचा खडबडीतपणा अनुभवणे दुःखाचे ठरते तर 'देवी' मध्ये तर पार्थिव जगण्यातूनच त्यापलीकडे जाण्याची वाट फुटताना दिसते. जीवनाच्या दोन्ही बाजूंचा वेध ही कथा घेते. सुसंगतीबरोबर विसंगती, तरलतेबरोबरच हिस्त्रता या गोष्टी शांतारामांच्या कथाविश्वात येतात.

शांतारामांचे कथाविश्व नवकथेच्या छायेबरोबरच जन्माला आलेले असले तरी पुढे जवळ जवळ साडेतीन तपे तिची वाटचाल सुरू आहे. त्यात वास्तवाचा वेध आहे तसा स्वप्नांचा आहे. मनाचा तळ आहे तशी शरीरओढीची लाटही आहे. त्यांची कथा बौद्धिक धारही मांडते आणि बुद्धिपल्याडच्या विश्वाचेही चित्रण करू पाहते. उदा. चेटूक.

माणसामाणसातील व्यामिश्र संबंध त्यांनी अनेक कोनांमधून चितारले आहेत. समाज, कुटुंब, मैत्र अशा अनेक चौकटींचा वेध ते घेतात. निवेदनपद्धती, पात्रचित्रण, संवाद याद्दृष्टीने त्यांनी अनेक नव्या वाटा धुंडाळल्या आहेत. त्यांच्या विशिष्ट भावावस्थेच्या कथा कुसमावती देशपांडे यांच्या कथेशी नाते सांगतात आणि त्यांची सूचकता व चिंतनशीलता वामनराव चोरघडे यांच्याशी नाते सांगते. अनुभवाचा कसदारपणा, चित्रणामधील सूक्ष्मता, संयम ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. जीवनातील लहान लहान प्रसंगांमधून त्यांनी हेरलेली सत्ये मात्र निश्चित मोठी आहेत. मनोविश्लेषणाचा त्यांचा वापर संयमित आहे. विविध गंडांनी पछाडलेल्या पात्रांचे वर्णन करण्याचा सोस त्यांनी जोपासलेला नाही. तरीही त्यांच्या मोजक्या काही कथांमध्ये अनुभवाचे गहिरेपण प्रत्ययाला येते; जे त्यांच्या कथाविश्वाचे अथांग सौंदर्य आहे. पतिपत्नीसंबंधातील सूक्ष्म ताणांचा आणि भावसौंदर्याचा त्यांनी जो वेध घेतलेला आहे तो अजोड आहे.


शांतारामांचे कथाविश्व म्हणूनच मला सतत खुणावत राहते आणि महत्त्वाचे वाटते. त्यांच्या संवादशैलीची अनेक रूपे वरवर साधी भासतात पण आंतरिक वास्तवाच्या दृष्टीने त्यांमधील व्यामिश्रता विलक्षण असते हे मात्र त्यांच्या कथाविश्वाच्या संदर्भात आवर्जून नोंदवावेसे वाटते.

❑❑❑

संदर्भ

१) 'अपेशी' , 'छळ आणि इतर कथा' कॉण्टिनेंटल, पुणे, प्रथमावृत्ती, १९५८, पृ. ६५ ते ७६
२) 'चंद्र माझा सखा' - 'निवडक शांताराम' , संपादक विलास खोले, संपूर्ण प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जाने. १९८९, पृ. ७३ ते ७८.
३) 'वहिणी', 'छळ आणि इतर कथा' कॉण्टिनेंटल, पुणे, प्रथमावृत्ती १९५८, पृ. ९९ ते ११२.
४) 'सामर्थ्य', 'चेटूक', .श्री विद्या, पुणे, प्रथमावृत्ती १९८४, पृ. ८७ ते ९५.
५) 'रात्र', 'जमिनीवरची माणसं' महाराष्ट्र प्रकाशन, अमरावती, प्रथमावृत्ती, १९५९, पृ ३६ ते ५०.
६) 'खार', निवडक शांतराम' उनि प्र. ४७ ते ५५.
७) 'शिखा', 'शिखा', मौज प्रकाशन, मुंबई आवृत्ती १ ली, १९५७
८) 'चंद्र माझा सखा' उनि
९) 'लाटा', लाटा', सुविचार प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १९६२, पृ १ ते ९
१०) 'मावशी', 'लाटा', उनि, पृ. २५ त ३४.
११) 'देवी', 'चेटूक' उनि, पृ. ६२ ते ६९.

- डॉ. आशा सावदेकर
नागपूर



अनुक्रमणिका

शांतारामांची कथा
स्त्री पुरुष चित्रण

▶ डॉ. रविंद्र शोभणे

कथाकार शांताराम हे नाव मराठी कथासाहित्यात गेली साठ - बासष्ट वर्षांपासून आपल्या वैशिष्ट्यासंह स्थिरावलेले आहे. त्यांचा पहिला कथासंग्रह 'संत्र्याचा बाग' या नावाने १९४२ मध्ये प्रकाशित झाला. मराठी साहित्यात नवकथा स्थिर होण्याच्या पूर्वपर्वावर 'संत्र्यांचा बाग' चे मराठी साहित्यविश्वात आगमन झाले. कुसमावती देशपांडे आणि वा. कृ. चोरघडे या कथाकारांनी मराठी नवकथेला जे वेगळे परिमाण देण्याचा जाणता अजाणता प्रयत्न केला आहे, त्याच काळातली शांतारामांची कथा आहे आणि नंतर ही कथा आजतागायत आपल्या भेटीला मधूनमधून आलेली आहेच. नवकथाकारांपैकी हयात असलेले गंगाधर गाडगीळ यांनी कथालेखन कधीचेच बंद केले आहे. एखाद्या वाङ्मयप्रकारातले एवढे प्रदीर्घ सातत्य हे मराठीच नव्हे, तर इतर भारतीय भाषेतील साहित्यातसुद्धा फारच अभावाने जाणवते, हे कथाकार शांतारामाच्या कथाप्रतिभेचे अतिशय महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

या सहा दशकाच्या काळात शांतारामांनी किमान अडीचशेच्या पुढे - मागे कथा लिहिलेल्या आहेत. त्यांचे चौदा कथासंग्रह प्रकाशित आहेत. शिवाय एकदोन कथासंग्रह या वयातही प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.

विविधांगी विविधस्पर्शी कथालेखनावरोबरच त्यांनी मानवी स्त्री पुरुष संवंधाच्या संदर्भात जे कथालेखन केलेले आहे, त्या कथांचा विचार प्रस्तुत निवंधात करावयाचा आहे.

आजच्या मराठी कथेला स्त्रीपुरुष संबंधांचे, मानवी वासनांचे, त्याच्या अनेकविध परिणामांचे फारसे अप्रूप राहिलेले नाही. आजची कथा ही अधिक धीट, अधिक खोल आणि अधिक मूलभूत अशी आहे, हे कुणी नाकारू शकणार नाही. कारण आजच्या समाजातील बदललेली मूल्यें ही अशी विविधस्पर्शी आणि तलस्पर्शी स्वरूपाची आहेत; पण जेव्हा आपण मराठी साहित्याच्या आणि त्यातही कथा साहित्याच्या संदर्भात विचार करतो, तेव्हा या व अशा स्वरूपाचे कथालेखन करायला एखाद्या कथालेखिकेला टोपणनावाने कथालेखन करणे बाध्य ठरते, त्या काळचा विचार करावयाचा झाला, तर शांतारामांच्या या कथांचं कौतुक आज अधिक वाटतं. काळाच्या पुढे जाऊन काही एक नव्या मूल्यांचा शोध घेण्याची प्रकृती आणि कुवत ज्या कलावंतात असते, अशा कलावंताला आपण भविष्यलक्ष्यी किंवा द्रष्टा कलावंत म्हणून संवोधले. हे भविष्यलक्ष्यीत्व वा द्रष्टेपण या कथाकाराच्या काही कथांमधून व्यक्त होताना दिसतं. म्हणूनही या कथांची वाङ्मयीन आणि सामाजिक महत्ता उजवी आहे हे नाकारता येत नाही.

'संऱ्याचा वाग' या कथासंग्रहातली शीर्षककथा म्हणून संग्रहित असलेली पहिलीच कथा स्त्री - पुरुष संवंधाचा शोध आपल्या परीने घेण्ययाचा प्रयत्न करते.

(या कथालेखनाच्या वेळी लेखकाचे वय केवळ १८-१९ वर्षांचे होते, ही गोष्ट इथे मुद्दाम अधोरखित करावीशी वाटते.) या कथासंग्रहात स्त्री - पुरुष संबंधाच्या एकूण सोळा कथांपैकी 'संऱ्याचा वाग' , 'वेडी', 'वंचना' आणि 'जीवनातील साक्षात्कार' अशा चार कथा आहेत. या चारही कथांमधून या नात्याचे विविध पदर शांताराम उलगडताना दिसतात.

यापूर्वी मी लेखनाच्या अनुषंगाने उल्लेख केला तो त्या काळाचा. त्या काळात एकतर फडकेप्रणित गुलावी प्रेमकथा किंवा खांडेकर प्रणीत उदात्त कथा - अशा द्विविध स्वरूपाचे बेगडी आणि खोटे दर्शन घडविणाऱ्या कथा लोकप्रियतेच्या शिखरावर होत्या. समाजातील निगरगट्ट, उघड्या बोडक्या वास्तवाला चिमटीत पकडून ते कथा वाङ्मयात मांडणे, ही त्या काळात मोठी जोखीम होती. अनेक संस्कृतिरक्षक आपापल्या हातात संस्कृतिरक्षकाचे कोदंड घेऊन उभे होते. अशा काळात शांताराम जेव्हा या प्रकृतीच्या कथा लिहितात, तेव्हा त्या कथांची निर्मिती काहीशी बिचकत, काहीशी दबकत आणि 'समाजस्वास्थ्य' म्हणून जो एक गोड शब्द तत्कालीन संस्कृतीत होता, त्याला फारसा धक्का न लावता अवतरते. कारण या कथेतले सगळे पदर, सगळे पेड नीटपणे उलगडले जातातच असे दिसत नाही. म्हणूनही ही कथा खूपदा निवेदनाच्या अंगाने खुलू पाहते. खरे

अनुक्रमणिका

तर शांतारामांच्या पुढच्या कथांमध्ये कथेतील संवदांनासुद्धा अतिशय महत्त्व आहे म्हणून मी इथे या संदर्भात हा उल्लेख करतो आहे.

शांतारामांची ही कथा हळुहळू वदलत गेली. विकसित होत गेली, हे काळच्या आणि वाङ्मयीन स्थित्यंतरांच्या अनुषंगाने तपासून पाहावे लागते. मुळात त्यांची सबंध कथाच घाटाच्या, आशयाच्या आणि समाजदर्शनाच्या अंगाने बदलत गेली, तशीच ती स्त्री - पुरुषसंबंधाच्या संदर्भातसुद्धा अधिक गाहिरी, अधिक सखोल होत गेली. 'संत्र्याचा बाग' किंवा 'जीवनातील साक्षात्कार' यासारख्या कथांमधून घडणारे जीवनदर्शन आणि त्या अनुषंगाने व्यक्त होणारे स्त्री - पुरुष संबंध 'उद्रेक' सारख्या कथेमध्ये अधिक खोल, गहिरे आणि अनेकार्थी पातळीवर अवतरते, त्यामुळे 'उद्रेक'सारखी कथा ही केवळ मराठी वाङ्मयातच नव्हे तर पाश्चात्य वाङ्मयात.सुद्धा शोभून दिसेल, अशा स्वरूपाची व जातिकुळीची आहे.

कथाकार शांताराम जेव्हा स्त्री - पुरुषांच्या संबंधांवर कथा लिहितात, तेव्हा ते त्यातून कुठलाही इझम वा भूमिका मांडत नाही. त्यातून फक्त त्यांना अनुभवाचा पट आपल्या दृष्टिकोनातून मांडायचा असतो. खरेतर ज्या काळात शांतारामांची कथा घडत होती तो काळ युंग आणि फ्राइड या मानसशास्त्रज्ञांच्या संकल्पनांनी भारावलेला असा काळ होता. मर्ढेकर, गाडगीळ या संकल्पनांचे बोट धरून काही करू पाहत होते, संज्ञाप्रवाहाचा अनेकस्तरीय वापर त्या काळातल्या अनेक कथाकारांनी - कादंबरीकारांनी केलेला दिसून येतो. शांतारामांची कथा मानवी मनोव्यापारांमधील अनेकविध कंगोरे टिपताना दिसते; पण ती संज्ञाप्रवाही आवर्तात अडकून पडत नाही. विविध भावांदोलनांचे पदर ' उद्रेक' सारख्या कथेमधून ज्या ताकदीने आणि ज्या मूलार्थाने येतात, त्याचा विचार करावयाचा झाल्यास ही कथा संज्ञाप्रवाही चौकटीत न मावणारी अशी कथा आहे, असे जाणवते.

शांतारामांच्या एकूणच कथेचे वैशिष्ट्य म्हणजे ती कथा समग्र समाजदर्शनाने भारावलेली आहे. ग्रामीण पातळीवरील जीवनापासून तर शहरी मध्यमवर्गीय आणि शहरी उच्चवर्णीय जीवनाचा ही कथा सारख्याच अगत्याने विचार करते. हे जसे त्यांच्या समग्र कथेच्या संदर्भात बोलता येते तसेच ते त्यांच्या स्त्री - पुरुष संबंधाच्या कथेसंबंधीही ठामपणे म्हणता येईल. धर्म 'गोपिका', 'चुरणं' 'वेडी' राधाबाई' या ग्रामीण पातळीवरील समाजदर्शन घडविणाऱ्या कथा आहेत, तर 'व्यवहार' 'वंचना' 'संत्र्यांचा बाग' 'जमिनीवरची माणसं', 'स्वतःच शरीर' 'अंधारवाट' 'उद्रेक' इत्यादी कथा मध्यमवर्गीय पातळीवरील जीवनदर्शन घडविणाऱ्या कथा आहेत. 'रती' ही उच्चभ्रूवर्गातील नीतिमत्तेचे दर्शन घडविणारी म्हणता येईल. या प्रकारच्या विविधस्तरीय कथांमधून लेखक केवळ फोटोग्राफिक जीवनदर्शन घडवितात, असे नाही, तर त्यामागे त्यांची त्या त्या अनुभवासंबंधाची आणि त्या त्या अनुभवातून परिष्कृत होणाऱ्या निष्ठांची प्रतीती सहजपणे येते.

अनुक्रमणिका

लेखक जेव्हा विविध पातळीवरचे, विविधप्रकारचे लेखन करतो, तेव्हा तो या समाजाचा एक घटक म्हणून कोणत्या बाजूचा, असा प्रश्न नकळतपणे वाचकांच्या मनात निर्माण होऊ शकतो. लेखकाचं ताटस्थ्य हे अनुभवदर्शनापर्यंत पाण गृहित धरतोच; पण त्यापुढे आशयाच्या आणि ध्वन्यर्थाच्या दृष्टीने विचार केला तर असे दिसते की, कथाकार शांताराम हे समाजस्वास्थ्याचा अधिक उदारपणे विचार करणारे लेखक आहेत. आपल्या लेखनातून कळत न कळतपणे कुठलातरी संदेश समाजापर्यंत पोहचत असतो. हा संदेश समाजघडणीच्या आणि समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने कसा पूरक ठरेल, एवढे भान निश्चितच ही कथा अधिक गांभीर्याने जपते. म्हणूनच 'धर्म' सारखी कथा एका विशिष्ट उंचीवर स्थिरपद होते, हे नाकारता येत नाही.

शांतारामांची 'धर्म' ही कथा मराठी कथावाङ्मयात पताकास्थान म्हणून शोभून दिसावी, एवढी सशक्त अशी आहे. हे सशक्तपण केवळ तिच्या अनुभवात वा मांडणीत नाही, तर ते तिच्यातून प्रस्फुटित होणाऱ्या जीवनाशयातून व्यक्त होते. खरेतर ही कथा एकाच वेळी दोन जीवांची सत्वपरीक्षा पाहणारी कथा ठरते, सखाराम - अंजनी यांच्या नात्यातील वेगळी वीण या कथेतून अधिक पीळदारपणे व्यक्त होते, शरीरसंबंधाच्या पलीकडे जाणारी जीवनविषयक समज या दोघांजवळही अधिक प्रभावीपणे आहे. परस्परांच्या सत्वाला जपण्याचा आयुष्यभर आटोकाट चाललेला प्रयत्न आणि जेव्हा हे सत्त्वच भंगायला लागतं, तेव्हा दोघेही आत्महत्येचा निर्णय घेतात. सखारामपेक्षा अंजनीच्या व्यक्तिमत्त्वाचा अधिक धारदारपणे यातून विचार होतो.

शरीरमनाची भूक ही मानवी स्वभावाची आदिम भूक; पण या भुकेच्या पुढेही काही नाती जातात. या भुकेच्या पुढे जाणारी नाती कोणत्या पातळीवरची आहेत, त्यातून व्यक्त होणाऱ्या संबंधांची जात आणि त्या संबंधातून व्यक्त होणारी जीवनविषयक जाण हे टप्पे या कथेला किंवा कलाकृतीला तिची एक मूल्यांकता वहाल करू पाहते. शांतारामांची कथा शरीर मनाची भूक नाकारत नाही. उलट शरीर मनाची भूक, निसर्गदत्तवासनेचे दमन आणि त्यातून येणारी विकृती यांचे चित्रण ही कथा 'वेडी' किंवा 'मंजिऱ्या' सारख्या कथांमधून तर करतेच; पण यातही केवळ ते या प्रकारच्या कथांमधून स्त्रीची विविधांगी रूपे तपासण्याचा, शोधण्याच्या प्रयत्न करताना दिसतात, ही स्त्री मग पत्नी, आई, वहिंण, सखी, प्रेयसी या पातळीवर वावरू लागते, अर्थात या पातळीवर वावरताना तिच्यातील आदिमत्त्वाची जाणीव मात्र लेखक सातत्याने जपतात. म्हणूनच ही कथा केवळ आदर्शवादी किंवा वेगडी ध्येयवादी ठरत नाही तर ती वास्तवाच्या भक्कम पायावर उभी राहते, याचं अर्थपूर्ण उदाहरण म्हणजे 'स्वतःचं शरीर' ही कथा घेता येईल. यातली गुलाब जेव्हा मातृत्व आणि स्त्रीत्व या दोलायमान अवस्थेत हिंदोळत असते, तेव्हा ती शेवटी आपली मूलभूत गरज म्हणून मुलीसंबंधी खोटं बोलते आणि भूपेंद्रसोबत फिरायला निघून जाते.

तिचा हा निर्णय हेच या कथेचे मर्मस्थान आणि शांतारामांची कथादृष्टी प्रतीत करणारी ठरते.

शांतारामांचे स्त्री - पुरूष संबंधासंबंधींच्या कथांचे वैशिष्ट्य तपासून पाहताना त्यांच्या लेखनाची काही वैशिष्ट्ये चट्कन लक्षात येतात. त्यातले पहिले वैशिष्ट्य म्हणजे या कथेचे संयतपण, ही कथा कुठेही आक्रस्ताळी, पिसाट, एकारलेली अशी होत नाही. यातून व्यक्त होणारा अनुभव अतिशय संयतपणे, तटस्थपणे आणि तरीही नेमकेपणाने मांडत जाते. अनावश्यक शारीरवर्णने, अनावश्यक बारकावे ही कथा देत नाही. दोन शब्दांमधील जागा अतिशय प्रभावीपणे, बोलकेपणाने व्यक्त करते. या कथेचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे ही कथा मिताक्षरी आहे. यातील बहुतेक कथांचे विषय आजच्या दृष्टीने तपासून पाहिले तर दीर्घकथेच्या सीमारेषेवर जाणारे वाटतात. पण लेखक काही गोष्टी वाचकांना गृहित धरायला लावतात आणि या गृहित धरण्यातच अनेकदा त्या कथेचे अनेकार्थत्व व्यक्त होते.

शांतारामांच्या कथांचा - त्यातील स्त्री पुरुष चित्रणाचा हा एक धावता आढावा. यातून या कथांची सगळीच वैशिष्ट्ये व्यक्त करणे कठीण व अशक्य आहे; तथापि या प्रकृतीच्या कथांचा हा धावता आढावा आहे, असे म्हणावे लागेल.

❑❑❑

- डॉ. रविंद्र शोभणे
नागपूर

अभिनंदन

साहित्य अकादमी आणि सरस्वती सम्मान या पुरस्कांराबरोबरच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वि. वा. शिरवाडकर नाट्य लेखन - पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल महेश एलकुंचवार ह्यांच विदर्भ साहित्य संघाकडून अभिनंदन.

अनुक्रमणिका

के. ज. पुरोहित यांच्या आत्मपर ललित लेखनाचे स्वरूप एक चिकित्सा

◗ डॉ. किशोर सानप

के. ज. पुरोहित ऊर्फ शांताराम यांच्या व्रात्यस्तोम, मी असता, आठवणींचा पार आणि ठेवणीतल्या चिजा या चार लेखसंग्रहाचे स्वरूप हे आत्मचरित्रपर किंवा आत्मपर स्फुट ललित लेखनाचे आहे, असा निष्कर्ष काढता येतो. मराठीत संकल्पनांचा खूप गोंधळ आहे. समीक्षेची आधी पद्धती आणि संकल्पना निश्चित केली पाहिजे आणि नंतरच साहित्यकृतीची समीक्षा केली पाहिजे, हा पायंडा मराठीत आत्ताच दुर्मिळ आहे असे मानण्याचे काही कारण नाही. मराठीत वाङ्मयीन संकल्पनांचे खूप वाद आजवर होतच आलेले आहेत. तरी मराठीत एखादी वाङ्मयीन संकल्पना आजवरही कधी स्पष्ट झाल्याचे चित्र दिसत नाही. आजच्या चर्चासत्राच्या निमित्ताने आपण किमान दोनचार संकल्पना ज़री निश्चित करून शांतारामांच्या लेखनाची चिकित्सा करू शकलो तर त्यातून मराठी साहित्यविश्वाचे भलेच होणार आहे. मराठीत आजवर अनेक जुन्यानव्या लेखकांनी आत्मचरित्रे, आत्मकथने, आत्मचरित्रात्मक लेखन, आठवणींच्या पठडीतले लालित्यपूर्ण असे ललित लेखन केलेले आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात तर अशाप्रकारच्या लेखनाचे मराठीत भरपूर पीक आले आणि त्याचा चांगला खपही झालेला आहे. मराठीत सर्वकाही होते आणि संपूनही

अनुक्रमणिका

जाते तरी साहित्यव्यवहारातला गोंधळ पूरेसा दूर होतांना दिसत नाही. ह्याच जातकुळीच्या लेखनाबाबत वापरल्या जाणाऱ्या काही संकल्पनांचा नव्याने विचार करण्याची आज नितांत गरज आहे. ह्या संकल्पना जितक्या स्पष्ट होतील तितके शांतारामांचे या जातकुळीतले लेखनही आपल्या अंगभूत वैशिष्ट्यांनी वेगळे असल्याचे स्पष्ट होईल.

आत्मचरित्र आणि आत्मचरित्रात्मक स्फुट लेखन

आत्मचरित्र आणि आत्मचरित्रात्मक स्फुट लेखन ह्या दोन्ही संकल्पना भिन्नभिन्न मानल्या जातात ते बरोबरही आहे. शिवाय आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकारच मानता येत नाही. आही एक मतप्रवाह आहे. आत्मचरित्रात्मक लेखनाला सुबक पर्याय म्हणून आत्मपर लेखन केलं जातं, त्यालाच काही लोक ललित लेखन किंवा काही लोक तर ललित गद्य असंही म्हणतात. अशा खूप नव्या नव्या संकल्पना समीक्षकागणिक आपल्या मराठीत अस्तित्वात आहेत. अनेक अलेखकांनी आत्मचरित्रे लिहिली आहेत म्हणून आत्मचरित्रांना वाङ्मय प्रकार न मानण्याकडे कल दिसतो. अनेक लेखकांनी आत्मचरित्रे लिहिली आहेत म्हणून त्यांच्या समर्थकांना आत्मचरित्र हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार मानावासा वाटतो. हे सर्व सोईचे अर्थशास्त्र बाजूला ठेवले तर सर्वसामान्य वाचकांना मात्र आत्मचरित्रांनी गेल्या शंभर वर्षांपासून किंवा त्याही आधीपासून भारावून सोडले आहे. लक्ष्मीबाई टिळकांचे स्मृतिचित्रे, विष्णु गोडसे भटजींचे माझा प्रवास पासून तर आत्ता आत्ताची सर्वच दलित आत्मचरित्रे आणि अन्यही मराठीतल्या मोठ्या लेखकांच्या बायकांची आत्मचरित्रे मराठीत मोठ्या चवीने वाचली जातात, ही असमाधानाची बाब मानण्याचे काही कारण नाही. आत्मचरित्रकार हा एका आत्मचरित्रातच पुढे लेखक म्हणून संपून जातो असे लक्ष्मण गायकवाड, लक्ष्मण माने इत्यादी. आणि आनंद यादवांसारखे आधीच म्हणून भरपूर कथाकादंबऱ्या लिहिणारे लेखकही पंधराशे चौसष्ट पानांचे चार जाडजूड आत्मचरित्रे लिहूनही लेखक म्हणून वाचकांना थकवण्यासाठी मागे उरतात हाही अपवाद मराठीत आहेच. लेखकाची एक साहित्यकृती किंवा कलाकृतीही लेखकाला आयुष्यभर जगवते अशी उदाहरणे जगातल्या वाङ्मयात अगदीच दुर्मिळ आहेत असे नाही. आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार मानला तरी आत्मचरित्र लिहिणारे लक्ष्मीबाई आणि विष्णु गोडसे भटजींसारखे श्रेष्ठ आत्मचरित्र लिहिणारे लेखक साहित्यात अजरामर होतात - त्यांची आत्मचरित्रे त्यांना लेखक म्हणून चिरंतनत्व प्रदान करतात. महात्मा गांधीसारख्यांना लेखक न मानणाऱ्या लोकांची आत्मचरित्रेही जगात थोर मानली जातात. लेखकाजवळ लेखनकौशल्य असते म्हणून त्यांची आत्मचरित्रे खूप वाचनीय असतात असेही नाही आणि ज्यांच्याजवळ लेखनकौशल्य नाही त्यांची आत्मचरित्रे खूप वाचनीय असतात असेही नाही आणि ज्यांच्याजवळ लेखन कौशल्य नाही त्यांची आत्मचरित्रे लेखकांपेक्षाही अधिक वाचनीय

झाल्याचे दिसते. उदा माझा प्रवास किंवा स्मृतिचित्रे.

आत्मचरित्र या प्रकारात समग्र व्यक्तिजीवनेतिहास, स्वसापेक्ष आठवणी, दैनंदिनी, स्वसापेक्ष व्यक्तिचित्रे आणि प्रवासवर्णने अशा लेखनस्वरूपांचा समावेश केला जातो. १ स्वतःच्या आयुष्याच्या केंद्रशोधातून आत्मचरित्र लेखनाची प्रेरणा जन्मास यावी. त्या शोधाशी आणि त्याच्या स्थापनेशी जो जो तपशील जे जे विचार व जी जी भावना सुसंगत असेल, ते ते सारे आत्मचरित्र लेखकाने अभिव्यक्त करावे.२ अशी रास्त अपेक्षा द. भि. कुळकर्णींनी व्यक्त केली आहे. आत्मचरित्र ललितकृती होऊ नये फक्त प्रसंगी त्याला ललितमूल्य प्राप्त व्हावे, हा द. भिंचा इशारा मार्मिक आणि वस्तुनिष्ठ आहे. ३ द. भिं च्या संकेतानुसार तर आनंद यादवांची आत्मचरित्रे बादच करावी लागतात. मोठ्या प्रमाणावर मराठीत आत्मचरित्रांचे लेखन करणाऱ्या आनंद यादवांनी तर आज मराठी समाजात इतर प्रातिभ आणि काल्पनिक साहित्यप्रकारांच्या वाचनापेक्षा आत्मचरित्राचे वाचन अधिक प्रमाणात करणारा वाचकवर्ग झपाट्याने वाढतो आहे. ४ असे म्हटले आहे ते त्यांच्या लेखनाचा आवाका बघून पटण्यासारखे आहे. यादवांनी आत्मचरित्रमीमांसा हा ग्रंथ लिहून आत्मचरित्राला वाङ्मयाच्या इतिहासात स्वतंत्र साहित्य प्रकार म्हणून मान्यता नसल्याची खंत व्यकत केली आहे. ५ शिवाय आत्मचरित्र हा कादंबरीइतकाच महत्त्वाचा साहित्यप्रकार आहे, अशी त्यांनी स्वयंभू घोषणाही करून टाकली आहे. ६ आत्मचरित्र हा वाङ्मयात अतिशय अवघड असा साहित्यप्रकार आहे, असेही यादवांनी म्हटले आहे. ७ 'स्व'रूपाची गद्यात्म अभिव्यक्ती हे आत्मचरित्र या साहित्यप्रकारचे व्यवच्छेदक लक्षण आहे. ८ आत्मचरित्रकार वर्तमानकालात स्थिर होऊन आत्मचरित्र लिहित असतो आत्मचरित्रात अर्थातच गतकाळातल्या जीवनसंघर्षाची व्यामिश्र कहाणी असते. आत्मशोधाची आणि सत्यशोधाची प्रेरणा ही आत्मचरित्र लेखकाची सृजनप्रेरणा असली पाहिजे. अर्थातच वाचक आत्मचरित्र हे सत्य मानूनच वाचत असतात हा भाग वेगळा. स्वलिखित आत्मचरित्रांचा प्रामाणिकपणा ही केवळ एक गृहीत गोष्ट आहे, ती काही वस्तुस्थिती नाही. मराठीतीलच काय पण जागतिक आत्मचरित्र वाङ्मयात अनेक लेखकांच्या पदरात त्यांच्या अप्रामाणिकपणाचे माप अभ्यासकांनी टाकल्याचे एक चांगले निरीक्षण डॉ. अ. द. वेलणकरांनी नोंदवलेले आहे. ९ यादवांनी मात्र त्यांच्या ग्रंथात आत्मचरित्र आणि ललित साहित्यातील भेद स्पष्टपणे निर्देशित केलेला आहे. ललित साहित्यातील मानवी सृष्टी ही कल्पित असते; तशी आत्मचरित्रातील मानवी सृष्टी नसते. ती प्रत्यक्षातील, समाजवास्तवातील घटित असते या घटिताला कोणत्याही प्रकारची बाधा येऊ न देता आत्मचरित्राची मांडणी करतांना वाङ्मयीन गुणविपुल भाषाशैली किंवा काव्यात्म गुण असलेली भाषाशैली आत्मचरित्रासाठी विघातक ठरते. आत्मचरित्र हा साहित्यप्रकार वास्तववादी स्वरूपाचा असतो. १० आत्मचरित्राची यादवांनी सांगितलेली लक्षणे मान्य

करायला हरकत नाही. परंतु ललित भाषेचे केवळ पुरस्कर्तेच नव्हे तर अस्सल कलावादी लेखक असलेल्या यादवांनी आपल्याच आत्मचरित्रात कादंबऱ्या लिहून किंवा ललित भाषेतच आत्मचरित्राचे सृजन करूनही ते लालित्यगुणांचा विरोध का करतात हा शोधाचाच मुद्दा आहे. आत्मचरित्रकाराने लालित्याला कशासाठी त्यागावे ? याची मीमांसा व्हायला हवी.

ललित लेखन किंवा ललित साहित्य किंवा ललित गद्यही

ललित या शब्दानेही मराठीत मोठा सांकल्पनिक गोंधळ घातला आहे. ललित साहित्य म्हणजे ज्यात कथा- कादंबरी-कविता- नाटक आदी वाङ्मय प्रकारांचा समावेश होतो ते साहित्य, ललित लेखन, ललिगद्य, ललितनिबंध, ललितलेख, लालित्यात्म शैली अशाही संकल्पना वापरात आहेत. लघुनिबंध, गुजगोष्टी, प्रवासवर्णने, व्यक्तिचित्रे, आठवणी, अनुभव, दैनंदिनी, पत्रलेखन, मुलाखती, स्मरणचित्रे, आत्मपर लेखन अशा लालित्य असलेल्यालेखन प्रकारांनाही पयार्य म्हणून ललित ही संकल्पनेचा वापर मराठीत भरपूर केला गेला आहे. ह्या सगळ्या लेखनातही लेखकाच्या मी किंवा स्व चा आत्मचरित्राइतकाच सहभाग असतो. आत्मचरित्रात ह्या सगळ्याच गोष्टी मोठ्या अवकाशात भरपूर तपशिलासह एकत्रित येवू शकतात. आत्मचरित्राचा आवाका आणि अवकाश मोठा असतो. कथा आणि कादंबरीत जसा भेद असतो तसाच तो आत्मचरित्र आणि आत्मपर ललितादी लेखनातही असतो. हे सारं लेखन आत्मचरित्राचंच स्फुट लेखन असतं. असं लेखन बरेचदा प्रासंगिक आणि वर्तमानपत्रांचे कॉलम भरण्यासाठी झालेलं असतं. स्फुट आत्मपर लेखनाच्या प्रेरणा ह्या तात्कालिक असतात. प्रासंगिक असतात. समाजाच्या गरजेतून निर्माण झालेल्या असतात. त्यात आत्मचरित्रासारखी तीव्र आत्मशोधाची किंवा सत्यशोधाची उर्मी नसते. अशा चिंचोळ्या लेखनातून चिंचोळेपणच वाचकांच्या हाती लागते. फारमोठे काही हाती लागो हा लेखकाचाही हेतू नसतो आणि लेखक - वाचक या दोघांनाही कोणत्याही प्रकारचा ताप न देणारं हे लेखन असतं. म्हणून काही स्फुट ललित लेखन किंवा आत्मपर असं ललित लेखन अगदीच टाकावू असतं असं मानण्याचं काही कारण नाही. मुख्य म्हणजे ह्या स्फुट लेखनात मात्र यादवांसह सर्वच आत्मचरित्राचा रूपबंध हाताळणाऱ्या लेखकांना लालित्य हा एक आवश्यक गुण वाटतो. तेव्हा आत्मचरित्रातच त्याचं वावडं का असावं ?

ललित हे विशेषण लेखनप्रकाराचं एक नैसर्गिक लक्षण मानलं तर मराठीत आजवर जो सांकल्पनिक गोंधळ झाला आहे तो काहीसा तरी दूर करता येणे शक्य आहे. ललित हे विशेषण मानलं की ते त्या गद्याचं स्वरूप निश्चित होतं. ११ लालित्य ही एक काव्यात्म आणि तरल अशा वाङ्मयीन शैलीची निर्देशक अशी संकल्पना मानली जाते.

भालचंद्र नेमाड्यांनी ललित गद्य हा प्रकारच मुळापासून आपण तपासून घ्यायला हवा, असा मुद्दा एका चर्चासत्रात मांडला होता. १२ पद्यापेक्षा वेगळेपण सिद्ध व्हावे म्हणून गद्य हा प्रकार अस्तित्वात आला. शिवाय गद्याला वैचारिकतेची आणि प्रबोधनाची एक मोठी परंपरा मराठीतच महानुभाव आणि बखर गद्यातून आणि पुढेही फुले, आगरकर, टिळक, चिपळूणकर, आंबेडकरादी प्रभृतींच्या गद्यात्म लेखनातून प्राप्त झालेली आहे. ललित गद्य असा जेव्हा शब्दप्रयोग केला जातो तेव्हा त्यात आपल्याला ललित साहित्यातील कथा - कादंबरी - नाटकांचा रूपबंध मान्य असतो. नेमाड्यांना ललित गद्य हा शब्दच मान्य नाही. १३ कारण गद्यातही लालित्य असतं, काव्यात्मता असते. परंतु तिचे स्वरूप मर्यादित आणि गद्यनिष्ठच असते, हे मान्य केले पाहिजे. इरावती कर्वे, अनिल अवचट, बहुतांश अलिकडच्या सामाजिक विषयांवर लेखन करणाऱ्या लेखकांचं लेखन लक्षात घेतलं तर त्यांच्या लेखनाची शैली आणि भाषा संपूर्णपणे गद्यात्मक असली तरी तिच्यात अभिजात अशा ललित गुणांचाही अंतर्भाव नसतोच असे तरी कसे म्हणता येईल ? उलट अवचटांसारख लेखकाचं लेखन साधंसुधं असूनही अत्यंत प्रवाही आणि वाचनीय ठरतं. अवचटांचं संपूर्ण व्यक्तिमत्त्व त्यांच्या नैतिक उंचीसह साकार होतं. खरं तर हेच लेखनयश असतं. अत्यंत काव्यात्म, तरल असं गद्य किंवा निबंध वगैरे ललित किंवा लालित्यपूर्ण किंवा आत्मपर वगैरे लेखन करणाऱ्या हजार कचरा लेखकांपेक्षा अवचटांसारखे लेखक हिमालयाचं शिखर पादाक्रांत करणारे वाङ्मयातले शेरपा तेनसिंग असतात. दुर्दैवाने अवचटांना मराठी लेखक मात्र लेखक मानत नाहीत, हा भाग निराळा.

ललित किंवा आत्मपर लेखनाची मूलभूत वैशिष्ट्ये

लेखनप्रकार स्पष्ट करण्यासाठी ललित हे विशेषण म्हणून वापरावे तर लालित्य ही संकल्पना केवळ काव्यात्मतेसाठी, तरलतेसाठी, कृतक अशा भाषेच्या धाटणीसाठी न वापरता लेखनातील लेखकाच्या शैलीसाठी आणि विशेषतः त्याने वापरलेल्या प्रवाही आणि वाचनीय भाषिकतेसाठी वापरायला हरकत नसावी. भाषेचा पोत मात्र अस्सल असावा. कृतक किंवा खोटा नसावा. मराठीतले आघाडीचे ललित लेखक, गद्य आणि काव्य यांच्या प्रयोजनातील फरक लक्षात न घेता खोटा नसावा. मराठीतले आघाडीचे ललित लेखक, गद्य आणि काव्य यांच्या प्रयोजनातील फरक लक्षात न घेता खोटी काव्यात्मता निर्माण करून वाचकाला संमोहित करतात म्हणून ललित गद्याची आधुनिक परंपरा आणि ललित गद्य हा फॉर्म आवर्तात सापडलेला आहे तसेच ललित गद्याची आधुनिक परंपरा आणि ललित गद्य हा फॉर्म आवर्तात सापडलेला आहे तसेच ललित गद्याची आजची परंपरा ही अतिशय तकलादू आणि व्याजस्वरूपाची आहे. हे अत्यंत मूलभूत असे निरीक्षण डॉ. चंद्रशेखर जहागिरदार यांनी एका चर्चासत्रात नोंदविलेले आहे. मराठीत ललित निबंधाची

मधल्या काळात जी भरमसाठ निर्मिती झाली ती कृतक अशा लनित लेखनाचेच उदाहरण मानले पाहिजे. कृतक् ललित निवंध हा शब्द मराठीतले थोर भाषाशास्त्री अशोक केळकर यानी सूचवला तो सार्थ आहे.

१५ ललित किंवा आत्मपर स्फुट लेखनाच्या निमित्ताने आविष्कृत होणाऱ्या लेखनाची काही वैशिष्ट्ये स्पष्ट करता येणे शक्य आहे. लालित्य हा भाषिक गुणधर्म लेखनात असला तर तो गुन्हा ठरत नाही. परंतु भाषेचे लालित्य हे स्वाभाविक आणि नैसर्गिक असावे कृतक असू नये. खोटे असू नये. उत्कटता, भावूकता, संमोहन अशा सर्व संकल्पना मधल्या काळातल्या कृतक् ललित लेखनातूनच पुढे आल्या आहेत. काव्यात्मता हेच केवळ भाषेच्या लालित्याचे व्यवच्छेदक लक्षण मानता येत नाही. आजच्या ललित लेखनाचे स्वरूप बदललेले आहे आणि कालच्यासारखे ते रूपवादी - कलावादी व्याजलालित्याचे राहिलेले नाही म्हणून कालच्या फुटपट्ट्या आजच्या ललित लेखनाला लावता येणार नाही. आजच्या शांतारामांच्या लेखनाचे स्वरूप बदललेले आहे आणि कालच्यासारखे ते रूपवादी - कलावादी - व्याजलालित्याचे राहिलेले नाही म्हणून कालच्या फुटपट्ट्या आजच्या ललित लेखनाला लावता येणार नाही. आजच्या शांतारामांच्या लेखनात जसे लालित्य स्वाभाविकपणे येते तसेच ते असावे, हे एक आदर्श उदाहरण देता येईल. काव्यात्मता हेच ललित लेखनाचे वैशिष्ट्ये मानण्याची परंपरा रुपवादी आणि कलावादी लेखकांनी मराठीत रूढ केलली आहे. ती आता कालबाह्य मानायला हरकत नसावी. आत्मपर लेखनात आत्माविष्कार किंवा आत्मपर अशा आठवणी, गतकाळातील आठवणी, आठवणीतली माणसं, स्थलकाल अवकाशात चिरंतन बनलेल्या घटना वगैरे लेखन महत्त्वाचे ठरते. लेखकाच्या अशा लेखनातला आत्मनिष्ठ आत्माविष्कार हा सत्यनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ असावा आणि त्याचे तंतोतंत पालन केवळ लेखकालाच करावे लागते कारण वाचकांचा अशा लेखकाच्या लेखनावर आपण सत्यच वाचत आहोत असा विश्वास असतो. ललित लेखन स्फुट असले तरी आत्मपर लेखन प्रकारातल्या संपूर्ण लेखनाचे एकत्रित मुल्यमापन केल्यास त्यातून आत्मचरित्रासारखा मोठा अवकाश व्यक्त व्हायला हवा. जसा तो के. ज. पुरोहितांच्या आत्मपर ललित लेखनात आढळतो. आत्मपर ललित लेखनात किंवहुना एकूणच ललित लेखनात लेखकाचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व त्याच्या जीवनसंबंद्ध अशा नैतिकतेसह उमटले पाहिजे. हे वैशिष्ट्यही पाहिजे. हे वैशिष्ट्यही शांतारामांच्या लेखनातून आढळते, ही सुद्धा एक समाधानाची बाब आहे. आत्मपर ललित लेखनात लेखकाला गतकाळातल्या आठवणींची तीव्र ओढ असते. शांतारामांच्या लेखनात हेही वैशिष्ट्य पूरेपूर आढळते. तात्पर्य, कालच्या आणि आजच्याही ललित लेखनाचे आणि त्याशी निगडित असलेल्या आत्मपर ललित लेखनाचे स्वरूप निश्चित करतांना आपल्याला

के   ज. पुरोहित उर्फ शांतारामांच्या आत्मपर ललित लेखनाचेही वर्तमानसंबद्ध असे आदर्श दृष्टिआड करून चालणार नाही.

शांताराम यांचे आत्मपर ललित लेखन

शांताराम यांच्या आत्मपर ललित लेखनात व्रात्यस्तोम, मी असता, आठवणींचा पार आणि ठेवणीतल्या चिजा अशा चार लेखसंग्रहांचा समावेश करता येईल. अर्थात हे सर्वच लेखन शांतारामांनी सदरलेखन किंवा प्राासंगिक म्हणून केले आहे असे दिसते. व्रात्यस्तोमहा आत्मकथनपर संग्रह असून आठवणींचा पार हा व्रात्यस्तोम सारखा आत्मकथनपर संग्रह नसून आठवणींच्या अभिव्यक्तिकरणासाठी लेखक केवळ साक्षीभूत आहे, असे खुद्द शांतारामांनी आठवणींचा पार या संग्रहाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. लोकमतच्या रविवार पुरवणीसाठी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी वर्षभर शांतारामांकडून लेखन करून घेतले म्हणून जोशींचे मराठी साहित्यावर उपकारच झाले. तसेच उपकार पुन्हा शंकर सारडा यांनीही केले. लोकमतच्या अक्षररंग पुरवणीसाठी त्यांनी वर्षभर शांतारामांकडून लेखन करुन घेतले. या संग्रहाच्या प्रस्तावनेत लेखक म्हणतो, ''या संग्रहासाठी लेखांचा क्रम ठरवतांना मी साधारणपणे घटना आणि अनुभवांचा माझ्या आयुष्यातील कालक्रम लक्षात घेतला आहे. साधारणपणे असे म्हणावयाचे घटना आणि अनुभवांचा माझ्या आयुष्यातील कालक्रम लक्षात घेतला आहे. साधारणपणे असे म्हणावयाचे कारण असे की अनुभव एका सरळ रेषेत कधीच येत नसतो. अनुभव, भावना, विचार यांच्या पलीकडे असे काहीतरी नेहमीच असते. ''या संसूचनातून व्रात्यस्तोम ते ठेवणीतल्या चिजा असा लेखकाचा एक मोठा दीर्घप्रवास कालसंबद्ध बदलांसह व्यक्त होतो.

शाांतरामांच्या चारही लेखसंग्रहांचा एकत्रित विचार केल्यास एक परिपक्व आणि पारदर्शक लेखकाचे अत्यंत निखळ, शांत, तरल आणि संयंतपणे माणुसकीचे दर्शन घडविणारे एक सुजाण असे व्यक्तिमत्व साकार होते. आत्मचरित्रांची किंवा आत्मचरित्रात्मक कादंवऱ्यांची रद्दी वाचण्यापेक्षा कुण्याही वाचकाला शांतारामांचे लेखन - जीवन मनुष्याने कसे जगावे ? या प्रश्नाचे उत्तर देवून जाते. आत्मचरित्रात्मक लेखनाचे जे काही दुर्गुण सांगितले जातात त्या सर्वच दोषांपासून अंतर राखून शांतारामांचे लेखन आपले स्वतःचे एक निराळे वळण किंवा स्वयंसिद्ध वाङ्मयीन गुणवत्ता सिद्ध करणारे आहे. सदर आणि प्रासंगिक लेखन असूनही ते वाचनीय आणि माननीय झाल्याबद्दल शांतारामांचे वाचकांनी आभारच मानायला हवेत. आत्मपर लेखन असूनही शांताराम कुठेच आपला तोल सुटू देत नाहीत. कुठेही आत्मप्रौढी किंवा आपल्याच व्यक्तिममत्त्वाचे उदात्तीकरण करीत नाहीत. वालपणापासून म्हणजेच गतकाळापासून तर वर्तमान काळातील म्हातारपणातही तारुण्याच्या उर्मी जोपासणारा हा लेखक आहे. लेखकाने किंवा सर्वसामान्य माणसाने कसे उमदे

आणि प्रसन्न असावे, जीवनाकडे कसे सकारात्मक पहावे, समाजात जगतांना आणि वागतांना कसे संयमित आणि शांतपणे वागावे, याविषयीचे अनेक वस्तूपाठ शांतारामांनी आपल्या लेखनातून वाचकांना दिले आहेत. शांताराम कुठेच आपल्या प्रतिमेच्या आणि लेखकाच्या मोठेपणात गुंतून पडल्याचे दिसत नाहीत. आत्मचरित्रांसारखे त्यांचे लेखन नॉर्सिसस नाही. शिक्षक - प्राध्यापक - प्राचार्य - लेखक असूनही हा लेखक रिक्षावाल्या - टॅक्सीवाल्यांपासून तर चिंतामणराव देशमुख - मोरारजी देसाईसारख्या सर्व स्तरातल्या लोकांत वावरतो. समाजात अनुभवांची संयमित अभिव्यक्ती करतो. एकूणच शांतारामांचे आत्मपर लेखन हे लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृतिचित्रांच्या जातकुळीतले आहे. मराठीतली बहुतांश आत्मचरित्रे, आत्मकथने, स्वकथने, बायकांची आत्मकथने वगैरेपेक्षा शांतारामांच्या लेखनाला अधिक गंभीर आणि सुजाण असे संदर्भ लाभतात. अर्थातच हा लेखकाच्या जीवनदृष्टीचा एक अनिवार्य असा नैतिक परिणाम आहे.

शांतारामांच्या लोकप्रियतेचं रहस्य

आत्मपर लेखनाची गुणवत्ता ही लेखकाच्या जीवनसंबद्ध अशा व्यक्तिमत्त्वाच्या नैतिक आविष्कारातून सिद्ध होत असते. लेखक जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोणातून पाहातो आणि आपल्या सहवासात आलेल्या लोकांचाही नकारात्मक दृष्टिकोण सकारात्मक करतो. माणसाचं मन जसं आहे तसं त्याला जग दिसतं, हे खरं आहे. शांतारामांजवळ एक संतृप्त आणि संपृक्त मन आहे. जीवनाकडे पाहण्याची दृष्टी गंभीर असूनही तिला निराशेचा, वैफल्याचा स्पर्श नाही. जीवनात फसवले जाणे, ठगवले जाणे वगैरेंकडेही लेखक अनुभव आणि शिक्षण म्हणून पाहातो, ही प्रगल्भताच लेखकाचे जगण्याचे बळ आहे. असे बळ सर्वसामान्य माणसाकडे असते आणि असावे म्हणून लेखकाचा प्रयत्न आहे. शांताराम आपल्या जीवनात एकटे नाहीत. मनानेही ते एकटे नाहीत. एकटेपण तर त्यांना अजिबात पसंत नाही. एकटे असतांना त्यांना पुस्तकांची, संगीताची, वर्तमानपत्रांची साथ हवी असते. एकटेपणा लेखकाला जीवघेणा वाटतो म्हणून लेखक सतत भटकंती करतो. समाजात वावरतो. लोकांत राहातो. बाजारातून जितक्या आवडीनं शांताराम भाजीपाला आणतात तितक्यात आवडीनं त्यांना खाणंपिणंही आवडतं. जितकं त्यांना खाणंपिण आवडतं तितकचं त्यांना लोकांशी बोलणं, लोकांना शहाणं करणं, लोकांना आपले अनुभव सांगणं, असं सर्वकाही त्यांना मनापासून आवडतं. जीवन जगण्याचं प्रचंड आत्मबळ शांतारामांच्या लेखनातून वाचकाना मिळतं.

शांतारामांच्या लोकप्रियतेचं रहस्य त्यांच्या नैतिक, प्रामाणिक आणि पारदर्शक व्यक्तिमत्त्वात दडलेलं आहे. ''माझा स्वभाव गोड वगैरे काही नाही हे मी जाणतो. पण तशी प्रशंसा त्या रागावलेल्या मनःस्थितीतही मला आवडली'' (टे.चि.६६); ''खरे तर

मद्य मला चालते, कधी कधी आवडतेही' (ठे. चि. ११); ''मी स्वतः फार बारकाईनं पेपर्स काढतो अशी माझी जेव्हा जेव्हा माझे सरकारी तारीफ करीत असत तेव्हा मला वाटायचं खरोखरच आपण विद्यार्थ्यांना फसवण्यासाठी आपल्या चातुर्याचा उपयोग करीत आहोत.'' (आ.पा.३८) आपल्या जगण्यातले आणि स्वभावातले दोष कबुल करण्याएवढं शांतारामांचं मन मोठ आहे. यासंदर्भात आपले आवडते विद्यार्थी सुरेश भटांबाबत शांताराम म्हणतात, ''तो मौला माणूस; भटका जीव. एक दिवस राजकमल चौकात सोड्याच्या दुकानात मी त्याला गाठले आणि विचारले, '' तू अचानक वर्गात येणे बंद केलेस ?'' सोडा रिचवित त्याने उत्तर दिले, ''अचानक नाही. विचारपूर्वक.'' ''म्हणजे''? ''काही अर्थ नाही त्या वर्गात. तुमचे बोलणे ऐकण्यासारखे असते.'' (ठे.चि. ११९) अत्यंत यशस्वी आणि लोकप्रिय असलेल्या शिक्षकाने आणि लेखकाने आपल्या आयुष्याला कुरतडणाऱ्याही बाबी प्रामाणिकपणे मांडाव्यात, हेच खरेतर शांतारामांच्या लोकप्रियतेचे गमक आहे. आपल्या उतरणीच्या आयुष्यात आपल्याला भरपूर यश मिळाल्याची भावनाही शांतारामांना नाही. अनेकदा त्यांना 'यशाची हवा' झाल्याचे जाणीव होते. अशा अनेक नाजूक आणि घायाळ करणाऱ्याही अनुभवांचे अभिव्यक्तिकरण शांतारामांनी आपल्या आत्मपर लेखनात केलेले आहे.

खुली कवाडं या लेखात शांताराम म्हणतात, ''शिवाशीव, स्पृश्यता, अस्पृश्यता वगैरे आता राहिली नाही असं मला पुष्कळांना सांगितलं आहे. खरोखरच तसं झालं असेल तर उत्तम. नपेक्षा आपण स्वतःच्या तोंडावर थुंकलं पाहिजे.'' (आ. पा.३९) शांतारामांची ही समंजसपणाची जाण अधिक समृद्धपणे व्यक्त होते ती मालगुडी ते ब्रह्मपूरी या लेखात. शेवटी मालगुडी कितीही वास्तव वाटत असले तरी ते गाव काल्पनिकच असते आणि ब्रह्मपूरी हे काल्पनिक वाटणारे गाव सत्याचाच एक भाग ठरते. ब्रह्मपूरीतले डॉ. रामटेके हे एक वास्तव म्हणून लेखक स्वीकारतो. दलितांविषयी शांतारामांच्या मनात असलेली पारदर्शकता ह्या लेखातून व्यक्त होते. शांताराम हे माणूसप्रिय व्यक्तिमत्त्व आहे. त्यांना माणसं आवडतात. माणसांच्या जातीधर्मांच्या भिंती त्यांच्या अनुभव घेण्याच्या आणि मानसिकतेच्याही आड येत नाहीत. माणसांविषयीचा करुणाभाव आणि सहानुभूती शांतारामांच्या लेखनातून प्रकटते. अनेक सुखदुःखाच्या आठवणींतून शांतारामांचे डोळे पाणावतात. म्हातारपणातही डोळे पाणावणं, हेच खरं तर लेखकाच्या अथांग मनाचं दर्शन घडवतं. शांतारामांचं आत्मपर लेखन हे पिकलेल्या रसरशीत आंब्यासारखं आहे. कुणालाही ते चविष्ट आणि रुचकरच वाटणार. तुकोबाही म्हणतात, खादल्याची गोडी देखिल्याशी नाही. शांताराम आपल्या आयुष्यातल्या अनुभवांना चिरंतनशिल्पांच्या रूपात जतन करतात. वाचकांनाही त्यांचे अनुभव आपलेसे वाटतात. कुण्याही सर्वसामान्य जीवनावर प्रेम करणाऱ्या शांतारामांचं आत्मपर लेखन समृद्ध करणारं ठरतं.

वस्तुचित्रण आणि व्यक्तिचित्रण

शांतारामांच्या आत्मपर अनुभवात देशविदेशातील माणसांना जसे स्थान आहे तसेच ते भोवतालच्या जड वस्तूमात्रांनाही आहे. आनंदाचा शोध घेत भटकंती करणारा आणि अनुभवातून स्वतःचं व्यक्तिमत्त्व घडवणारा हा लेखक स्वतःपेक्षाही दुसऱ्यांचे मोटेपण मान्य करतो, ही लक्षणीय बाब मानावी लागते. दोन विद्वानांचं आपसात पटत नाही असं म्हटलं जातं. परंतु शांताराम मात्र अनेक विद्वानांसोबत राहून आणि त्यांच्याशी चर्चा करूनही विनयशीलपणे त्यांच्याशी समरस होत त्यांच्या स्वभावातील गुणांचा शोध घेतात. वैगुणांचाही निर्देश तितक्याच नम्रतेनं करतात. अशावेळी त्यांची शैली काहीशी खेळकर आणि विनोदी रूप धारक करते. शांतारामांना अनेकांचा सहवास लाभला आहे. चिंतामणराव देशमुख, मोरारजी देसाई, रमेश तेंडूलकर, सचिन तेंडूलकर, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. वि. भी. कोलते, डॉ. प्रभाकर उध्वरिषे, कवी अनिल, डॉ. शं. गो. तुळपुळे, डॉ. वा. वी मिराशी अशा अनेक क्षेत्रातील नावाजलेल्या लोकांसोबत शांतारामांचा संबंध येतो. भटकंती करणारा आणि जीवनाचा मनमुरद आनंद लुटण्याची भावना नेहमीच मनात ताजीतवानी ठेवणारा हा जिंदादिल लेखक विद्यार्थी, पालक, शिक्षक, लेखक, शास्त्रज्ञ, राजकारणी, दलित, आदिवासी, विद्यापीठीय अशा निरनिराळ्या सामाजिक आणि लौकिक क्षेत्रातील लोकांना या ना त्या कारणाने भेटतो. त्यांच्याशी बोलतो. त्यांच्या सोबत राहातो. सर्व स्तरात उठबस करणारा हा लेखक आहे. माणसांविषयी प्रेम, जिव्हाळा, करुणा, दया, क्षमा अशा मानवी भावनांनी काठोकाठ भरलेला अमृताचा पेला आपल्या व्यक्तिमत्त्वात रिचवणारा हा लेखक आहे. जराही कुठे तुच्छतावादी भावना लेखकाच्या मनाचा तावा घेत नाही. ही निरलस आणि खुली जीवनवादी दृष्टी आहे, म्हणूनच ती शांतारामांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव बनली. तिचाच एक समृद्ध आविष्कार त्यांच्या लेखनविश्वातून झालेला आहे.

शांताराम व्यक्तिचित्रणासोबतच वस्तूचित्रणही करतात. त्यांच्या अनुभवातली वस्तू वाचकांच्या डोळ्यासमोर जिवंत उभी राहाते. खाण्यातल्या आणि दैनंदिन जगण्यातल्या अनेक वस्तूंना मूर्त आकार देण्याचे लेखकाचे सामर्थ्यही माठे आहे. आंगावर घालायच्या कपड्यांपासून तर फराळ्यातल्या आलूबोंड्यांपर्यंत शांताराम वस्तूंचं वस्तुनिष्ठ चित्रण करतांना दिसतात. आलूबोंड्याचं एकच उदाहरण पुरेसं आहे. आमच्या खाद्यसंस्कृतीचे सर्वात मोठे प्रतीक म्हणजे आमचा आलूबोंडा. या आलूबोंड्याला मुंबई वगैरे भागात बटाटावडा म्हणतात. हा केवळ भाषेचा भेद नाही. थेट मूलतत्त्वाचीच बाब आहे ही. महाल भागातला आलूबोंडा म्हणजे एकमेवाद्वितीय अशी चीज होती. तसा मी कधीकधी संध्याकाळी धंतोलीत म्हणजे तथाकथित सुसंस्कृत भागात गोविंदराव दोडक्यांच्या बरोबर

आनंदाश्रमातला आलूबोंडाही खात असे. पण तो म्हणजे मूळ वस्तूची एक नक्कल, बरीच सौम्य प्रकृतीची नक्कल. जिथे गावातल्या गावात हा फरक, तिथे दूरस्थ मुंबई - पुण्यातल्या मिळमिळीत बटाटेवड्याची काय बात ? बटाटेवड्यावरोबर बारीक बारीक तळलेल्या मिरच्या वाटल्यास वरुन खायची पद्धत तर अजिबात उपरी. आलूबोंड्यात गळा तेज मसाला आत ठासून भरलेला. तो खावून झाल्यावर पाणी प्या की चहा प्या, जीभ, ओठ, डोळे त्यानंतर किती तरी वेळ झणझणत राह्यचे असा तो आलूवोंडा, महालातल्या आलूबोंडा घाट्यांच्या हॉटेलचा आलूबोंडा (टे.चि.१७-१८). शांताराम हे मूळचे विदर्भनिवासी आणि विशेषतः चंद्रपूर, नागपूर, अमरावती भागाशी त्यांचा अनेक वर्षांपासूनचा जवळचा संबंध. त्यांचं विदर्भातल्या झणझणीत रस्सेदार आलूबोंड्यावर विशेष प्रेम असणं अस्वाभाविक नाही. आलूबोंड्याच्याही संस्कृतीचं सूक्ष्म असं दर्शन त्यांनी घडवलेलं आहे. सुसंस्कृःत आळीत मिळणारा मिळमिळीत आलूबोंडा आणि सामान्य वस्तीच्या भागात मिळणारा झणझणीत आलूबोंडा केवळ समाजातील विविध सामाजिक स्तरात जगणाऱ्यांचीच संस्कृती करतो असे नाही तर त्या त्या भागाची सामाजिक आणि सांस्कृतिक महत्ताही त्यातूनच लक्षणेने व्यक्त होते.

लोकांवर प्रेम करणारा हा लेखक उत्तम खवैयाा आणि शानशौकी मिजास बाळगणारा असल्याचं दिसतं. जगात जे जे चांगलं खाण्याचं आहे ते ते खावं अशी ह्या लेखकाची वृत्ती असते. खाणं, पिणं, मौज करणं, आनंद लुटणं ही अशा लोकांची जिंदादिली असते. त्याच गोष्टी काही लोकांसाठी विकृतीचेही निमित्त बनतात. परंतु अत्यंत समजूतदारपणे शांताराम जीवनातल्या मौजेकडं पाहातात. हा समंजसपणा त्यांच्या लेखनातून समाजात जर झिरपला तर खरोखरच समाजाचं आजचं बिघडलेलं स्वास्थ काहीअंशी तरी ताळ्यावर येवू शकतं. नेमाडे म्हणतात, तशी लेखन ही जर कृती असेल तर शांतारामांचं आत्मपर आणि अन्यही लेखन सामालिक उत्तरदायित्वाची एक मोटी कृतीच ठरते. शांतारांच्या लेखनात जसं शहाणपण आहे, खिलाडूवृत्ती आहे, निरागसता आहे, पारदर्शक आहे तसेच त्यांच्या लेखनात लेखकाच्या नैतिकतेचा समृद्ध आविष्कार असून, समाजाच्या सांस्कृतिक संवर्धनाची एक उमदी चाहूलही आहे.

अकृत्रिम आणि स्वाभाविक आत्मपर ललित लेखन

मराठीत ललित लेखनाशी निगडित असणारे सर्वच प्रकारचे लेखन हे तिच्यातील अंगभूत काव्यात्मतेमुळे नावाजले जाते. ललित लेखनाची मराठी परंपरा हीच मुळी कृत्रिम अशी काव्यात्म लेखनाची परंपरा होती, हे खूप उशीरा मराठीतल्या लोकांना कळले. (त्यात लेखक आणि समीक्षकही आलेत) परंतु शांतारामांना मात्र खूप आधीच ललित लेखनातील कृत्रिमतेची जाणीव झाल्याचे दिसते. आज शांताराम यांचे वय ऐंशी - ऐक्यांशीच्या घरातले

आहे. ललित लेखनाची भरभराट ही सन् १९५० ते १९६० च्या दशकातली. एकूणात शि. म. परांजपे- खांडेकर - फडके अशी ही लघुनिबंध - गुजगोष्टींची म्हणजेच काव्यात्म ललित लेखनाची परंपरा. गद्य अलंकारिक करून काव्याच्या पातळीवर त्याची मांडणी करण्याचा प्रयत्न ह्या ललित लेखन परंपरेतील लेखकांनी केला. भाषेतील काव्यात्मतेला - अलंकारिक जडणघडणीला विशेषच महत्त्व दिले गेले. परिणाम ललित लेखनात कृत्रिमपणे लालित्य शिरलं आणि गद्याचं ललितपण मात्र हरवलं. केवळ कृत्रिम काव्यात्मता म्हणजे ललित लेखन नव्हे, हे समजायलाही मराठीतल्या लोकांना पन्नास वर्षे लागली. ह्याच पिढीशी समकालीन असणाऱ्या के. ज. पुरोहितांना मात्र, गद्यातलं लालित्य हे काव्यात्मतेवर, भाषेच्या अलंकारिक जडणघडणीवर, कृत्रिम भावभावनांच्या खोट्यानाट्या तरल आणि भावुक अनुभवांवर अवलंबून नसते, हे खूपच लवकर कळले. शांतारामांची अनुभवांच्या अभिव्यक्तीची भाषा ही दैनंदिन जीवनाशी निगडित आहे. तरी तिच्यात अकृत्रिम लालित्य आहे. स्वाभाविक ओघ आणि हृदयाला हात घालण्याची शक्ती आहे. गद्य कायम ठेवणारी अकृत्रिम काव्यात्मताही आहे. उदा. पेरू या लेखात लेखक म्हणतो, ''आजही घराबाहेर पडताना खिशात पैसे असतात. पेरू दिसले की विकत घेतो. (आता चोरीचा विचारही मनात येत नाही.) पण सारखे आठवते ते पिलीच्या बागेतल्या माळ्याचे वाक्य, 'बाजारात चोरी करायची असेल तर खिशात पैसे पाहिजेत.' हे खरे आहे. असे का व्हावे कळत नाही. माझ्या गोड आठवणीतले हे मीठ. पुष्कळांना पेरुबरोबर मीठ लागते. माझ्या आठवणीतच असे मीठ आहे. ते नको म्हटले तरी मला पुरते.'' (टे. चि. पृ. १२) त्यांच्या संबंध आत्मपर किंबहुना ललित लेखनाने मराठीतल्या कृत्रिम काव्यात्म ललित लेखनापासून अलिप्त राहून आपली एक स्वतंत्र अशी समांतर वाट निर्माण केली आहे. भाषिक परिपक्वता हा या वाटेवरील थांबा आहे. शांतारामांची केवळ भाषाच परिक्व आहे असे नाही तर त्यांच्या आठवणींची मांडणीही चिंतनशील आहे. कल्पित या एक अर्थकारणामुळे या राजवटी पडल्या असं लोक म्हणतात. खरंही असेल. मला मात्र सतत वाटतं कल्पना आणि सत्य, मिथक आणि तथ्य, वर्तमान आणि भूत यांचा तिथं जो विसंवाद, विरोध होता त्यामुळेच सगळी उलथापालथ झाली असावी.'' (आ.पा.पृ.११८)

शांतारामांच्या लेखनात थोर विनोदी लेखक निर्माण करतात तसा विनोद नाही. घटना - प्रसंगाला अनुरूप सहजस्वभावी विनोद त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य ठरते. अर्थातच त्यांच्या लेखनातील विनोद हे आपल्याच दैनंदिन जीवनातले असतात. जसे घर नसलेले घर या लेखात शांताराम म्हणतात, ''माझे जेष्ठ मित्र डॉ. वि. भि. कोलते मला घर बांधण्यासंबंधी एक विनोदी सूत्र वारंवार सांगत असत. त्यांना घरे बांधण्याच्या बऱ्यापैकी अनुभव असल्यामुळे ते सूत्र मी त्यांच्याकडून अनेकदा ऐकले होते. त्यांच्या मते घरबांधणीत तीन अवस्थांतून आपल्याला संबंधित लोक नेत असतात. त्यांचा उद्देश असतो पहिल्यांदा

अनुक्रमणिका

सुतवणे. (म्हणजे गुणा, सूत इत्यादींच्या सहाय्याने जुन्या पद्धतीचे मोजमाप घेणे). त्यानंतर गुतंवणे (म्हणजे घर बांधायला निघालेल्या माणसाला त्या व्यवहारात गुंतवणे) आणि शेवटी कुथवणे (त्याचा अर्थ सांगायला नको).'' (ठे. चि. १०४) याच लेखसंग्रहात ओटी या लेखात लेखक म्हणतो. ''मी धोतर वापरतो याचे अनेकांना आश्चर्य वाटते. कारण साधे आहे. मी अजून धोतर सोडलेले नाही.'' (ठे. चि. १६१) शांतारामांची लेखनशैली कलात्मकतेपेक्षा जीवनसापेक्ष भाषिक सहजतेला महत्त्व देते. भाषेत ओघ, ओज, तेज, निरलसता, वोलीभाषेचा गोडवा, उपरोध, व्यंग, सहजता अशा अनेक गुणांनी शांतारामांची भाषा वाचकांच्या मनाचा ठाव घेणारी आहे. व्रात्यस्तोम पासून तर ठेवणीतल्या चिजापर्यंतचा त्यांचा प्रवास हा कुठेही आपली सहजता गमावत नाही. उलट सहजतेची वाट पुढे पुढे अधिकाधिक सौंदर्यशाली आणि हृदयस्पर्शी होतांना दिसते. ठेवणीतल्या चिजा हा त्यांच्या लेखनगुणांची महत्ता कळसाला पोहोचविणारा संग्रह आहे.

शांतारामांच्या लेखनावर काहीसा पारंपरिक मराठी ललित लेखनाचा प्रभाव आहेच. तो नाकारता येणार नाही. परंतु या प्रभावाचे स्वरूप मात्र अंशतः ललित लेखकांच्या भाषिक खुब्यांशी निगडित आहे. भाषिक कृत्रिमतेशी मात्र त्यांच्या भाषेचा आणि ललित लेखन शैलीचा दूरान्वयानेही संवंध जोडता येणार नाही. शांतारामांचे जीवनसंवद्ध असे व्यक्तिमत्त्वच त्यांच्या ललित लेखनातून साकार झाल्यामुळे आणि नैतिकता हाच त्यांच्या लेखनाचा आधार प्रासंगिक आणि सदरातून आलेले असले तरी त्यांच्या मनातला प्रामाणिक, परिपक्व, पारदर्शक आणि खऱ्या अर्थाने नैतिकतेची उंची गाठलेला लेखकच आपल्या जीवनभरच्या अनुभवांनी निखळपणे व्यक्त झालेला आहे. ह्या लेखकाला व्याजवास्तवाची आणि कृत्रिम अशा काव्यात्म भाषाशैलीची गरज न जाणवण्याचे कारणही; जीवनात अस्सलपणे अनुभव घेण्याच्या आणि त्या अनुभवांनी आपलं व्यक्तिमत्त्व संपृक्त करण्याच्या आंतरिक शोधप्रक्रियेत सापडते. अनुभवांशी भिडण्याची खिलाडूवृत्ती आणि होय मनाशी संवाद आपुलाचि वाद आपणाशी तसेच सत्यअसत्याशी मन केले ग्वाही मानियेले नाही बहुमता, ही तुकोवाप्रणित अनुभव शोधाची आणि आत्मप्रतीतीतून त्यांची मांडणी करण्याची समंजस जाण शांतारामांच्या ललित लेखनाचे प्राणतत्त्व आहे. शांतारामांचे लेखन म्हणजे जिवंत असलेल्या माणसाच्या अंतःकरणातील श्वासोच्छवास होय. अशा सार्वकालिक आत्मप्रत्ययी लेखनाने समाजही सुसंस्कृत होत असतो. शांतारामांच्या लेखनाची महत्ता

एकूणच मराठीत शांतारामांनी केलेले आत्मपर लेखन आपली स्वयंसिद्ध गुणवत्ता सिद्ध करणारे आहे. सन् १९५० ते १९७५ च्या दरम्यानच्या आत्मचरित्रात्मक लेखनाचा आढावा घेतांना डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी, ''समकालीन आत्मचरीत्र हा समकालीन वाङ्मय आणि वाङ्मयाभिरूची यांच्याशी कमीत कमी नाते सांगणारा लेखनप्रकार आहे.

अनुक्रमणिका

"१७ तसेच," कथा - कादंबरी आदी वाङ्मय प्रकारांचा आढावा घेतांना आपण उमेदीच्या समकालीन प्रतिभावंतांच्या सहवासात असतो. आत्मचरित्राचा असा आढावा घेतांना आपण ज्येष्ठ पण उमेद संपत आलेल्या प्रतिभावंतांच्या सहवासात असतो. ते खरोखरच गेल्या पिढीचे आत्मकथन असते." असे म्हटले आहे. १८ हे जर खरे मानले तर असे म्हणता येईल की शांतारामांनी आत्मचरित्र न लिहिता आत्मपर ललित लेखन केले हे बरेच झाले. ते ज्येष्ठ लेखक असले तरी समकालीन वास्तवचित्रणामुळे आणि त्यांच्या लेखनातील माणुसकीच्या जिव्हाळ्यामुळे त्यांचे आत्मपर लेखन हे कुण्याही माणसांवर प्रेम करणाऱ्याला आपल्याच अनुभवनाचे प्रतिबिंब वाटावे, असेच झालेले आहे.

डॉ. चंद्रशेखर जहागिरदांनी ललित लेखनाविषयी एक तक्रार नोंदवली आहे. "लालित्याच्या वाङ्मयीन संकेतांनी युक्त असलेल्या भाषेतून होणारा आत्माविष्कार हे मराठीतल्या बऱ्याचशा ललित गद्याचे वैशिष्ट्य असल्याचे दिसून येते. ललित गद्याला कोणत्याच विषयाचे वावडे नाही, अनुभवांच्या कुठल्याही प्रांतात ते संचार करू शकते, असे नेहमी केले जाणारे एक विधान आहे. खरी गोष्ट अशी आहे की, बहुतेक ललित गद्यात एखादे समग्र व्यक्तिमत्त्व वास्तवाचे विविध पैलू पाहून त्यानुसार स्वतःचे बहुविध स्वरूप प्रक्षेपित करत आहे, असे आपणास दिसत नाही." १९ जहागिरदारांच्या ह्या मराठीतल्या ललित लेखनाच्या तक्रारीपासून काहीसे दूरस्थ उभे राहून शांतारामांनी कलेले आत्मपर ललित लेखन हे माणसाविषयीच्या आत्मकळवळ्यातून साकार झालेले आहे. शांतारामांच्या समग्र जीवनसंवद्ध व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू त्यांच्या लेखनातून व्यक्त होतांना दिसतात. हीच त्यांच्या ह्या स्वरूपाच्या लेखनाची महत्ता आहे. शांतारामांचं लेखन कधीच म्हातारं होवू शकत नाही. ते सदैवं चिरतरुणच राहाणार आहे. कारण त्यांच्या लेखनातलं तरुण मन हे कालातीत आहे.....

□□□

डॉ. किशोर सानप,
श्रीनिवास कॉलनी रोड, रामनगर, वर्धा - ०१

संदर्भ

१. द. भि. कुळकर्णी, मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, पॉप्युलर, मुंबई, १९८६ पृ. १९०
२. तत्रैव, पृ १९१
३. तत्रैव, पृ. १९१
४ आनंद यादव, आत्मचरित्र मीमांसा, मेहता, पुणे, १९९८ प्रस्तावना
५. तत्रैव, प्रस्तावना
६. तत्रैव, प्रस्तावना
७. तत्रैव, पृ. २६

८. तत्रैव, पृ. १४०
९. अ. द. वेलणकर, आजचे मराठी साहित्य, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, १९९५, पृ. १२०
१०. आनंद यादव, उनि., पृ. १४०
११. निशिकांत मिरजकर, मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, उनि, पृ. २१६
१२. भालचंद्र नेमाडे, मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, उनि, पृ. २२३
१३. तत्रैव, पृ. २२२
१४. चंद्रशेखर जहागिरदार, मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, उनि. पृ.२२५
१५. अशोक केळकर, मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, उनि, पृ. २१३
१६. के. ज. पुरोहित, आठवणींचा पार, ऋचा प्रकाशन, नागपूर, प्रस्तावना
१७. द. भि. कुळकर्णी, उनि, पृ. २०१
१८. तंत्रैव, पृ. २०१
१९. चंद्रशेखर जहागिरदार, उनि, पृ. २०६



आनंदाचा क्षण

शांताराम

पहिल्या प्रथम मी आपले आभार मानतो. याचं कारण असं की अमिताभ असं म्हणाला की, तुमच्या लिखाणावर एक मी चर्चासत्र ठेवतो. मी म्हटलं, 'थांब, घाई करू नकोस. तुला भीती वाटते काय ? मी अजून बरेच वर्ष टिकणार आहे.' त्याप्रमाणे मी वागलो. पण आता मी असं म्हणून शकत नाही का मी बरीच वर्ष टिकणार आहे. त्यामुळे मी तयार झालो आणि हा माझ्या आयुष्यातला अत्यंत आनंदाचा क्षण आहे. थोडे दोष आहेत त्याच्यामध्ये.

हे तिन्ही निबंध चांगले आहेत. परंतु त्यामध्ये माझे काही दोष दाखवायला पाहिजे होते. त्यामुळे मला काही कमीपणा येत नाही. मी संत पणानं वाढलेला माणूस आहे. आणि पुष्कळशा चुका करत करत सुधारत गेलेला माणूस आहे. प्रत्यक्ष आयुष्यातदेखील. त्याहि कथारूपानं आलेल्या आहेत. आता कुठली कथा माझ्याबद्दलची आहे हे मी सांगू शकत नाही. एक फरक असा आहे, की अशा प्रकारचं जे काही लिखाण आहे, ते करवून घेण्यात आलेलं आहे आणि याला संपूर्णपणे संपादक जबाबदार आहेत. तरुण भारतचे संपादक, युगवाणीचे निरनिराळे संपादक, मौजेचे संपादक. दिसामाजी काहीतरी मी मौजेत लिहित होतो. फार वर्षांपूर्वी आणि त्यांची अशी पद्धत

अनुक्रमणिका

आहे- सर्व तावून सुलाखून, तपासून वगैरे. त्यांच्यात ते श्रीपाद जोशी हे संपादक होते. गडकरी हे संपादक होते. टिकेकर दर रविवारी येत त्यांच्याकडे माझी मैफल असते पण या संपादकांनी हे लिहून घेतलय. आणि तो प्रकार जसजसा वाढत गेला तसतशी मी एकप्रकारची सोबत केली आहे. इथे मराठीचे जे प्राध्यापक आहेत त्यांच्यासाठी म्हणून, तुमच्यासाठी म्हणून एक गोष्ट सांगतो. ''मी स्वतः वैयक्तिक तरल निवंध लिहिण्याचं जे श्रेय, आपण जे विंदा करंदीकरांना देता, ते ऐतिहासिकदृष्ट्या बरोबर नाही. ते गो. रा. दोडक्यांनी द्यायला पाहिजे. 'गाभारा' आणि 'माहेरवाशीण' हे दोन त्यांचे निबंध, तो एक अलक्षित मनुष्य असा आहे.'' मी विंदांचं मोठेपण हिरावून घेवू इच्छित नाही. पण मी वस्तुस्थिती तुम्हाला सांगतो, 'सावळाची रंग तुझा' या नावानी माझा अनेक वर्षांपूर्वी लघुनिबंधसंग्रह वीणा प्रकाशननी प्रसिद्ध केला होता. त्याला मुळगावकरांचं चित्र होत हे लक्षात ठेवा मुळगावंकरांची चित्र आठवण असलीत तर ते चित्रच महत्त्वाच असे, पुष्कळदा आतला मजकूर नसे. अशा तऱ्हेचं मिश्र लिखाण त्यांनी केलय. साहित्य अकादमीसाठी प्रातिनिधिक मराठी लघुनिवंधसंग्रह मी संपादित केला. या माझ्या एकमेव पुस्तकाच्या अनेक आवृत्या निघाल्या. ज्याच्यातून मला काडीभरहि फायदा झाला नाही. पण त्या सगळ्यातून मी बाहेर असा पडलो, की हे जे रूप आहे, हे आपलं नाही. ते मी लिहिले नाही, असं मी म्हणत नाही. पण ते आपलं रूप काय आहे ? असे अनुभव येतात. ठायी ठायी अनुभव येतात. मी एक अवांतर अनुभव सांगतो. म्हणजे त्यामुळे मी माझा एक लेख खर्ची घालतोय असं समजा तुम्ही ! माझ्या बऱ्याच लोकांच्या ओळखी आहेत हे खरं आहे. त्या होत गेल्या. तर, ही आपली निवृत्तीवेतन वगैरे ही गोष्ट माझ्यासाठी चुटकीसरशी व्हावी अशी गोष्ट आहे अशी लोकांची समजुत होती. तसं काही झालं नाही. कारण ते सरकारी जो आदेश आहे, त्यात असं लिहिलंय की ह्याच्यात जे काही पैसे येतील तर माझे जे कायदेशीर वारस आहेत त्यांना मिळेल माझ्या नंतर. मग काळजी काय ? मी मुलाला सांगितलं की त्याच्यातून तुला जे काही पैसे मिळतील ते तू अर्धे ठेव आणि अर्धे वहिणीला दे. तर तो म्हणाला की नाही १०००० रूपये मी स्वतःसाठी जास्त ठेवीन. म्हटलं मान्य आहे - सर्व्हिसींग चार्जेस म्हणून. तर याचा असा किस्सा झाला की अनेक वर्षानंतर माझे कागद त्या ए. जी. च्या ऑफिसमध्ये गेले. ९२ वर्षाचे डॉ. ढेकणे म्हणाले की हे काही तुमचे बरोबर नाही. तुम्ही एकदम तिथे जा. मी गेलो. त्या भागात जायचंच होतं. मी गेलो. आले आहेत म्हणे तुमचे कागद. के. जे. पुरोहित. आता हा नंबर घ्या आणि येवू नका म्हणाले. कोणालाहि पाठवलं तरी होईल. तरी आता एकदा तो कागद आहे म्हटल्यावर मला लोभ सुटला. निमित्य पाहून मी गेलो. के. जे पुरोहित नाही म्हणाले कोणी. अहो म्हटलं कॉप्युटरावर माझं नाव आलं होतं. दावा म्हटलं कॉप्युटर. तर केशव जगन्नाथ पुरोहित यांच्यावरोवर कांतिलाल जयंतीलाल पुरोहित निघालं. आणि हे दोन

पुरोहित त्या बाईच्याकडे गेल्यामुळे त्यांनी ते दोन्ही कागद बाजूला सारले. अशी माझी बरीच परवड झाली. एकदा त्या बाई, चांगल्या मध्यमवयीन, स्मार्ट, त्या माझ्याकडं जरा विशेष नजरेनं बघायला लागल्या. का हो म्हणाले, अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे तुम्ही अध्यक्ष होता नं ? म्हटलं बाई आता त्याला खूप वर्ष झाली. खूप प्रॉब्लेम झाला. त्या म्हणाल्या आता तुम्ही यायचं कारण नाही. हा माझा घरचा फोन नंबर आहे. तुम्ही मला फक्त घरी फोन करा. आणि दहा दिवसांत ते काम झालं. असे अनुभव आपल्याला वारंवार येत असतात. आपण ते विसरून जातो. माझी मैफलीमध्ये गप्पा मारण्याची सवय आहे आणि कंबरेखालचे विनोद न सांगताहि मी तासन्तास गप्पा मारू शकतो. ही गोष्ट ज्या ज्या संपादकांनी ओळखली त्यातले श्रीपाद भालचंद्र जोशी आहेत. त्यांनी मला लिहितं केलं. आता झालय काय की लिहून, थोडसं आत्मपरीक्षण करून आता माझ्या बाबतीत एक भाषेचाहि आणि स्वतःकडे पाहण्याची तटस्थता आलेली आहे. आणि ती या लिखाणामध्ये उमटलेली आहे. आणि त्यामुळं मलाहि असं वाटतं की मराठीमधल्या उत्तम पुस्तकांपैकी मी एक लिहिलं असल्याचा संभव आहे. ती माझ्या तारुण्याची खूण आहे. इतर बाबतीमध्ये मी तरुण नाही हे मी तुम्हाला सांगतो. पण हे असं एखादं कच्चं वाक्य मी बोलतो. पण मला तरुण ठेवायला लिहिणं मला फार साथ देतं. त्याचा आविष्कार आहे. तो इतर बाबतीत तरुण पुन्हा व्हायची मला गरजहि वाटत नाही. कारण या वयातहि फार मौज असते. त्या वयाची मौज निराळी, आणि अशी मौज करता करता मी व्यक्तिवर येवू नये. इथं आपल्याला भान असलं पाहिजे. हे जे दारिद्र्य आहे; व्यक्तिवादी लिखाण हे त्या लिखाणाच्या मुळाशी असतंच. परंतु तिचा जर अतिरेक झाला, तर काही लिखाणाला तो परवडत नाही. आणि ते दारिद्र्य आलं असं आपण म्हणतो, तर त्याला आपण मध्यमवर्ग जबाबदार आहोत. पण आपल्या समाजापासून प्रयत्नपूर्वक दूर होतो आहे. म्हणजे पळूनच जातो आहे आपण. आपण जर पळून गेलो नाही आणि आपण जर इथेच राहणार असू, अशी जर आपली खात्री असली, त्याप्रमाणे जर आपण विचार करत असलो, चिंतन करत असलो तर तुम्ही म्हणता तसं दारिद्र्य राहणार नाही. माझ्या पिढीकडून अपेक्षा करणं बरोबर नाही. पण नवीन पिढीमध्ये विखुरलेलं टॅलेंट पुष्कळ आहे. पण त्याला तसा वाव मिळत नाही. आता एखादा महेश एलकुंचवार तर ठीक आहे! पण त्यालाहि काय होतं की मुंबई - पुण्याच्या लोकांनी जर त्याचा गुण ओळखला नसता तर मग कठीणच होतं. त्या प्रकारचं वातावरण नाहीये. ते खेड्यामध्ये येत आहेत, पण त्यामध्ये ते रुजायला काही दिवस लागतील. त्याचं काही एक संस्काररूप असं साधन असायला पाहिजे. ते नसल्यामुळं तुम्ही म्हणता तसं ते दारिद्र्य आहे. पण तुम्ही इतर वाङ्मयाचा इतिहास पाहिला, तर हे आपल्याकडेच झालं आहे असं नाहिए ! ते संबंध, म्हणजे मला सर्व देशांचा साहित्याचा इतिहास पूर्णपणे माहिती नाही.पण साधारण रशियन साहित्याची माहिती

अनुक्रमणिका

आहे. इस्ट - युरोपियन कंट्रीजची माहिती आहे. असे प्रकार तिकडे झालेले नाहीत असं नाही. आपला सध्या एक चमत्कारिक संक्रमण अवस्थेचा काळ आहे. तो जाईल. तो जाईल पण तो माझ्या पिढीकडून जाणार नाही. माझ्या पिढीचं जे प्रतिनिधिक धोरण आहे ते धोरण कमी झालं पाहिजे. सी. डी. देशमुखांचा, त्यांचा पुतण्या माझा मित्र असल्यामुळे म्हणाले, 'अरे सगळ्या विद्यापीठांमध्ये एकाच प्रकारची चर्चा होते. तेव्हा म्हटलं एकच विषय आहे.' त्यांचा विषय अर्थशास्त्र नव्हता. त्यांचा मुख्य विषय होता वनस्पतीशास्त्र आणि दुसरा विषय होता संस्कृत. तर ते म्हणाले, 'वनस्पतीशास्त्रातदेखील निरनिराळ्या तऱ्हेचे विचार व्यक्त करण्यात येतात तर साहित्यात का येवू नये ?' आपल्याकडे सर्व विद्यापीठांतून जवळजवळ तीच भाषा बोलण्यात येते. ते काही बरोबर नाही आणि ते करायला काही फार मोछा विद्रोह वगैरे करायची गरज नाही. साहित्यामधले विद्रोह हे जगामधल्या राजकारणातल्या विद्रोहासारखे नसतात हे लक्षात घ्या. हे जर आपल्या शिक्षकांच्या लक्षात आलं, तर आता पहा मुंबईला एलफिन्स्टन कॉलेजमधून मराठी विषय काढावा लागला. फार वाईट गोष्ट आहे. गणोरकर- डहाके यांच्यासारखे चांगले लोक तिथे असून अशी अवस्था उत्पन्न होणं यांच्यामध्ये काहीतरी चिंतेची बाब आहे. आता माझी मुलगी म्हणाली, 'बाबा आय टोल्ड यू दॅट यू राईट वेल, यू ॲण्ड गाडगीळ काका !' मी म्हटलं, नाही - ही राईट्स ए लिटिल वेटर दॅन आय डू ! मग मी तिला म्हटलं, मंदा ? ही पुस्तकं घे. हे मी देतो तुला ती वाच आणि मग ती वाचल्यानंतर माझ्याशी इंग्रजीऐवजी शुद्धलेखनाच्या चुका का करेल ? मराठीमध्ये लिहायला लागेल. असं आपण करीत नाही. आणि आपली कुठेतरी जवाबदारी आहे. असं आपण करत नाही. तोपर्यंत तेव्हा एखादा प्रतिभावंत केव्हातरी उत्पन्न होतोच. अन् तो बाजूला सारून या सगळ्या अडचणींना पुढे घालून. पण सर्वच लोकांनी विचार करण्याची गोष्ट आहे. ही काही फक्त इंग्रजीच्या किंवा मराठीच्या किंवा हिंदीच्या प्राध्यापकाची जबाबदारी नाही. ही जोपर्यंत आपण स्वीकारत नाही तोपर्यंत तुम्ही म्हणता तसं दरिद्री जगाचा इतिहास जर पाहिला. जगाच्या साहित्याचा, तर त्यासाठी एकदम ज्ञानेश्वर तुकाराम यांची नावं घ्यायची गरज नाही. बरं का ? ते एकदम ज्ञानेश्वर तुकारामापर्यंत जाण्याच्या ऐवजी आपण जर टप्प्याटप्प्यानं गेलो आणि त्याची जाण असली, तर पुष्कळसं सोपं होईल. आता इथे एक माझी सवय आहे. कार्यक्रमाला किती लोक होते ते मी मोजत असतो. ज्याचे फार मोठे वृत्तांत मुंबईच्या वर्तमानपत्रांतून येतात त्यात किती लोक असतात हे तुम्ही मला विचारू नका. एखादा जर अपवाद सोडला, तर दोन खुर्च्यांच्या पलिकडे काही नसतं. बाकी मराठीचं आक्रमक स्वरूप तुम्हाला दिसतंच आहे. त्याबद्दल बोलणं काही चांगलं नव्हे. कारण मी तिथेच राहतो. मलाहि माझ्या सुरक्षिततेची काळजी घेतली पाहिजे. पण हा त्यातला भाग आहे. आता तो काय करायचा, कसा करायचा हे फार कठीण आहे. पण अशी परिस्थिती आहे.


हा विषय फार लांबण्यासारखा आहे.

पुन्हा एकदा आपल्या सगळ्यांचे, सुरेशचे, श्रीपादचे, तो महेश शेवटपर्यंत वसलेला आहे, त्याचे आभार....!

सुरुवात झाली ती मी सांगितलं तुम्हाला..... नावाची कथा लिहिली. गोंड माडिया लोकांचं नत्य होतं. ते मी पाहिलं अन्‌ त्यात साहेव लोक नाचत होते, ते मी पाहिलं; आणि त्यात जे नंतर झालं ते मला कळलं. त्यातनं मी सुरुवात केली. आज माझ्या कथालेखनांतून माझं मत फार चांगलं आहे. फार चांगलं आहे. थोडक्यात असं सांगायचं की, पहिल्यांदा मला असं वाटायचं की माझा उल्लख वहुतेक तळटीपामध्ये निश्चित राहील. तो तर टीपेच्या पुष्कळच वर जाईल, असं मला वाटतं. आता, आता यापेक्षा आत्मप्रशंसा मी काय करू ?

❑❑❑

- शांताराम



अनुक्रमणिका

महेश एलकुंचवार यांचे नाटक

◗ के. ज. पुरोहित

महेश एलकुंचवारांचे नाटक हे चितंन ' एलकुंचवारांची नाटके' या पेक्षा वेगळे आहे. ते वेगळे आहे म्हणजे सरस आहे असेही नव्हे. ते वेगळे कसे आहे पाहण्याची एक पद्धत म्हणजे इतर चिंतन कशी आहेत ते एकदा पुन्हा पाहणे. ती नाटके आहेत म्हणजे ती रंगभूमीवर यावी म्हणून लिहिली आहेत हे स्पष्ट आहे तसे नसते तर एलकुंचवारांची नाटकहा आपला मुख्य वाङ्मयप्रकार म्हणून निवडलाच नसता, नाटक हा लेखनप्रकार निवडल्यावर त्या प्रकाराला जी समीक्षा लाभते ती त्यांच्या नाटकांना मिळाली त्यांची नाटके सामान्यतः उच्च दर्जाची असल्यामुळे ही समीक्षाही उच्च दर्जाची आहे. एलकुंचवारांच्या नाटकात विविधता असल्यामुळे त्यांची समीक्षाही विविध प्रकारची आहे. या विविध प्रकारच्या समीक्षा थोडक्यात समजावून घेतल्या तर त्या किती पर्याप्त आहेत वा नाहीत हेही स्पष्ट होते आणि त्यापुढे जायला मार्ग प्रशस्त होतो.

पहिला विचार करावयाचा तो या नाटकांच्या वेगळेपणाचा. एकांकिका (सुलतान) लिहून त्यांनी आपला नाट्यसंसार सुरू केला. एकांकिका लिहिल्या कारण एकांकिका हा प्रकार त्यावेळचा कालस्वर होता. म्हणजे महेश एलकुंचवारांवर समकालीन प्रभाव होताच. एवढेच नव्हे तर सुरवातीला त्यांच्या नाटकांवर विजय तेंडुलकरांचाही

अनुक्रमणिका

प्रभाव होता. पण तो फार अल्पकाळ टिकला. मुख्य म्हणजे वरीचशी मराठी आधुनिक नाटके वाढवलेल्या एकांकिकाच असतात तशी त्यांची नाटके नाहीत. पाश्चिमात्य नाटकांच प्रभाव आहे पण ते त्यांच्या नाटकांचा गाभा कधीच झाला नाही. भोवतालच्या अमेरिकन नाटकाचा प्रभावही स्पष्ट जाणवतो पण असे असूनही त्यांचा प्रवास निश्चितच स्वतंत्र आहे हे मान्यच करावे लागते.

महेश एलकुंचवारांची नाटके कितपत प्रयोगशील आहेत ? व्यावसायिक रंगभूमीवर ती फार तगू शकत नाहीत. 'आत्मकथेचा' प्रयोग मी स्वतः गोव्यात बघितला तो गच्च भरलेल्या नाट्यगृहात 'युगांत' या नाट्यत्रयीतले ''वाडा चिरेबंदी'' हे नाटक वसंत कानेटकरांच्या नाटकासारखेच व्यवस्थित बांधलेले असूनही त्याची आशायाची मोठी खोली अबाधित साधली आहे. परंतु 'वाडा', 'मग्न तळ्याकठी' आणि 'युगांत' एकत्र पाहताना मानवी संबंधांच्या गाठी उकलणाऱ्या या नाटककाराच्या प्रतिभेने आपण स्तिमित होत असलो तरी एकूण नाट्यानुभव अतिशय जड, ओझ्यासारखा वाटतो. 'युगांत' एकटेच पाहिले तर येणारा नाट्यनुभव मात्र मनाला तृप्ती देणारा ठरतो. 'मग्न तळ्याकठी' प्रयोग दृष्ट्या फारसे यशस्वी झाले असेल तर मला माहित नाही. रंगभूमीवर महेशच्या नाटकांना मर्यादित यश मिळण्याचे कारण काय असावे ? आपल्या नाटकांत त्याने काही प्रयोग केले हे तर या प्रश्नाचे उत्तर नसेल ना ? उदाहरणार्थ रंगभूमीवरील अवकाशाची विभागणी. ती त्याने 'आत्मकथेत' केलेली आहे. तशी ती सर्वस्वी नवीन नव्हती. टेनेसी विल्यम्सच्या ग्लास मेनेजरी या नाटकाच्या मराठी अवतारात ती मराठी प्रेक्षकांनी पाहिलेली आहे. दुसरे प्रायोगिक उदाहरण द्यायचे तर नाटकावर परिणाम घडवणाऱ्या पात्राचे प्रत्यक्ष न दिसणे; हे महेशच्या 'सोनाटा' या नाटकात आहे. तसे हेही नवीन नाही. नाना जोगांच्या चित्रशाळेतल्या शोभाचे वडील असेच प्रेक्षकांना दिसत नाहीत. येथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. विल्यमंसूच्या नाटकात असे विविध प्रयोग असूनही त्याची नाटके केवळ प्रायोगिक रंगभूमीपुरती मर्यादित राहिली नाहीत वा व्यावसायिक दृष्ट्या माफक यशाचीच धनी झाली नाहीत. उलट ती व्यावसायिक रंगभूमीवर जोरात चालली; एवढेच नव्हे तर त्यांच्या नाटकांवरून केलेल्या चित्रपटांनाही घवघवीत लोकप्रियता आणि धनप्राप्ती झाली. एकूण विचार केला तर असे दिसते कि महेशची नाटके भारतातील आणि भारताबाहेरच्या भाषांत सन्मानाने केली जात असूनही एकूण त्यांचे यश मर्यादितच, प्रेक्षकांच्या दृष्टीने मर्यादितच म्हणावे लागेल. महेशला खरी मान्यता मिळाली आहे ती नाटकांच्या जाणत्या आणि अभ्यासू प्रेक्षकांकडूनच काही तरी नवीन करू पाहणारा, काही तरी नवीन सांगणारा, ते जुने असेल तरी नवीन तऱ्हेने दाखवणारा नाटककार म्हणूनच महेशची नाटके निर्विवादपणे स्वीकारल्या गेली आहेत.

जाणत्या प्रेक्षकानी हा स्वीकार कसा व्यक्त केला आहे हे पाहणेही मोठे उद्बोधक

आहे. महेश एलकुंचवार हे आधुनिक नाटककार आहेत कारण ते बुद्ध्या आधुनिक नाटके लिहितात या जाणीवेतून वर उल्लेखिलेला स्वीकार व्यक्त झाला आहे. त्यामुळे पहिल्यांदा लक्ष देण्यात आले ते त्यांच्या आधुनिक तंत्राकडे. यापैकी दोन बावींचा निर्देश पूर्वी झाला आहेच; त्या बाबी म्हणजे पात्रांचे न दिसणे आणि रंगभूमीवरील अवकाशाचे योजना पूर्वक केलेले विभाजन. त्यानंतर विचारात घेतल्या गेलेले तांत्रिक वैशिष्ट्य म्हणजे एलकुंचवारांच्या नाट्यातील संवाद पात्रे काय आणि कशी बोलतात या बरोबरच कधी कधी ती अजिबात बोलत नाहीत या विशेषाचीही चर्चा झालेली आहे. याच्याच थोडे पलीकडे जाऊन या नाटककाराच्या लेखनशैलीची काही चिकित्सा करणे अपरिहार्य ठरते. तशी चिकित्साही झालेली आहे. सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की एलकुंचवारांच्या नाट्यतंत्राने जाणत्या प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतलेले दिसते. या जाणत्या प्रेक्षकात नाटक पाहणारे आणि वाचणारे आणि नुसतेच वाचणारे असे दोन्ही प्रकाराचे लोक आहेत. त्यांच्या प्रतिक्रियांचा सारांश काढायचा झाल्यास त्या तंत्रवादी आहेत असे म्हटल्यास ते अन्याय ठरू नये.

जाणत्यांचा दुसरा मोठा वर्ग आहे तो एलकुंचवारांच्या नाटकांचा आशय शोधणाऱ्यांचा त्यांत दोन प्रकार दिसतात. एकाच्या मते ही नाटके म्हणजे लेखकाचा प्रवास आहे. अशा प्रकारचे विवेचन डॉ. आशा सावदेकर यांनी चांगल्या तऱ्हेने केलेले आहे. या प्रकाराच्या मताला पुष्टी यावी म्हणून त्यांच्या ललित निवंधांचा आधार घेण्यात येतो आणि 'न गंगासदृशं तीर्थम्' सारख्या 'प्रवास' वर्णनाची विशेष आठवण काढण्यात येते. हा जीवनाचा प्रवास म्हणजे एक शोध होय असे सागण्यात येते आणि ते रास्तही आहे. परंतु असे मत अतिव्याप्तीपासून स्वभावतःच मुक्त असत नाही. कारण प्रत्येक चांगल्या लेखकाविषयी, तो नाटककार, कवी कथाकादंबरीकार काही का असेना असे म्हणता येते. एलकुंचवारांच्या विषयी असे म्हणणे एवढ्यासाठी अयोग्य ठरत नाही. हा शोध मानवी नात्यांचा आहे हे विधानही योग्य आहे, ते पटणारे आहे. 'वाड्यातली' माणसे एकमेकांना नकोशी आणि ओझ्यासारखी झालेली असूनही त्यांची आतडे एकमेकांसाठी तुटतात, 'युगांत' मधली नंदिनी आपल्या पतीचा, परागचा गुन्हेगारी भूतकाळ मनःपूर्वक विसरते हे पटवून घेण्यात काहीही अडचण येत नाही. हे झाले वैध नात्यांचे, अवैध नात्यांचे, संवंधाचे, पार्टी, गार्वोमधल्या संवंधाचे काय ? ते संवंध सर्वसामान्य नसले तरी अनियोजित असले तरी, त्यांचा परिपाक एकमेकांना नकोसे होण्यात एवढेच नव्हे तर आत्महत्या, खुनात होत असला तरी ते समजून घेण्यात काही अडचण होत नाही. या संवंधाची माणसांच्या निर्मितिक्षमतेशी व अक्षमतेशी गुंतवणूक आहे हे ही थोड्या प्रयत्नाने आपण स्वीकारू शकतो पण वासनाकांड मधल्या भावावाहिणीच्या अवैध संवंधाचे काय ? एलकुंचवारांच्या नाटकावर काही काळ वंदी झाली होती ती कितपत बरोबर होती हे

येथे थोड्या बारकाईने तपासले पाहिजे. भावावहिणीचा संबंध हा अवैध तर खराच पण तो अनैसर्गिक आहे का असा धक्कादायक प्रश्न येथे उपस्थित करता येऊ शकतो. 'पार्टी', विशेषतः 'गार्बो' या नाटिकासंबंधी आपण निर्मितिक्षमतेचा, निर्मितिप्रक्रियेचा विचार करतो तसा वासनाकांडच्या संदर्भात करूच शकत नाही काय ? वेदात 'यमयमीसंवाद' आहे. तो जेव्हा लिहिला गेला असेल वा उच्चारला गेला असेल तेव्हा सामाजिक वादळ झाले असेल काय ? या प्रश्नाचे उत्तर ठामपणे नकारार्थी आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यानी लिहिलेला भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास ज्यांनी वाचला आहे त्यांना हे सहज कळेल की यमयमीसंवाद जेव्हा निर्माण झाला तेव्हा वादळ उत्पन्न होणे तर दूरच राहिले असावे, साधे तीव्र तरंग देखील उठले नसतील. म्हणजे आपल्या प्रतिक्रिया त्या त्या वेळच्या सामाजिक मान्यतांवर, विधिनिषेधांवर अवलंबून असतात. सामाजिक प्रतिक्रिया एलकुंचवारांच्या वाट्याला आलेल्या आहेतच. त्यातल्या काही तर तापदायक तर काही आल्हाददायक आहेत.

एलकुंचवारांच्या नाट्यावरील एक अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे. ''हा केवळ त्या एका कुटुंबाचा नव्हे तर एकूणच भारतीय कुटुंबव्यवस्थेचा, तीमधील मूल्यात्मक बदलांचा तद्वत अवघ्या मानवजातीच्या आस्तित्वाचाच शोध घेण्याचा प्रातिनिधिक प्रयत्न आहे. असा अभिप्राय कुणाही नाटककाला, कुणाही लेखकाला सुखावणारा असाच आहे. माझी स्वतःची प्रतिक्रिया या व्यक्तिविषयी मात्र तशी नाही. भारतीय

कुटुंबव्यवस्थेत जे बदल होत आहेत ते वरवरचे असूल अजून तरी मूल्यात्मक बदल झालेले आहेत असे मला वाटत नाही, दिसत नाही. आपली मूल्ये शतकानुशतके बदललेली नाहीत म्हणून तर आपली संस्कृती टिकली आहे. म्हणूनच माझ्या दृष्टीने 'युगांत नाट्यत्रयी' किंवा 'वासांसि जीर्णानि' मूल्यात्मक बदलासंबंधी नसून त्यांचे प्रयोजन कुटुंबाची पडझड दाखवणे हे आहे. एखादे घर पडते म्हणजे त्या घरातली मूल्ये जमीनदोस्त होतात असे नाही. 'वासांसि जीर्णानि'पेक्षा 'वाड्याची' पडझड अधिक विदारक वाटते कारण तो वाडा एका विशिष्ट भूप्रदेशातला आहे, वऱ्हाडातला आहे. या नाट्यवस्तूला हे सुद्धा त्याच्याविषयी वाटणाऱ्या आपुलकीचे खास कारण आहे. मला स्वतःला हे नाटक अधिक भावण्याच्या अनेक कारणांपैकी त्यांचे वऱ्हाडीपण महत्वाचे वाटते कारण मी मुळात वऱ्हाडचा आहे. या वैयक्तिक तपशीलाचा उद्देश एलकुंचवाराच्या बरोबर आपलेही नावगाव वाचकांनी लक्षात घ्यावे हा नाही. एखाद्या नाटकाविषयी वा नाटककाराविषयी वाटणारी आत्मीयता निरनिराळ्या प्रकारची असते हे येथे अधोरेखित करावयाचे आहे. एखाद्या भूप्रदेशामुळे वाटणारी आत्मीयता केवळ वैयक्तिक नव्हे. ही भौगोलिक आत्मीयता वैयक्तिक स्वरूपाचीही असू शकते हे खरे, वैयक्तिक आत्मीयता इतक्या परकोटीला जाऊ शकते की नाटकातील एखादे पात्र म्हणजे आपणच असे वाटू लागते. शेक्सपिअरचा हॅम्लेट म्हणजे

स्वतः आपणच असे कोलरिजला वाटले ते याच प्रकारचे होय. आपण स्वायन्त जीवन जगत आहोत असे वाटून त्यात अभिमान आणि आनंद मानणाऱ्या एका चांगल्या कथालेखिकेचे (मेघना पेठे यांचे) वाड्या संबंधीचे भाष्य येथे देण्यासारखे आहे. ते येणेप्रमाणे ''जीवन सुंदर करण्याच्या नादात प्रभाची शोकांतिका महेशने सुखांतिका केली नाही, आणि तिच्या कलात्मक विश्वासार्हतेशी तो बेइमान झाला नाही, यात महेशचे मोठेपण आहे. एका व्यक्ती - निरपेक्ष शहरात तरीही स्वायत्त आयुष्य मी जगते आहे, जगू शकते आहे, तरीही प्रभाच्या प्राक्तनाची दहशत एखाद्या सारखी माझ्या मनावर कायम असते. यातच त्या मोठेपणाची खात्री मला मिळते.''

या सगळ्या उदाहरणांवरून असे दिसते की एलकुंचवारांच्या नाटकासंबंधी होणाऱ्या प्रतिक्रिया नुसल्या विविधच नव्हेत तर परस्पर विरोधीही आहेत; सामाजिकतेपासून तो वैयक्तिकतेपर्यंत. या प्रतिक्रिया या नाटकांतील संवादांमुळे, स्तब्धतांच्यामुळे, अवांतर विचार प्रकटनामुळे निर्माण झालेल्या आहेत. एखादा न्यायाधीश आपल्या निकालाशी संबंधित मुद्दे जसे मांडतो तसेच अवांतर मुद्देही मांडतो कारण त्याला तसे स्वातंत्र्य असते. नाटककारानाही हे स्वातंत्र्य उपलब्ध असते असे मानणाऱ्यापैकी एलकुंचवारही एक आहेत, या सर्व घटकांमुळे त्यांच्या नाटकांचे निरनिराळे अर्थ निघू शकतात आणि तसे निघालेही आहेत. म्हणजे या नाटकांत अनेकार्थतता आहे असे म्हणता येईल. या वैशिष्ट्याला संदिग्धता असेही म्हणता येईल. या संदिग्धतेचा स्वीकार सर्वच वेळी सारखा होईलच असे नाही. तिच्यामुळे काही वादही निर्माण होतील. कधी या वादाची जवाबदारी लेखक घेईल; कधी तो घेणार नाही. आता जर मी ते नाटक लिहिले असते तसे लिहिलेच नसते', 'त्यावेळी माझ्या मनात काय होते हे आता आठवत नाही' अशा तऱ्हेची विधाने करुन जवाबदारी झटकून देण्याची सोय अशा प्रकारच्या संदिग्धतेत असते. जाबाबदारी झटकण्याची ही क्रिया लेखक लीनतेने करू शकतो. त्यामुळे वाचक प्रेक्षक नाटकाच्या प्रेमात पडोत न पडोत ते नाटककारावर मात्र खुष होतात. अशा प्रकारचे भाग्य महेश एलकुंचवारांना लाभले आहे. अशा भाग्यवान नाटककराने, विशेषतः या भाग्यावर सरस्वतीसन्मान सारख्या आखिल भारतीय गौरवाचे शिक्कामोर्तब झाल्यावर अघोबित प्रेषित, वडा, बंडखोर वा महान शिक्षक यापैकी कोणतीही भूमिका व तीनही भूमिका, कधी एकत्र तर कधी निरनिराळ्या वेळी केल्या तर शोभून जाण्यासारखे आहे. पण तसे त्यांनी काही केलेले नाही. साहित्य विषयात डॉक्टरेट मिळविणाऱ्यांची थट्टा तेवढी त्यांनी केलेली आहे. पण अशा थट्टा करणारे ते एकटेच नव्हते. स्वतः डॉक्टर नसणारे त्याच्या माझ्यासारखे दुसरे काय करणार ? अर्थात सन्माननिय डॉक्टरेट मिळण्याची सोय आहेच. प्रबंध लिहून डॉक्टरेट आणि सन्माननिय डॉक्टरेट अशा दोन्ही त्यांना मिळाल्याशिवाय एलकुंचवारांच्या टीकात्मक विधानांना मोठा धारदारपणा येणार नाही. याला पुरावा काय

अनुक्रमणिका

? पुरावा आहे तो त्यांनी स्पष्टपणे केलेल्या दोन विधानांचा ती दोन विधाने खळवळ माजवणारी मुळीच नाहीत कारण ती समजायला तेवढी सरळ नाहीत. ही दोन विधाने खरोखरच दोन आहेत की एक हे तपासण्यापूर्वी ती काय आहेत हे पाहणे आवश्यक आहे. प्रत्येक नाटकाच्या दृश्य, सहज उपलब्ध अशा संहितेवरोवरच एक उपसंहिता असते असे पाहिले विधान. असे शब्द एलकुंचवार वापरतात. या उपसंहितेला नाटकाचा अंतर्नाद म्हणता येईल काय ? अंतर्नाद या संस्कृत शब्दाऐवजी 'आतला आवाज' हा मराठी पर्याय वापरता येईल काय ? हे ही उपसंहिता हा अंतर्नाद, हा आतला आवाज कोणासाठी असतो ? नाटककार, दिग्दर्शक, नट, प्रेक्षक या सर्वांसाठी तो असतो का ? असे काही प्रश्न एलकुंचवारांच्या पहिल्या विधानाला घट्ट चिकटून आहेत. दुसरे विधान किंवा विधाने एलकुंचवारांनी निरनिराळ्या संदर्भात केलेली आहेत. त्यांचा संबंध संवादांत येणाऱ्या, संवादांसह येणाऱ्या स्तब्धतेशी, विरामांशी आहे. हे विराम वाक्यानंतर, वाक्यांमध्ये, शब्दांनंतर, शब्दांमध्ये एवढेच काय (आत्यंतिक उदाहरणांच्या रूपांत) दोन विरामांमध्ये येऊ शकतात. हा अनाहत नाद अर्थातच योगातला नव्हे. त्यांचा संबंध काव्याशी, संगीतांशी वेगवेगळ्या रीतींने वा एकत्र रीतींने कसा येतो हे पाहण्यासारखे आहे.

या ठिकाणी एक नोंद करणे अगत्याचे आहे. नाटकाच्या मूळरूपाची ज्यांना अतिशय स्थूल माहिती आहे अशांच्या मनात गोंधळ निर्माण करण्याची क्षमता एलकुंचवारांच्या विधानांत आहे. त्याचे कारण नाटकासंबंधी सामान्यपणे रूढ असणारी स्थूल जाणीव हेच. वस्तुतः एलकुंचवारांच्या विधानांना फार मोठी परंपरा आहे; पश्चिमात्य आणि भारतीय अशी दुपडी परंपरा आहे. पाश्चिमात्य साहित्यशास्त्राचा मूलाधार असा जो ॲरिस्टॉटलचा (काव्यशास्त्र) ग्रंथ आहे त्यांचा संबंध नावापुरता काव्याशी असला तरी प्रत्यक्ष ग्रंथ नाटकाविषयी आहे. महाकाव्याची त्यातली चर्चा जुजबी असून, त्या ग्रंथातला शब्दविचार काव्याशी फारसा संबंधित नसून तो मुख्यतः वक्तृत्वाबावत आहे; या भागाचा संबंध कवितेपेक्षा नाटकाशी कितीतरी अधिक आहे. हे झाले पाश्चिमात्य साहित्यशास्त्रातले एक अतिशय महत्वाचे उदाहरण. त्याच्याच तोडीचे आपल्याकडील उदाहरण म्हणजे संस्कृत साहित्यशास्त्रातल्या म्हणजे भरताच्या नाट्यशास्त्राचे स्मरण करावे लागेल. एथे प्रकार आहे तो पेक्षा थेट उलटा. भरताच्या नाट्यशास्त्रात नाटकाचा उहापोह नसून काव्याचा आहे. संस्कृत साहित्यशास्त्रातला ध्वनिविचार असो वा अलंकार विचार असो त्याचे 'लक्ष्य' काव्य हेच आहे. तपशीलात न जाता वा तपशीलवार विचार केला तरी असे दाखवता येते की प्राचीन विचारवंताच्या मते नाटक आणि काव्य यांत अभेद होता. या संदर्भात दोन मौलिक निरीक्षणे या विषयात अत्यंत प्रस्तुत ठरतात. पहिले निरीक्षण कोलेरिजचे आहे. कोलेरिजचे मर्मग्राही निरीक्षण असे आहे की ''काही विशिष्ट लांबी असलेल्या कवितेत सर्व कविताभर काव्य नसते, तसे असू शकत नाही आणि असू नयेच.'' या म्हणण्याचा

अर्थ असा की कवितेतले काव्य अतिशय मर्यादित, केंद्रित असते; काव्यात्म असा तेवढा थोडा भाग सोडला तर बाकीची सगळी रचना असते. नाटकही असेच रचायचे असते; घटना, पात्रे, संवाद इत्यादींच्या सहाय्याने या रचनेच्या पसाऱ्यात काव्य हरवून जात नाही का ? बहुधा तसे ते हरवून जातेच आणि हरवत नसले तरी पुष्कळदा जाणवतही नाही. मग ते जाणवते केव्हा आणि कसे ? हे काव्य जाणवते ते त्या त्या नाटकाच्या आंतरिक सामर्थ्यामुळे; ते काव्य जाणवते ते अबोलपणे, कारण ते शब्दांच्या पलीकडचे असते; कारण शब्द जेथे थांबतात, जेथे शब्द विराम घेतात तेथे ते काव्य असते. त्या विरामातच ते काव्य जाणवते असेही म्हणता येईल. या ठिकाणी काहींच्या मनात अशी शंका येईल की हे सारे विवेचन नाटकासंबंधी नाही, कवितेसंबंधी नाही, काव्यासंबंधी नाही; हे विवेचन संगीताविषयी आहे. ही शंका पुष्कळच रास्त आहे. कारण अंततः नाटक, काव्य, संगीत एकरूप आहेत. कोलरिजच्या विधानाची परिपूर्ती करणारे दुसरे विधान आपल्या परंपरेतले म्हणजे भरताचे आहे; 'नाट्यशास्त्रातले' आहे. त्या ग्रंथात लयीचा, लयतत्त्वाचा जो विचार आहे तो ही एकरूपता समजावून सांगणारा आहे. सरतेशेवटी लय हे मूलतत्व ठरते. लय म्हणजेच स्तब्धता. हे विधान लयीसंबंधी आपल्या मनात जी कल्पना असते तिच्या विरोधात जाणारे मुळीच नाही. तसे आपल्याला वाटते तर त्याचा अर्थ एवढाच की 'लय' शब्दाचा आपण फार वरवरचा अर्थच गृहीत धरलेला आहे. लय म्हणजे संपणे. लय म्हणजे विलय. विलयाशिवाय लय पूर्ण होतच नाही. लय आणि विलय यांचा हा संबंध फारसा कुणाच्या ध्यानातच आलेला नाही. त्याला अपवाद फक्त डॉ. सुरेन्द्र बारलिंग्यांचा. भरताच्या काव्यशास्त्राचा विचार करताना बारलिंग्यांनी लय विलयाचे नाते अत्यंत तरल बुद्धीने दाखवून दिलेले आहे.

नाट्य, काव्य आणि संगीत यांच्यातील एकात्मकता दाखविण्याचे प्रयत्न फार पूर्वीपासून साहित्यात होत आलेले आहेत. बहुशः हे प्रयत्न बौद्धिक पातळीवर झालेले आहेत. एलकुंचवार किंवा त्यांच्या अगोदरच्या काही थोड्या नाटककारांनी हा प्रयत्न बुद्धीच्या पातळीवर केलेला नाही. ही त्यांची मर्यादा नव्हे. नाटककाराने बुद्धीचा आश्रय घेऊ नये असा काही अडसर नाही. त्या तऱ्हेनेही हा प्रयत्न केला जाऊ शकतो. परंतु असा प्रयत्न फारसा माझ्या पाहण्यात, वाचनात वा ऐकिवात अजून तरी आलेला नाही. आज आपल्यासमोर आहेत ती नाटके; एलकुंचवारांची आणि इतरांची या नाटकांची मुख्य प्रेरकशक्ती बुद्धी नाही; मुख्य प्रेरकशक्ती आहे ती कल्पनेची. कल्पना हीच येथे मूलद्रव्य आहे. संगीताला आधार असतो तो कल्पनेचा. थोड्याशा स्पष्टीकरणाने हे सिद्ध करता येईल. संगीताचे माध्यम असते सूर. सूरांना तसा काही अर्थ नसतो. शब्दांपेक्षा या बाबतीत ते वेगळे असतात. शब्दांना त्यांचा म्हणून काही अर्थ असतो. हा अर्थ त्यांना सामाजिक उपयोगामुळे मिळालेला आहे. हा इतिहास शब्द वापरताना वा ऐकताना आपल्या मनात

येत नाही. आपल्याला कळतो तो त्यांचा अर्थ, म्हणूनच अर्थशून्य शब्द अस्तित्वात असतात हे संस्कृतीच्या प्रगत टप्प्यावर आपण कधीच स्वीकारीत नाही. शब्द आला की त्याच्यासह अर्थ आला. कधी शब्द अगोदर आणि अर्थ त्याच्या मागोमाग तर कधी अर्थ पुढे आणि शब्द मागे धावत असल्याचे दिसते. हा तपशीलाचा मुद्दा क्षणभर बाजूला ठेवला तरी शब्द आणि अर्थ यांचे साम्राज्य, साहचर्य वा एकात्मकता बाजूला सारता येत नाही. सूर सर्वस्वी निर्लेप असतात. रंगही तसे नसतात. शुभ्र, कृष्ण, रक्त, हरित इत्यादी रंगांनाही आपण अर्थ दिलेले आहेत. या सुरांशी संवाद साधायचा तो केवळ लयीद्वारे, विलयाद्वारे, स्तब्धतेद्वारे, विरामाद्वारे. एलकुंचवारांनी हे केलेले आहे. कल्पनाशक्तीचा हा सर्वात मोठा विलास आहे, विक्रम आहे. तो एलकुंचवारांच्या सर्व नाटकांत दिसतो असे मला मुळीच म्हणावयाचे नाही. तो कधी कधी दिसतो हे विधान निर्विवाद ठरावे. या प्रकारच्या नाटकाचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून त्यांच्या 'सोनाटा' या नाटकाचा विचार करावा लागेल. हे नाटक इंग्रजीत पहिल्यांदा प्रगट झाले ते दिल्लीला. आता ते मराठीत अवतरणार आहे ते मुंबईत असे ऐकतो. इंग्रजी असो, मराठी असो का स्वाहिली. शब्दांनाच जिथे अर्थ नाही तिथे तो अमुक एका भाषेला कसा असणार ? जो तो प्रेक्षक त्यांच्या मनात येईल तसा अर्थ लावीत नाटक पाहतो आणि नाटक पाहता पाहता आपण लावलेला अर्थ विसरतो वा नकळत त्याचा अर्थ नाटकाच्या त्याच्यावर होणाऱ्या परिणामात विरघळून जातो.


सोनाटा म्हणजे काय हा प्रश्न मनात येताच काहींना तरी सनाटा, सन्नाटा हे शब्द आठवतात. सोनाटाशी या शब्दांचा संबंध नाही असे काही म्हणतील तर ते शब्द एकाच कुळातले आहेत असे इतरांचे मत असेल. सनाटा म्हणजे आवेग, आवेश इत्यादी. सन्नाटा म्हणजे शांतता, स्तब्धता, भयप्रद शांतता, भयप्रद स्तब्धता. म्हणजे आवेशाचा वेग, आवेशाची लय यांच्यासह येणारी निशब्द, शब्दांच्या पलीकडली शांतता, अशा प्रकारचा अनुभव सोनाटा हे नाटक देत असेल तर त्याच्या दृष्टीने ते अत्यंत मौल्यवान ठरते. यातले शब्द मधुर असलेच पाहिजेत असा नियम नाही. किंबहुना ते शब्द असण्याचीही आवश्यकता नाही. इथे नुसता ध्वनी, नाद, त्याचा वेग, आवेग, लय, विलय, स्तब्धता महत्वाची आहे. अर्थाचा अर्थ येथे असला तर उत्तम, नसला तरी चालेल. 'सोनाटा' या नाटकातली मिस 'टुपटुप' बाई प्रेक्षकांना दिसत नाही. सतत कानावर पडत असते तो तिच्या हालचालीचे कथन आणि ती आपल्या पी. सी. समोर बसली असताना, काहीतरी टाईप करीत असताना होणारे टुपटुप, टीपटीप या आवाजासारखे काही तरी, संगीताकडे घेऊन जाणारे. 'सोनाटा' या शब्दाचा अर्थ कोशात पाहायला तर असे दिसते की मूळ इटालियन भाषेतल्या 'सोरारे' या नाद अर्थाच्या शब्दाचे पुढचे रूप म्हणजे सोनाटा. हा सोनाटा असतो काय ? अभिजात संगीतातील जी एक रचना आहे. एकटा पियानो, किंवा कधी कधी त्यांच्या साथीला असलेल्या व्हायोलीनसह घेऊन पूर्ण करण्याच्या तीन किंवा

अनुक्रमणिका

चार 'चाली' (गत) असे या रचनेचे स्वरूप आहे. या गतीत थांबणे, स्तब्ध होणे महत्वाचे आहे. त्याशिवाय त्या रचनेचे संगीतत्व आपल्याला जाणवणारच नाही. हे कल्पनाशक्तीला, लेखकाच्या आणि प्रेक्षकाच्या कल्पनाशक्तीला मोठे आवाहन आहे, तसेच आव्हान. महेश एलकुंचवारांचे नाटक नेमके हेच करते प्रत्येकदा ते साधते असे नाही परंतु साधते तेव्हा नाटक, काव्य, संगीत यांतील भेद संपतो आणि उरतो तो एक अनुभव, एकाच वेळी निर्गुण आणि सगुण असलेला अनुभव. अशा प्रकारचे काही नाट्यलेखन महेश एलकुंचवारांनी केलेले आहे. त्यांचे नाटक कोणत्या आणि कोणाच्या नाटकापेक्षा श्रेष्ठ आहे वा गौण आहे हा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्याची जागा स्वतंत्र आणि निश्चित आहे.

❑❑❑

- के.ज. पुरोहित
पुणे



समीक्षेला नवी दृष्टी देणारा समीक्षक प्रा. रा.ग.जाधव

डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी

मराठी समीक्षेच्या प्रांतात गेल्या अर्ध शतकात अनेक पद्धती उदयाला आल्या आणि त्यांचा पुरेसा परिचय व उपयोजन देखील न होता अस्तंगतही झाल्या. केवळ विद्यापीठीय अभ्यासक्रमापुरती काहींची दखल घेतली गेली. तर युरोप - अमेरिकेकडे डोळे लावून असण्याच्या सवयीचा परिणाम म्हणून तिकडे घडले ते इकडे आणून सोडण्याच्या उपक्रमापोटी काही पद्धतींबाबत उगाचच भरभरुन लिहिले गेले. काहींवर चर्चासत्रे घडली, परिषदा झाल्या. मात्र गेल्या अर्धशतकात भारतात उदयाला आलेल्या नव-सांस्कृतिक उत्थानाच्या पार्श्वभूमीवर यातल्या कोणत्याही समीक्षापद्धतीचे वाङ्मयकलेतील समस्यांची उकल करण्याच्या दृष्टीने मोजकेच अपवाद वगळता पुरेसे उपयोजन झालेच नाही. परिणामी समीक्षेचे क्षेत्र हे एका अर्थाने अराजकाचे, गोंधळाचे होत गेले. विविध समीक्षा पद्धतींच्या परिचयाचेच तेवढे कार्य मराठी समीक्षा क्षेत्रात उत्साहाने झाले. मात्र त्यातल्या शिस्तीने वाङ्मयीन समस्यांची उकल नेटाने करून दाखवण्याच्या पातळीवर मात्र तेवढाच अनुत्साह दिसला.

कोणत्या प्रकारच्या अभिव्यक्तीला कोणती समीक्षा पद्धती लावून बघायची व कोणत्या समीक्षा पद्धती कोणत्या अभिव्यक्तीला लावून बघायच्या या बाबतचे प्रश्न देखील फारसे उपस्थित केले गेले

नाहीत. शैलीशास्त्रीय समीक्षेसारख्या शास्त्रीय पद्धतीच्या अध्ययन - उपयोजनाचा तर सर्वाधिक अभाव मराठी समीक्षा क्षेत्रात कायम आहे.

या अराजकाचे, गोंधळाचे एक कारण म्हणजे वाङ्मय कलेचे प्रश्न, समस्या, म्हणजे काय व ते जाणून घेणे 'कां' आवश्यक आहे ? त्याचे व्यापक अशा वाङ्मय कलाभानाशी, आस्वादाशी, तसेच कलेच्या पलीकडील जीवनव्यवहाराच्याही आकलनाशी काय नाते आहे, या पातळीवर अभ्यासकांचे पुरेसे उद्‌बोधन करणारी वाङ्मयातील सामाजिक बांधिलकी संपुष्टात येत गेली. त्याचे दुसरे कारण म्हणजे कला निर्मिती व जीवन व्यवहार, बदलते समाज वास्तव व लेखकाची अभिव्यक्ती, संस्कृती, उपसंस्कृती व त्यांची जडण घडण करणारे बदलते घटक, त्यांना प्रभावित करणारी शास्त्रे, ज्ञान, तत्त्वे व प्रत्यक्ष व्यवहार, विभिन्न संस्कृतींच्या संयोगातून, संकटातून उद्‌भवणारे बदलते जग व त्याचा मानवी वर्तनावर पडणारा परिणाम तो परिणाम पाडणारी उत्पादनांची साधने व प्रक्रिया त्यांच्यात मुळातच होत गेलेला बदल, राजकीय, आर्थिक - सांस्कृतिक - सामाजिक - राष्ट्रीय - उपराष्ट्रीय - आतंरराष्ट्रीय अशा साऱ्याच बदलांच्या मुळाशी असणारी प्रक्रिया अशा कितीतरी बाबींनी मिळून निर्माण होणारी समग्रता साकल्याने सम्यकभावाने जाणून घेणे आवश्यक असल्याचे भानच न बाळगता वराचसा समीक्षा व्यवहार घडत गेला. परिणामी बरीचशी समीक्षा ही प्रत्यक्षात समालोचनाच्या, निवेदनाच्या व केवळ माहिती परतेच्या पातळीवर येऊन पोहचली.

समीक्षेच्या या दुर्दशेच्या अवस्थेत हे व्यापक समग्र भान बाळगून सम्यक दृष्टीने मराठी समीक्षेला गेली तीन दशके वळण लावण्याचे व तिला सांस्कृतिक अंगाने समृद्ध करत नेण्याचे अतिशय मोलाचे कार्य शांतपणे एक व्यक्ति करीत होती तिचे नाव प्रा. रा. ग. जाधव.

औरंगाबाद येथे होणाऱ्या ७७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा. रा. ग. जाधव यांची निवड ज्या पद्धतीने झाली त्यातच त्यांच्या व्यक्तित्वाचे रहस्य सामावलेले आहे. अतिशय मितभाषी, स्वतः बाबत कोणताही भ्रम न बाळगणारे, खरोखरच साध्यातली साधी राहणी जगून आयुष्यभर केवळ व्यासंग आणि व्यासंगच केलेले, मराठी वाङ्मयीन विद्वत्ता व संस्कृती क्षेत्रातील मराठीतल्या साऱ्या वाङ्मयीन प्रवाहांना सारखेच आदरणीय असलेले प्रा. रा. ग. जाधव हे आज एकमेव वादातील व्यक्तिमत्व उरलेले आहे. एरवी परस्परांमधून विस्तवही न जाणाऱ्या, मराठी वाङ्मयीन क्षेत्रातील व्यक्ती, वृत्ती, प्रवृत्ती व संस्था यांचे प्रा. रा. ग. जाधव यांच्या कार्य-कर्तत्वा बद्दल मात्र कोणतेच मतभेद दिसणार नाहीत. आज अशी व्यक्तिमत्व दुर्मिळ आणि अपवादानेच दिसतील. त्यांची या वेगळेपणाच्या मुळाशी सांस्कृतिक पार्श्वभूमीचे सम्यक् भान बाळगणारी तल्लख काव्यात्म संवेदना, मानवी जीवनांची कदर करणारी, व पूर्णतः बौद्धिक संयम बाळगणारी व्यापक व सखोल अशी जीवनदृष्टी आहे.

सम्यक् सांस्कृतिक भान बौद्धिक संयम रा. गं. च्या व्यक्तिमत्वात केवळ संकल्पना उरत नाहीत तर प्रत्यक्ष वर्तनाच्या पातळीवर जगले गेलेले व लेखनातून व्यक्त होणारे ते अतिशय पारदर्शी आदर्श होऊन येतात. मराठी वाङ्मयीन समीक्षा व समीक्षकांमध्ये अभावानेच आढळणारे हे आदर्श आहेत. एरवी काही मराठी समीक्षकांनी तर प्रत्यक्ष वर्तनाच्या पातळीवर आज अतिशय अनादर्श अशा आपल्या वर्तनाचे जे जाहीर प्रदर्शन मांडले आहे त्या पार्श्वभूमीवर तर रा. गं. च्या या वैशिष्ट्यांचे प्रकर्षाने स्मरण करून देण्या-घेण्याची नितांत गरज आहे.

समीक्षेलाच नवी दृष्टी देणारा समीक्षक म्हणूनच प्रा. रा. ग. जाधव यांच्या कार्याची नोंद इतिहासाला करावी लागेल. अगदी 'नववाङ्मयीन प्रवृत्ती आणि प्रमेये' पासून तो अगदी अलीकडच्या' पर्यावरणीय प्रवोधन आणि साहित्य' पर्यंत गेल्या तीन दशकातील विविध नव-वाङ्मयीन प्रवृत्तींची,प्रमेयांची, समस्यांची, प्रवाहांची, प्रश्नांची उकल करतांना त्यांनी वाळगलेली दृष्टी त्यांच्या विचारांचा ताजेपणा, टवटवीतपणा व सृजनांच्या मुळांचा सर्वांगीण वेध घेण्याच्या जिज्ञासेची नवता टिकवून धरत आलेली आहे असेच आपल्याला दिसेल.

फसलेला लेखक समीक्षक होतो. हे विधान रा. गं. च्या बाबतीत तरी मुळीच लागू होणार नाही. कारण 'वियोग ब्रह्म' आणि 'मावळतीच्या कविता' या दोन कवितासंग्रहातील अप्रतिम कवितांचा हा सृजनशील कवी आहे. 'शिरमोही' सारखे मराठीतील दीर्घ चिंतनपर, काव्य, ज्याला १९५९ साली 'छंद' पारितोषिक ही लाभले होते, ती सृजनशीलता रा. ग. जाधवांची आहे.

साहित्यिक अध्ययन असलेले पाच ग्रंथ, समाज - संस्कृती - साहित्य विषयक सहा ग्रंथ, दलित साहित्याचे पूर्णपणे वेगळे आकलन व समीक्षा करणारे तीन ग्रंथ, चार संपादित ग्रंथ, पाच इतर समीक्षा ग्रंथ, एक नाट्यसमीक्षेचा ग्रंथ, एक तर्कतीर्थांसारख्या व्यक्तिवरील व्यक्तिविमर्श असलेला ग्रंथ, एक चित्रपट समीक्षेचा ग्रंथ असे एकूण ३३ ग्रंथांचे विपुल लेखन प्रा. रा. ग. जाधव यांच्या नावे जमा आहे.

राज्य शासनाचे, मसापचे पुरस्कार, अस्मितादर्श, प्रियदर्शिनी, रा. श्री. जोग, जी. ए. कुलकर्णी, ग्रंथोत्तेजक, श्री. ना बनहट्टी, युंगांत, हिंगोली असे वाङ्मय क्षेत्रातील सर्व प्रतिष्ठित अशा १८ पुरस्कारांनी प्रा. रा. ग. जाधवांना वेळोवेळी मराठी वाङ्मयीन संस्कृतीने सन्मानित केले आहे.

'युगवाणी' तील माझ्या नऊ वर्षाच्या संपादक काळातील संपादकीय लेखनाच्या पुण्याच्या नवीन उद्योग प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या 'युग संवाद' या संग्रहाला प्रा.रा. ग. जाधव यांनी प्रस्तावना लिहिलेली आहे. विद्यापीठीय व विगर विद्यापीठीय अशा अनेक चर्चासत्रातील त्यांच्या उद्‌बोधनपर भाषणांनी अभ्यासकांचे वेळोवळी उद्‌बोधन केलेले आहे.

अनुक्रमणिका

अशा या सर्वस्पर्शी, सम्यक दृष्टीच्या व्यासंगी, अभ्यासू, विद्वान व्यक्तिमत्वाच्या संमेलनाध्यपदी झालेल्या निवडीने अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचीच उंची वाढली आहे. ती समृद्ध पंरपरा अधिकच समृद्ध करणारी ही भरच पडली आहे.

मात्र या निवडीने व विशेषतः ती ज्या पद्धतीने झाली त्याने अ. भा. मराठी साहित्य संमेलनांच्या निमित्ताने महामंडळ, त्यांचे पदाधिकारी व संमेलनाध्यक्षपदाची निवडणूक यावर चिखलफेक करण्याची वार्षिक संधी घेण्याचा थाऊक उद्योग करणाऱ्यांची मात्र मोठीच गैरसोय झाली. आपला व्यक्तिगत कंड शमविण्याची भारीच हौस असणाऱ्या काही 'विद्वानांना' तर हा तोंड दाबून बुक्याचा मार झालेला आहे.

प्रत्यक्ष वर्तनाच्या पातळीपासून तो विचारांच्या आदर्श अशा अभिव्यक्तीपर्यंत प्रा. रा. ग. जाधवांच्या उंचीची सर्वमान्य वादातील माणसे जेवढ्या अधिक प्रमाणावर या संमेलनाच्या निवड प्रक्रियेला स्पर्श करण्याचे मनावर घेतील तेवढ्या अधिक प्रमाणावर संमेलनाध्यक्ष निवड प्रक्रियेबाबतचा आकारणचा शिमगा करण्याची हौस असणाऱ्यांची अडचणच होत जाईल हे यंदाच्या या निवडीने सिद्ध केले आहे.

प्रा. रतनलाल सोनाग्रा व प्रा. फ. मु. शिंदे या आमच्या मित्रांनी या निवडणुकीतून माघार घेतली नाही तर प्रा. रा. ग. जाधव यांच्या विषयीच्या अतीव आदरापोटी त्यांनी निवडणूक न लढवता जाधवांची अविरोध निवड करवून मराठी वाङ्मयीन संस्कृतीच्या गुणवत्तेत भर घातली आहे.

प्रा. रा. ग. जाधवांनी नागपूरला झालेल्या त्यांच्या सत्काराला उत्तर देतांना म्हटल्याप्रमाणे विदर्भ ही त्यांची वाङ्मयीन संस्कृतीचा प्रथम संस्कार करणारी कर्मभूमी. अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयातील १९५८-५९ च्या वास्तव्यातील विदर्भातील तत्कालीन वाङ्मयीन वातावरणाच्या ज्या स्मृती रा. गं. नी जागवल्या तो सारा काळ अस्सल वाङ्मयीन वातावरणाने भारावलेलाच कालखंड होता. १९६९-७० चा औरंगाबादच्या 'मिलिंद' मधला त्यांचा काळ, पुढे एलफिन्स्टन, पुण्याच्या एस. एन. डी.टी. मधील अभ्यागत प्राध्यपकी, १०७० ते ८९ या १९ वर्षाच्या कालखंडातली त्यांची मराठी विश्वकोशाच्या मानव्यविद्या विभागाच्या संपादकपदीची सेवा, त्याच मंडळाचे नंतर त्यांना लाभलेले अध्यक्षपद अशी रा. गं. ची सारी कारकीर्दच वाङ्मय - संस्कृती - समाज - उद्‌बोधन - प्रबोधन या वातावरणातच खोलवर रुजलेली कारकीर्द आहे. पारंपारिक संस्कृतीचे आणि आधुनिक नवतेचे रा. गं. ची सारी कारकीर्दच वाङ्मय - संस्कृती - समाज - उद्‌बोधन - प्रबोधन या वातावरणातच खोलवर रुजलेली कारकीर्द आहे. पारंपारिक संस्कृतीचे आणि आधुनिक नवतेचे रा. गं. ना एकाच वेळी आकर्षणही आहे आणि त्यांच्या एकात्म नात्याची वीण विणणारा धागा धरूनच त्या वस्त्राचे पोत तपासले जाऊ शकते अशी त्यांची दृढ श्रद्धाही आहे. त्यांची सारी समीक्षा याच निष्टेने घेतलेला वाङ्मयातील प्रत्येक प्रकारच्या नवतेचा वेध आहे.

साहित्याच्या मूल्यमापनाचा प्रश्न हा त्यांच्या लेखी लेखनकृती जीवनाच्या संदर्भात कशी आहे ते ठरवण्याचा प्रयत्न आहे आणि तो केवळ जीवनवादाच्याच तेवढ्या एकमेव कसोटीने तपासून भागत नाही तर त्यासाठी ऐतिहासिक, पारंपारिक, सांस्कृतिक, वर्गीय विचारप्रणालीय तत्वज्ञानात्मक, वैज्ञानिक असे सगळेच, कितीतरी संदर्भ नीटपणे समजावून घेणे आवश्यक आहे ही रा. गं. ची धारणा हा त्याच्या समीक्षेचा पाया आहे. या समीक्षेची इमारत या पायावर उभी आहे हे जर नीट लक्षात आले तरच माहिती-समाजाच्याही पलीकडे चाललेल्या संवादाच्या नवतंत्रज्ञानाच्या पायावर उभ्या होत असलेल्या या पुढच्या 'ज्ञान - सामाजात' निर्माण होणारे वाङ्मय, कलेच्या प्रांतातले प्रश्न, समस्या यांचे आकलन शक्य आहे.

लोकशाही प्रक्रियेचा प्रथमच स्पर्श झालेल्या समाजात उफाळून येणारे नवे सर्जनशील आत्मभान हे एकाचवेळी स्थानिक, प्रादेशिक, वैश्विक व पारंपारिक अशा सर्वच सांस्कृतिकतेशी नाते सांगणारे असे नव-भान असल्याने त्याची अभिव्यक्ती ही केवळ पारंपारिक मूल्यव्यवस्थेतून उद्‌भवणाऱ्या निकषावर तपासली जाऊ शकत नाही. तर समकालीन विद्यमान सांस्कृतिकता ज्या प्रक्रियेची निष्पत्ती आहे तिच्या साऱ्याच घटकांचे सम्यक् आकलन ही आजच्या समीक्षेची व समीक्षकाची खरी गरज आहे. मराठी समीक्षा व्यवहारात लालजी पेंडसे, दि. के बेडेकर, नरहर कुरुंदकर अशी काही पूर्वसुरींची अपवादात्मक नावे वगळल्यास ही गरज ओळखणारी व समीक्षेला तिच्या आवश्यक त्या पायावर उभी करणारी समीक्षा ही केवळ प्रा. रा. ग. जाधवांचीच तेवढी उरते.

व्यक्तिची समग्र सत्यता ही कधी एकविध नसते तर ती बहुविध असते. त्याची व्यक्तिगतता जेवढी नैसर्गिक असते तेवढीच त्याची सामाजिकताही नैसर्गिक असते हे मनःपूर्वक मान्य करण्याचे तथाकथित मुख्य प्रवाही मराठी समीक्षेने सतत टाळल्याने मराठी वाङ्मयीन संस्कृतीची मोठी हानी अशी टाळाटाळ करणाऱ्या समीक्षेने केली. अशा समीक्षेने अपेक्षा कमी व नव सर्जनाची सातत्याने उपेक्षाच अधिक केली. अशा उपेक्षित नवसर्जनाला प्रा. रा. ग. जाधवांच्या समीक्षेने नेहमीच पोटाशी धरले आणि जिव्हाळ्याने, ममतेने त्या सृजनाची विचारपूस केली. त्या विविध नव-वाङ्यमयीन प्रवृत्तींच्या सृजनाला आधार दिला. ते सृजन प्रतिष्ठित केले. ते सृजन प्रतिष्ठित होण्याचा अर्थ केवळ वाङ्मयीन नसून त्याला विविध सामाजिकही आयाम लाभलेले आहेत.

प्रा. रा. ग. जाधव यांची अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी झालेली निवड ही अशा रीतीने ज्या नव सृजनाला रा. गं. च्या समीक्षेने देऊन आधार प्रतिष्ठित केले त्या सामाजिकतेने, त्या सांस्कृतिकतेने नतमस्तक होऊन केलेले वंदन आहे.

❑❑❑

- डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी
नागपूर

मानवतावादी समीक्षक
रा.ग. जाधव

▶ वसंत आबाजी डहाके

औरंगाबाद येथे व्हावयाच्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव यांचं मी मनापासून अभिनंदन करतो. ते अध्यक्ष म्हणून अविरोध निवडून आले. खरं म्हणजे निवडणुकीची प्रक्रियाच झाली नसल्यानं 'निवडून आले' हे म्हणणंही बरोबर नाही. आपणा सर्वांनाच मधूनमधून वाटतं की साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षाची निवडणूक कशासाठी ? सुयोग्य साहित्यसेवकाला ते पद सहजच का मिळू नये ? रसिकांनी, साहित्यिकांनी एकमतानं अशा व्यक्तीचं नाव सांगावं. सन्मानानं ते पद द्यावं. जाधवांच्या बाबतीत आपल्या सर्वांच्या मनात असलेली ही गोष्ट सिद्ध झाली. मला हे अप्रूप वाटतं आणि ज्या लोकांनी जाधवांसाठी माघार घेतली त्यांचं अभिनंदन करावं असंही वाटतं. त्यांनी 'माघार' घेतली नाही, जाधवांविषयीचा आदर व्यक्त केला. आजच्या घडीला ही फार महत्त्वाची घटना आहे. मराठी लेखकांच्या आणि रसिकांच्या मनात अद्यापही गुणीजनांबद्दल आदर आहे. रा. ग. जाधव हे साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाला सर्वथैव पात्र आहेत. ते आणखीही इतर सन्मान्य गोष्टींसाठी पात्र आहेत. कालक्रमानुसार त्यागोष्टी त्यांना प्राप्त होवोत. त्यांना निवडणूक लढवावी लागली असती तर ते आमचंच विचारविवेकदारिद्र्य ठरलं असतं. ज्या सांस्कृतिक विवेकाविषयी जाधव लिहीत आलेले आहेत, तो आमच्यात

अनुक्रमणिका

नाही असं सिद्ध झालं असतं.

जाधव हे मुख्यतः समीक्षक आहेत. त्यांचे दोन कवितासंग्रह आहेत. परंतु त्यांची सगळी सर्जनशील प्रतिभा समीक्षालेखनात व्यक्त झाली आहे. राजशेखरानं प्रतिभेचं भावयित्री प्रतिभा आणि काययित्री प्रतिभा असं वर्गीकरण केलं आहे खरं, परंतु कधीकधी भावयित्री आणि कारयित्री या दोन्ही प्रतिभा एका ठिकाणी अवतरतात आणि कधीकधी त्या मिसळूनही जातात. जाधवांच्या लेखनात हे संयोजन आढळतं. चांगलं समीक्षालेखन हे चांगल्या ललित साहित्यकृतीइतकंच वाचनीय असतं. इतकंच नव्हे तर ललित साहित्यकृतीप्रमाणेच ते समाजाचं आणि संस्कृतीचं समीक्षात्मक चित्रण असतं. मी स्वतः ललित साहित्य आणि साहित्यसमीक्षात्मक लेखन सारखंच महत्त्वाचं मानतो. दोन्हीकडे शेवटी ज्ञानमीमांसाच असते. ललित साहित्यकृतीत आणि समीक्षालेखनात असतं काय, तर हे काय आहे, आपल्या भोवतीचं जग, माणसं, प्राणी, कीटक, जीवजंतू. त्यातल्या त्यात माणसावर आपलं सगळं लक्ष केंद्रित करून एका व्यक्तिचे दुसऱ्या व्यक्तीशी, समूहाशी, पर्यावरणाशी, अवकाशाशी, परंपरेशी, पूर्वजांशी काय अनुबंध आहेत - या सगळ्यांचा शोध. धर्म आणि कला या दोन्ही गोष्टींचं उगमस्थान एकच आहे. गूढ निसर्ग आणि भयाक्रान्त करणारा मानवसमूह. साहित्य या मानवी भयाचा शोध घेतं. समीक्षा त्या भयाची कारणमीमांसा शोधते. दुःखभोगामुळे माणूस धर्माकडे वळतो. दुःख भोगणारा आणि धर्माकडे वळणारा, दुःखभोगाशी सामना करणारा माणूस साहित्याचा विषय असतो. समीक्षा ही ग्रंथजीवी आहे अशी एक समजूत आहे. आधी ललित साहित्य, मग समीक्षा पुस्तकपरीक्षणांपुरतं हे ठीक आहे. खरी समीक्षा आधी असते, नंतर ललित साहित्य असंही म्हणता येईल. ललित साहित्य लिहिणाऱ्याच्या मनात त्या त्या साहित्यकृतीच्या रूपबंधाविषयी काहीएक विचार असतो. परंतु या वादात न पडता ललित साहित्य आणि समीक्षा हे दोन्ही प्रदेश मानवाच्या अस्तित्वाशी निगडित आहेत एवढं म्हटलं तरी चालेल. चांगली समीक्षा ही केवळ एखाद्या साहित्यकृतीपुरती मर्यादित नसते. ती समग्र मानवी जीवनाचाच वेध घेते. साहित्यकृतीचं द्रव्य मानवी जीवन हेच असतं. मग समीक्षा साहित्यकृतीचा विचार करताना मानवी जीवनाचा का विचार करणार नाही ? अशी समीक्षा ग्रंथाविषयीचंच नव्हे तर आपल्या एकंदरीत अस्तित्वाचंच नवं आकलन सादर करीत असते, असं आपल्याला म्हणता येईल. अशी समीक्षा दुर्दैवानं अल्पच असते. रा.ग.जाधव यांचं नांव अशा अल्पसंख्य जमातीमधलं आहे.

जाधव साहित्याचा विचार संस्कृतीच्या अंगानं करतात. साहित्याच्या सांस्कृतिक सिद्धान्ताची (कलचर थिअरी ऑफ लिटरेचर) आपल्याकडे अद्याप नीट मांडणी झालेली नाही. परंतु अशी मांडणी करायची झाल्या दि. के. बेडेकर आणि रा.ग. जाधव यांच्या लेखनाचा व्यवस्थित अभ्यास करणं आवश्यक आहे. साहित्य हे एका व्यक्तीच्या प्रतिभेतून निर्माण होत असतं असं बाह्यतः दिसत असलं तरी ते त्या मानवसमूहाच्या आविष्काराच्या इच्छेतून निर्माण होत असतं. व्यक्तीच्या प्रतिभेतून निर्माण होत असतं असं बाह्यतः दिसत असले तरी ते त्या मानवसमूहाच्या आविष्काराच्या इच्छेतून निर्माण होत असतं. व्यक्तीच्या

सर्जनशील कल्पनाशक्तीपेक्षा अथवा सौंदर्यात्मक अंतःप्रेरणेपेक्षा त्या समूहाच्या संस्कृतीची ती ऐतिहासिक निर्मिती असते. त्यामुळे साहित्याचा संस्कृतीच्या अंगानं केलेला विचार इतर कोणत्याही व्यूहाहून महत्त्वाचा ठरतो. जाधवांचं समीक्षालेखन याच दृष्टिकोणातून झालेलं आहे. त्यांनी म्हटलं आहे 'पाणी' सारखी नामदेव ढसाळांची कविता, 'मुक्ती' सारखी पु. भा. भाव्यांची कथा, 'रणांगण' सारखी विश्राम वेडेकरांची कादंबरी, 'भूमिकन्या' सारखं वरेरकरांचं नाटक इत्यादी साहित्यकृती वाचताना साहित्यकृती म्हणून त्यांचा विचार करण्यानं आपलं समाधान होत नाही. त्या त्या साहित्यकृतीमधील जीवनदर्शनाचा, समस्यांचा किंवा नाट्यांचा सामाजिक किंवा सांस्कृतिक दृष्टीनं विचार करण्याची आवश्यकता आहे, असं आपणास जाणवत असतं'.

एक समग्र समीक्षक असं मी जाधवांचं वर्णन करतो.

जाधवांचे 'साहित्य व सामाजिक संदर्भ', 'निळी पहाट', 'कला, साहित्य व संस्कृती' हे तीन ग्रंथ मला साहित्याचा सांस्कृतिक अंगानं विचार या दृष्टीनं अतिशय महत्त्वाचे वाटलेले आहेत.

साहित्याचं दुहेरी मूल्य. समाजातील सर्जनशील कार्य आणि स्वतंत्र कलानिर्मिती.

समाजाच्या व्यापक पार्श्वभूमीवर साहित्यनिर्मितीचा अर्थ व अन्वय. साहित्य हा समाजसापेक्ष सर्जनशील आविष्कार.

साहित्याला असलेलं मानव्य मूल्य. साहित्यानं माणूस म्हणून दिलेली प्रतिष्ठा.

ललित साहित्यातील क्रांती ही आशयाची, जीवनविषयक संवेदनांची, जाणिवांची क्रांती असते.

जाधवांनी केलेली दलित साहित्याची मीमांसा. अशा विविध विषयांवरचं मूलगामी चिंतन या ग्रंथांत आढळतं.

'दलित कलेचा आकृतिबंध ' हा जाधवांचा एक महत्त्वाचा निबंध आहे.

दलित चित्रकलेच्या विचार त्यात केलेला आहे. दलित साहित्य व कला हे एकमेकांची सोबती असल्याचं त्यांचं प्रतिपादन वेगळी दृष्टी देणारं आहे. आकृतिबंधांच्या मूलस्त्रोत दलित जीवनात आहे. काळ्या रंगाचा भारतीय परंपरेतील अशुभ अर्थ दलित चित्रकलेने नाकारला.

त्यातल्या गुहाचित्रसदृश रेखाकृती. चित्ररचनेतील संकुलता, द्विमितीय रेखाटन, टसठशीत जोमदार रेखा आणि विस्तृत अवकाश.

आदिमतेची डूब. या चित्रांमधला आशय जीवनाशयाशी किती घनिष्ठपणे निगडित आहे हे जाधव दाखवतात.

हा सगळा आवाका लक्षात घेतला तर एक समग्र समीक्षक हे जाधवांचं मी केलेलं वर्णन किती यथार्थ आहे याची प्रचीती आपणास येईल.

आपल्याकडचे राजकारणात काम करणारे, समाजकारणात काम करणारे लोक साहित्य वाचतात की नाही याची मला कल्पना नाही. पण त्यांनी वाचावं. विशेषतः जाधवांसारख्या समीक्षकाचं लेखन आवर्जून वाचावं. ज्या सामान्य लोकांसाठी आपलं काम

आहे असा दावा ते करतात, त्या सामान्य जनांच्या जीवनाचा बोध त्यांना होईल. अस्मितादर्श साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून जाधवांनी केलेलं भाषण नग अवश्यच वाचावं. बारकाईनं वाचावं. त्या भाषणात त्यांनी म्हटलं होतं, 'साहित्यानं नेहमीच माणसाला माणसात राखण्याचा प्रयत्न केला आहे; माणसाला माणसातून उठवण्याचा यत्न केलेला नाही. माणसाची प्रतिष्ठा या जगात साहित्यानंच प्रारंभापासून सांभाळली आहे. माणसाला माणसांच्या अधिकाधिक निकट आणण्याचा प्रयत्न केला आहे. मानवी समाजाच्या इतिहासात माणसं जोडण्याची, माणूसपणाचा विस्तार करण्याची, स्थलकालनिरपेक्ष अशी लांबलचक मनुष्यशृखंला जुळविण्याची कामगिरी साहित्यानं केलेली आहे. मनुष्यसमाजातील साहित्याचा इतिहास हाच माणसाचा खराखुरा इतिहास आहे'. जाधवांनी घेतलेला हा साहित्यवेध विरळाच आहे. त्यांच्या मते धर्म आणि दर्शन यांहून साहित्य श्रेष्ट आहे. त्यांनी म्हटलं आहे, 'धर्म - दर्शनांनी माणसाची आरती कधीही मनापासून म्हटलेली नाही, त्यांनी माणसावरील विश्वास कधीही व्यक्त केला नाही.'

आज वर्तमानकाळात धर्म कोणत्या प्रकारचं काम करीत आहे हे आपण आपल्या डोळ्यांनी बघतच आहोत. नामदेव - ज्ञानदेव - तुकाराम यांचं साहित्य ज्या महाराष्ट्रानं वाचलं आहे त्या महाराष्ट्रानं वर्तमान धर्मवेडात वाहत जावं हे तर परम आश्चर्य आहे. असो.

जाधव यांचा धर्म साहित्य हा आहे. त्याच भाषणात ते म्हणतात, ''साहित्य हाच माझा धर्म आहे. साहित्यधर्म हा एकमेव मुक्त मानवधर्म अ हे. या जगात जर कधीकाळी एकता व एकोपा निर्माण झालाच, तर तो फक्त साहित्यधर्माच्या अधिष्टानावरच उभा असेल !'

एक साहित्यधर्मी म्हणून जाधव आपल्या सर्वांच्या जवळचे आहेत. साहित्याला देश, भाषा, धर्म जात असं कोणतंही बंधन नसतं. साहित्यधर्माच्या उपासकाचं जाधवांनी केलेलं वर्णन अप्रतिम आहे. ते म्हणतात, 'तो रा.ग. जाधवही असतो आणि त्याच वेळी तो नामदेव ढसाळ, दिलीप चित्रे, नामदेव व तुकाराम, केशवसुत व मर्ढेकर हे सर्वच असतो. तो मराठी असतो, भारतीय असतो, आफ्रो - आशियाई असतो, युरो - अमेरिकन असतो आणि चंद्रसूर्याचाही असतो.' राजकारणात काम करणाऱ्या जगातल्या सर्वच लोकांनी यापासून काही बोध घेतला तर किती बरं होईल. जगातल्या जाऊदे, महाराष्ट्रातल्या तरी निदान. पुन्हा असो.

'साहित्याचे परिस्थितीविज्ञान' हा जाधवांचा निबंध हे मराठीतलं एक महत्त्वाचं योगदान आहे.

जाधवांच्या मते साहित्यविचार हा देखील परिस्थितिविज्ञानाप्रमाणे एक वैशिष्ट्यपूर्ण विचार आहे. पशुपक्षी, वनस्पती, कृमिमीटकादी सूक्ष्म तसेच स्थूल सजीव इत्यादींचा आणि त्यांचा अधिवास ज्या नैसगिक पर्यावरणात असतो त्या पर्यावरणाचा, त्यांच्या परस्परसंबंधांचा शास्त्रीय दृष्टीनं करण्यात येणारा समग्र व सर्वांगीण अभ्यास म्हणजे परिस्थितिविज्ञान. त्यातूनच सांस्कृतिक पर्यावरणाची कल्पना पुढे आली. या संकल्पनेत

पर्यावरण व संस्कृती आणि संस्कृतिविशेषांचा अंतर्भाव आहे. नैसर्गिक परिसराला व त्यातील बदलांना प्रतिसाद देण्याची क्षमता असलेले सांस्कृतिक मनोधर्म म्हणजे संस्कृतिविशेष. साहित्याच्या परिस्थितिविज्ञानात साहित्यकृती हे एक सजीव आहे आणि साहित्य ही समुदायवाचक कल्पना म्हणजे अशा सजीवांची जाती आहे हा विचार अंतर्भूत आहे. साहित्यकृतीचं जीवनचक्र एका सांस्कृतिक पर्यावरणात फिरत असतं. सृष्टीतील इतर सजीवांचा नैसर्गिक पर्यावरणाशी ज्या प्रकारचा जीववैज्ञानिक संबंध असतो तशाच प्रकारचा संबंध साहित्यकृती व तिचं सांस्कृतिक पर्यावरण यांच्यातही असतो.

जाधवांच्या निबंधाचा हा अतिसंक्षिप्त सारांश मी सांगत आहे. साहित्यविचाराला वेगळं वळण देणारा हा विचारप्रवर्तक निबंध आहे. साहित्यविषयक सांस्कृतिक सिद्धान्ताची मांडणी करायची झाल्यास या निबंधाचा पायाभूत निबंध म्हणून उपयोग होऊ शकेल.

जाधवांनी सैद्धान्तिक आणि उपयोजित अशी दोन्ही प्रकारची समीक्षा लिहिली आहे. कथा, कविता, विशेषतः कविता हे त्यांचे आस्थाविषय आहेत. अशा प्रकारच्या ग्रंथांमध्ये त्यांच्या 'आधुनिक मराठी कवयित्रींची कविता' हा ग्रंथ आवर्जून उल्लेख करावा असा आहे. त्यांनी स्त्रियांच्या कवितेच्या संदर्भात 'मानुषी काव्य' असा अन्वर्थक शब्दप्रयोग केलेला आहे. त्यांचा 'साठोत्तरी मराठी कविता व कवी' हा ग्रंथ तर काव्यसमीक्षेच्या रूढ कक्षा ओलांडणारा आहे. 'काव्यसमीक्षा ही एक समीक्षा ठरते' असं त्यांनी या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटलं आहे. 'अर्थपूर्ण अस्तित्वाचे व निर्मितीचे काव्याधारे केलेले विविध प्रकारचे चिंतनमनन म्हणजे काव्यसमीक्षा' ही त्यांची काव्यसमीक्षेची व्याख्या आणि त्यापुढचं त्यांचं हे 'वाक्य सुसंस्कृत समाजात म्हणूनच काव्यसमीक्षेचे दालन हे जीवनाच्या चिंतनमननाचे एक मुक्तद्वार असते.' यावरून एकंदरीत समीक्षेविषयीचीच जाधवांची धारणा व्यक्त करणारं आहे. म्हणूनच मी एक समग्र समीक्षक असं जाधवांचं वर्णन केलेलं आहे.

□□□

- वसंत आबाजी डहाके

● शुभेच्छा !

ख्यातनाम कथाकार आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्रा. के. ज. पुरोहित 'शांताराम' ह्यांनी ८१ व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल विदर्भ साहित्य संघाच्या तर्फे पुरोहित सरांना उत्तम आयुष्य आरोग्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

एक चिकित्सक समीक्षक
प्रा. रा.ग. जाधव

डॉ. ज्योती लांजेवार

समीक्षेचे साहित्यविश्वातील स्थान नेमके कोणते ?

समीक्षा हा प्रतिभावंतांचा व्यवहार आहे. तर कलाविष्कार हा कलावंतांचा व्यवहार आहे. कथाकार, कांदबरीकार, कवी हे कलाविष्कार करतात आणि समीक्षकही व्यापक अर्थाने कला कलाविष्कारच करीत असतात.

साहित्य हे जीवनावर भाष्य करते तर समीक्षा ही साहित्यातील जीवनावर भाष्य करते त्यामुळे लेखकांवर प्रतिभावंतांवर जवेढी जबाबदारी असते त्याहून दुप्पट जबाबदारी समीक्षकांवर असते. कारण समीक्षा ही प्रत्यक्ष साहित्य व साहित्यातील प्रत्यक्ष जीवन असे दुहेरी ओझे वाहत असते. समाजाला या गोर्ष्टीचे भान असते. म्हणूनच समीक्षकांविषयी समाजाला आदर असतो तर लेखकांविषयी आकर्षण असते. मग लेखक हा आकर्षणबिन्दु तर समीक्षक हा आदरणीयबन्धु असतो.

महाराष्ट्रातील काही मोजक्या आदरणीय समीक्षकांमध्ये प्रा. रा. ग. जाधव हे एक आहेत. ते आपल्या समीक्षेतून जीवनाचा आणि कलेतील वास्तव जीवनाचा शोध घेतात. आपल्यावर असलेल्या दुहेरी जबाबदारीची त्यांना जाणीव असल्यामुळेच त्यांचे व्यक्तित्व आणि साहित्य हे गंभीर झाले आहे. थिल्लरपणा आणि पूर्वग्रहदूषित अशी

अनुक्रमणिका

जाधवांच्या समीक्षेची 'प्रवृत्ती आणि प्रकृती' नाही ते एखाद्या स्थितप्रज्ञ, योग्याप्रमाणे समीक्षा साधना करतात.

खऱ्या समीक्षकाची स्थिती ही घरंदाज सासुरवाशिणीसारखी असते, सासुरवाशिणीला जसे सासर आणि माहेर या दोन्ही घरातले उत्तम जे आहे ते जपायचे असते. त्यासाठी तिला अपार कष्ट उपसावे लागतात. कधी कधी मनाचा कोंड़मारा सहन करावा लागतो. तशीच अवस्था समीक्षकाची असते. त्याला कला आणि जीवन या दोघांच्याही 'हाका' ऐकू येत असतात. या दोन्ही हाकांना त्याला साद द्यावी लागते. 'ओ' द्यावी लागते.

प्रतिभावंत - लेखक - कवींचे व्यक्तित्व इतर प्रकारच्या व्यकित्त्वापासून कोणत्या अर्थाने वेगळे असते. या प्रश्नाचे उत्तर जाधवांची समीक्षा देते. सामाजिक वास्तवाशी सहकंप होण्याची शक्ती ज्यांच्या प्रतिभेत असेल त्या प्रतिभेची चिकित्सक समीक्षा करुन प्रतिभावंतांच्या प्रतिभेचा स्वभावधर्म 'परावर्तन' न करता 'प्रतिसृजन' करण्याचे कार्य रा. ग. जाधवांच्या समीक्षेने केले आहे.

प्रा. रा. ग. जाधव सासुरवासासहित अनेक दिव्यातून गेले आहेत. आज साहित्यरसिकांनी त्यांना अविरोध अध्यक्षपद देऊन त्यांच्या तपस्येचे चिज केले आहे. वर्षानुवर्षे 'भिंती' जोपासत समीक्षा लेखन करणारे अनेक आहेत. पण जाधवांच्या समीक्षेकडे पाहिले की लक्षात येते. त्याच्या समीक्षेला भिंती नाहीत. त्यांना साहित्यक्षेत्रातील कोणत्याही भिंती मान्य नाहीत. असा भिंती नाकारणाऱ्या जाधवांनी अनेकांवर समीक्षा लिहिली आहे.

ज्या जाधवांनी हिंदूत्त्ववादी पु. भा. भाव्यांवरही समीक्षा लिहिली. त्यांना तुकारामात जीवनाची साद ऐकू आली तर भाव्यात कलेची साद ऐकूण आली. ज्या जाधवांनी हिंदुत्ववाद, नियतिवाद नाकारणाऱ्या दलित साहित्यावरही विपुल लिहिले. ते 'डोहकाळिम्यात' जितके चिकित्सकपणे डोकावतात तित्तकेच 'निळ्या पाहटे'च्या सादेला 'ओ' देतात. जाधवांनी जेवढे लिहिले ते एका चिकित्सकाच्या भूमिकेतून म्हणून त्यांची समीक्षा ही सर्वसमावेशक आहे.

अनेक समीक्षकांच्या बाबत असे दिसते कि 'गंगा गये गंगादास, जमुना गये ज़मुनादास' ज्या ज्या मंचावर जायचे त्या त्या मंचाची कवने गायची पण जाधवांच्या बाबतीत तसे होत नाही कारण वाङ्मयीन पुढारीपण (नेतेपण) त्यांना नको आहे. एक चिकित्सक, समीक्षक म्हणून

अभिरूची जोपासत असतात. त्यांच्या चिंतनशिल व्यक्तिमत्वाला कोणतेही छक्के पंजे भावत नाहीत. जे आहे, जसे आहे तसे पहा ही त्यांची भूमिका आहे.


समीक्षेला कोणता मंच हवा असतो ? याला उत्तर म्हणजे वाङ्मयीन नियतकालिकांचा मंच समीक्षेला हवा असतो. हा मंच समृद्ध आहे का ? तर याला उत्तर 'नाही' असे आहे. नियतकालिके आज रोडावली आहेत. थंडावली आहेत ती. त्यांचा वाचकवर्गही आज

रोडावला आहे. याला जबाबदार कोण ? याला समाज जबाबदार आहे. आज समाज हा 'दूरदर्शनमय' झाला आहे. म्हणूनच साहित्याचे दुरुन दर्शन घेणे एवढीच साहित्याविषयीची आस्था आज समाजात शिल्लक आहे. त्यामुळे वाङ्मयीन आणिबाणीचा काळ आला आहे. अशा या वाङ्मयीन आणिबाणीच्या काळात रा. ग. जाधवांसारखा एक सर्वसमावेशक समीक्षक अखिल भारतीय साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावर बिनविरोध आरूढ झाला. ही अत्यंत गौरवास्पद बाब आहे. हा जाधवांचा व्यक्तिगत गौरव नसून सर्व वाङ्मयप्रेमींचा हा गौरव आहे.

प्रत्येक संमेलनाध्यक्षांचे विचार तळागाळापर्यंत पोहचविण्याचे कार्य प्रसारमाध्यमाद्वारे होत असते. जाधवांचा गौरव होणे ही समाजाची वाङ्मयीन निकड होती. ती आज पूर्ण होते आहे त्याबद्दल रा. ग. जाधवांचे हार्दिक अभिनंदन. जाधवांच्या निळ्या पहाटेच्या स्वप्नाला निळा सलाम.

❑❑❑

- डॉ. ज्योती लांजेवार
नागपूर



कविता

हेही एक रूप

तुझ्या अनंत विलोल रूपांना,
कमनीय दयनीय
विश्रब्ध नि विभ्रांत
अवघ्या देहाने लोचन होऊन पहावे,
सहृदय होऊन भावावे
जिण्याच्या सकळ चैतन्याने,
हेच होते माझे निरंतर जगणे
कधीकधीचे मरणे
हे तुलाही ठाऊक होते !
तरीही त्या सकाळी
कुशीवर कलून तू लपविलेस रूपाला
गरगर फिरवून डोळे
मिटून घेतल्यास पापण्या,
किती परकेपणाने
पडू दिलास हात,
अन् आपल्या सतेज सुंदर मुखावर
अगम्य दाहक ठेवून साद
केलेस प्रस्थान...!
.......तुझ्या अनंत विलोल रूपांतील
हेही एक रूप...
ते अखेरचे अंतिम म्हणून
मला नाही घेता आले पटवून,
मला जगता येणार नाही
कबूल करून...!

◆

माझ्या लेखी तर

तू ठेवून गेलेल्या गोष्टींची
लांबलचक यादी -
-तुझ्या इच्छापत्रातली,
सावधपणे सगळ्यांनीच
प्रती काढून घेतली,
अन् तुझी गोष्ट तिथेच संपवली
अवघ्या दहाच दिवसांनी ...!
मीही घेतली आहे
लांबलचक यादी
तू ठेवून गेलेल्या गोष्टींची,
तुझ्या अंतर्यामीची ....!
तुझ्या आभाळाची
चंद्रसूर्यांच्या नात्याची,
अनंत रूपांनी अखंडपणे
उमलत राहणाऱ्या निसर्गाची -
- तुझ्या प्रियतम या आप्तांची ...!
- आणि तुझ्या जिद्दीची
तुझ्या सौंदर्याची,
तुझ्या विश्वेश्वराची
तुझ्या तपाचरणाची,
तुझ्या वंचनेची,
तुझ्या पराजयाची
तुझ्या अगतिकतेची
तुझ्या अश्रूंची.... !
- न संपणारी ही गोष्ट
तुझ्या गोष्टींची,
माझ्या लेखी तर तूही
एका अनंताची सूची ....!

◆

हाती नसते

सांगातीला पुढती धाडुन
मागे उरणे हाती नसते,
सांगातीच्या दहनासाठी
जळणे आपुले हाती नसते
सांगाव्याच्या आक्रंदाला
आवरणेही हाती नसते,
सांगातीच्या प्रतिसादाचा
हट्टही पुरणे हाती नसते ;
अपराधांचे पाढे वाचुन
माफी मिळणे हाती नसते,
शिक्षाशासन स्वीकारूनही
शांती मिळणे हाती नसते
सांगातीला पुढती धाडुन
पोथित रमणे हाती नसते,
डोळी डोळा हातही हाती
राखुन असणे हाती नसते...!

◆

एवढं तेवढं !

एवढं वीतभर डोइचं
एवढं मूटभर पोटाचं
एवढं हातभर कमरेचं
इतकं मला खूप होतं
जिणं तसं आलवेल होतं..... !
एवढं चिमणं चिमणींनं
कधी कुठं नेलं कसं ?
इथंच पंख, चंचू, चारा
ठेवून कुठं उड्डाण केलं.... ?
दिशांनाही नाही दिसलं ....!

◆

हे स्वगत

सगळेच श्रोते हळूहळू संपत गेले
सांत्वनाचे चार शब्द त्यांनी दिलेले
हलकेच विरत गेले
जिण्याच्या कोलाहलात.... !
उरला केवळ उजाड आसमंत
आणि मी,
बोलणारा - ऐकणारा
केवळ मीच मला,
ईश्वरावरील निरूपणासारखा
न संपणारा
विषय तुझा,
माझ्याही प्रमादांचा
तुझ्या सहनशीलाचा.... !
हे स्वगत
तू एकदा ऐकावे वाटते,
वाटते
अरूपातून रूपास येऊन
फक्त क्षणभर,
क्षमेचा एक शब्द तू करावास दान
माझ्या अनुतापाच्या ओंजळीत
शब्दशतकांच्या ......!
अन् वाट पाहून थकलो तर
हे स्वगत, मी इथून निघेन तेव्हा
जरूर घेऊन येईन तिथे
तू असशील जिथे,
मगच विसर्जन करीन त्याचे -
माझे ...!

◆

- रा.ग. जाधव

कविता

◗ उत्तर रात्र

भाद्रपदांतिल उत्तर रात्र
मुक्त पिऊन श्रावणधारा
धीट झालेला ओला वारा
पेंगळून टाकी गात्र न् गात्र
भाद्रपदांतील उत्तर रात्र.
तलम अंधार पांघरलेलीं
घरें, दारें मिटून गेलीं
पुसून गेले संज्ञा चित्र
भाद्रपदांतील उत्तर रात्र.
झाडें झुडें स्तब्ध कशीं
गूढ स्वप्नांत मग्न जशीं.
लाख डोळ्यांनी जागी मात्र
भाद्रपदातिल उत्तर रात्र.
◆

◗ कांही दिवसांपुरतें

नेमियेल्या भेटीगांठी
आतां व्हाव्यात विरळ
जरा अेकलेपणांत
जावी जिरून भुरळ.
आतावरी खूप झालें
डोळे वाहणें, पूसणें
आणि सवेंच मनांत
समाधानानें हासणें !
किती जोडावे जिव्हाळे
डोळ्यांमधल्या पाण्यानें
किती मोडावें मनास
गोड फसवेपणानें ?
◆

◗ पाहुणा

कळा झाल्या कळ्या
आणि उणावल्या वेणा
देहांतून गेहीं बाअी
आला अिवला पाहुणा,
अिवल्याशा पाहुण्यांचे
सायमाखलें कौतुक
बोवड्या स्मिताने पटे
ऊभ्या जन्माचें सार्थक.
जन्माचे सार्थक, तशी
धन्य कुशीची पुण्याअी
सारें अंग मांडी झाले
फुटे स्पर्शाला अंगाअी !
◆

◗ पाप

जेव्हां नेत्रांत अभ्रें सांकळतात
आणि अंतर कुंद होतें
आभाळाचा जीव कोंडतो
पानही निष्पंद होतें !
उजेड कसा कोमेजून जातो
अंधारुन अंधारून येतें
क्षितिजाच्या ग्लान ओठीं
परकें हसूं विरुन जातें
अिथून तिथून नागमोडत
उमलून सलतें मुकी कळ
दिशा दिशा पोरक्या होतात
श्वासांचेहि गळतें बळ
कसा अव्याज विराग
जाळणारें पाप त्याला ?
मला असें छळण्याचा
कुणी तुला शाप दिला ?
◆

अनुक्रमणिका

◗ पहांट चित्र

चिवचिवणारी चिमणचेहऱ्याची
निरागस पहाट
आभळ भरून आलेल्या हृदयासारखें
प्रयासाने ओठ मिटलेलें
आळसावलेला ऐखादा पायरव, ऐखादा
अनोळखी आर्जवी हंवर
समोरच्या माडीवरली कोनाड्यांतल्या
कंदिलांचे श्रांत मलिन स्मित
तुटलेल्या गढीचें मुकाट भिंताड
वारा हळुवार हातांनी दूर सारलेल्या
पांघरुणासारखा
बाकी सारें निद्राधीन, स्तब्ध, मुके,
जरा अशी बाहेर ये ना
जवळ जवळ उभीं राहून हें सारें पाहत राहूं
आपल्या अबोल अस्तित्वानें
पूर्ण करू
सृष्टीचें स्वप्नांकित पंहाटचित्र.

◆

◗ मुका मार

जीभ फिरवितां उभें
ओठीं चरका झोंबला
गेल्या रात्रीच्या व्रणाचा
मुका मार आठवला !

◆

- प्रा. राम शेवाळकर



विदर्भ साहित्य संघ
कार्यवृत्त

◗ दि. १ जानेवारी २००३ ते ३१ डिसेंबर २००३

कार्यकारी मंडळाच्या सभा दि. १ जाने. २००३ ते ३१ डिसेंबर २००३ या काळात विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाच्या तीन सभा नागपूरच्या केंद्रीय कार्यालयात झाल्या.

◗ विविध समित्यांच्या सभा-

संमेलन समिती, अन्य भाषा साहित्य विभाग, सांस्कृतिक समिती, ग्रंथालय समिती, परीक्षा समिती, युगवाणी संपादक मंडळ, या समित्यांच्या सभा दि. १ जाने. २००३ ते ३१ डिसेंबर. २००३ या काळात वेळोवेळी झाल्या.

◗ अखिल भारतीय साहित्य महामंडळ -

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे प्रतिनिधी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, शोभा उवगडे कार्यालय चिटणीस नरेश सबजीवाले व श्री. वामन तेलंग यांनी अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या विविध ठिकाणी झालेल्या सभांसाठी व कार्यक्रमांसाठी विदर्भ साहित्य संघाचे प्रतिनिधित्व केले.

◗ विदर्भ साहित्य संघाचा वर्धापन दिन-

विदर्भ साहित्य संघाचा ८० वा वर्धापनदिन. दि. १४ जानेवारी २००३ रोजी सर्वोदय आश्रमाच्या सभागृहात साजरा झाला. समारंभाचे प्रमुख अतिथी प्रसिद्ध साहित्यिक प्रा. केशव मेश्राम होते. या प्रसंगी विशेष अतिथी प्रसिद्ध समाजसेविका साधनाताई आमटे व 'दै. भास्कर' चे संपादक प्रकाश दुबे हे उपस्थित होते.

विदर्भ साहित्य संघाच्या या वार्षिक सोहळ्यात दरवर्षी वाङ्मय पुरस्कार प्रदान करण्यात येतात. 'जीवनव्रती' हा विदर्भ साहित्य संघाचा प्रतिष्ठाप्राप्त सर्वोच्च सन्मान

यावर्षी प्रख्यात लेखक श्री. मारुती चितमपल्ली यांना जाहीर करण्यात आला. रु. २५,०००/-, शाल-श्रीफळ आणि संगमरवरात कोरलेले सन्मानचिन्ह अशा स्वरूपात हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. या शिवाय अन्य वाङ्मय पुरस्कार प्राप्त झालेल्यांमध्ये डॉ. म. पा. थोरात यांच्या 'डॉ. आंबेडकर आधुनिक विज्ञान आणि मानव' या ग्रंथाला म. म. वा. वि. मिराशी वैचारिक लेखन पुरास्कार, प्रा. सुधाकर जोशी यांच्या 'वारुळधर्म' या कांदवरीला पु. य. देशपांडे स्मृती कादंवरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. शरच्चंद्र मुक्तिवोध स्मृती काव्य पुरस्काराचा सन्मान यंदा उल्हास मनोहर यांच्या 'आभाळ खचल्या भिंती' या काव्यसंग्रहास, ललित गद्य पुरस्कार श्यामला मुजुमदार यांच्या 'धुंधुरमास' या ग्रंथाला मिळाला. डॉ. ना. पु. दक्षिणकर यांच्या 'समग्र पशुसंवर्धन' या ग्रंथाला य. खु. देशपांडे स्मृती शास्त्रीय लेखन पुरस्कार व नवोदित साहित्याचे दोन पुरस्कार, वर्षा झाडे यांच्या 'रंग मनाचे' या काव्यसंग्रहाला व सुप्रिया पेंढारी यांच्या 'मराठी नाट्यवाङ्मयातील विद्रोह व नवता' या ग्रंथांना देण्यात आले. पां. व. गाडगीळ स्मृती युगवाणी लेखन पुरस्कार श्रीमती स्मिता कापसे यांना त्यांच्या 'आंधळ्याच्या गायी ' या समीक्षा लेखासाठी देण्यात आला. व. कृ. वऱ्हाडपांडे स्मृती विशेष ग्रंथ पुरस्कार यंदा डॉ. राम म्हैसाळकर यांच्या 'एक होता गंधर्व' या ग्रंथाला देण्यात आला. 'शांताराम' कथा पुरस्कार प्रख्यात कथालेखक राजन गवस यांना 'तुटल्या प्रदेशाचा प्रवास' या कथेसाठी आणि शकुंतला खोत पुरस्कृत मराठी एकांकिका लेखन स्पर्धेचे पारितोषिक प्रतिभा कुळकर्णी यांच्या 'मायग्रेशन' या एकांकिकेस देण्यात आले. या वर्षीपासून देण्यात येणारा कै. हरिकिसन अग्रवाल स्मृती पत्रकारिता पुरस्कार दै. 'देशोन्नती' चे संपादक प्रकाश पोहरे यांना प्रदान करण्यात आला. डॉ. भा. ल. भोळे यांचा या प्रसंगी साहित्य अकादमीचा अनुवाद विषयक पुरस्कार लाभल्याबद्दल सत्कार करण्यात आला. साधनाताई आमटे यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

'मुलांचे मासिक' या नियतकालिकाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त हे मासिक मोडक कुटुंवाने निष्ठेने ७५ वर्षे चालविले त्याबद्दल संपादक श्री. शरद मोडक यांचा विशेष सत्कार करण्यात आला. नागपूर व अमरावती विद्यापीठातील वाङ्मय आचार्य पदवीधारकांचा देखील परंपरेप्रमाणे सत्कार करण्यात आला.

विदर्भ साहित्य संघाचे 'जीवनव्रती' पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ कवी श्री. सुरेश भट यांनी याप्रसंगी विदर्भ साहित्य संघास पत्र पाठवून, श्री चितमपल्ली यांना जीवनव्रती पुरस्कार प्रदान केल्यावद्दल आनंद व समाधान व्यक्त केले तसेच त्यावद्दल विदर्भ साहित्य

संघाचे अभिनंदनही केले. समारंभात सर्व मान्यवरांची यथोचित भाषणे झाली. या समारंभाला साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर आवर्जून उपस्थित होते.

◗ विश्वस्त मंडळाच्या सभा -

विदर्भ साहित्य संघाच्या विश्वस्त मंडळाच्या या कार्यकाळात दोन सभा झाल्या. संस्थेच्या विश्वस्त मंडळाचे एक सभासद न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी अगोदर सूचित केल्यानुसार त्यांच्या वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्याने पदमुक्त होण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांच्या जागी नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. मधुसूदन चान्सरकर यांची संस्थेच्या विश्वस्त मंडळाने सभासद म्हणून नियुक्ती केली.

◗ गणराज दिन -

दि. २६ जानेवारीस गणराज्य दिना निमित्य विदर्भ साहित्य संघाच्या कार्यालयात संस्थेच्या अध्यक्षांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी कार्यकारी मंडळाचे सभासद उपस्थित होते.

◗ फेब्रुवारी, २००३

३ फेब्रुवारी, २००३ - सुप्रसिद्ध कादंबरीकर अनंत सामंत यांची विदर्भ साहित्य संघास भेट आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी काही स्थानिक लेखक, पत्रकार, कवी, यांची उपस्थिती लाभली होती.

४ फेब्रुवारी, २००३ - प्रख्यात नाटककार प्रा. महेश एलकुंचवार यांना साहित्य अकादमीचे पारितोषिक घोषित झाल्याप्रीत्यर्थ त्यांचा विदर्भ साहित्य संघातर्फे डॉ. राम शेवाळकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी डॉ. भा. ल. भोळे व डॉ. आशा सावदेकर यांनी आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षस्थानी प्रा. सुरेश द्वादशीवार होते.

◗ विशेष संमेलने -

दि. १ व २ फेब्रुवारी २००३ रोजी पुसद येथे विदर्भ साहित्य संघाचे पहिले वैदर्भीय युवा साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले.

विदर्भ साहित्य संघाच्या संमेलन समितीने युवा वर्गात वाङ्मयीन उत्साह जागविण्याच्या हेतूने युवा साहित्य संमेलनाचा संकल्प केलेला होता. त्या दृष्टीने गतवर्षी खामगाव येथे पहिले जिल्हा स्तरीय युवा साहित्य संमेलन खामगाव शाखेने आयोजित केले होते. त्याचवेळी विदर्भ स्तरावरील युवा साहित्य संमेलनाच्या आयोजनाची घोषणा करण्यात आली

होती.

पुसदच्या श्रीमती वत्सलाबाई नाईक महाविद्यालय व विदर्भ साहित्य संघाच्या पुसद शाखेने या पहिल्या वैदर्भीय युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्याचे निमंत्रण दिले होते.

त्यानुसार १ व २ फेब्रुवारी २००३ रोजी पुसद येथे वत्सलाबाई नाईक महाविद्यालयाच्या सभागृहात या संमेलनाचे आयोजन प्रख्यात लेखक डॉ. रवींद्र शोभणे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. संमेलनाचे उद्‌घाटन प्रख्यात लेखक, कवी प्रा. केशम मेश्राम ह्यांनी केले.

ह्या संमेलनात 'साहित्य, युवा मानस आणि धर्मनिरपेक्षता' या विषयावरील डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी ह्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिसंवादात श्रीमंत माने, प्रा. स्वानंद पुंड, बळवंत भोयर, प्रा. अनिल नितनवरे यांनी भाग घेतला. वसंत वाहोकार ह्यांनी सूत्रसंचालन केले. जयश्री नाफडे संचालित डॉ. विजय इंगळे ह्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 'युवा साहित्य : दशा आणि दिशा' या परिसंवादात तरुण वक्त्यांनी आपले विचार व्यक्त केले. युवा कवी निरंजन मार्कंडेयवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कविसंमेलनात अनेक युवा कवींच्या सहभागाने रंगत आणली.

नव्या पिढीचे ग्रामीण लेखक प्रा. सदानंद देशमुख यांची सुंदर प्रकट मुलाखत सीमा रोठे - शेट्ये व संजय रामगीरवार या युवा लेखकांनी घेतली.

'तरुणाईला काय हवे ?' या विषयावरील एका मुक्त चर्चेचे आयोजनही प्रा. मनोहर थारकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. उपस्थित युवा प्रतिनिधींनी या मुक्तचर्चेत समरसून भाग घेतला.

संतोष मुळावकर, डॉ. रविकिरण पंडित, अ. भा. ठाकुर यांच्या कथाकथनाचा कार्यक्रमही संमेलनात झाला.

समारोपाचे प्रसंगी प्रख्यात दूरदर्शन कलावंत अशोक लोखंडे आणि मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते युवा गुणवंताचा सत्कारही करण्यात आला. त्यानंतर एक सांस्कृतिक व बालनाट्य कार्यक्रम सादर करण्यात आले.

'रंग उगवतीचे' हे नवोदित युवा कवींचे कविसंमेलन हे देखील या संमेलनाचे एक आकर्षण ठरले.

◗ मार्च २००३

१६ मार्च : प्रख्यात कवी श्री. वामन निंबाळकर यांचा षष्ट्यब्दिपूर्तीबद्दल विदर्भ

साहित्य संघातर्फे सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सुरेश द्वादशीवार होते.

दलित साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात निंबाळकर यांनी फार मोठे कार्य केले असून ते कार्यकर्ता व व्यक्ती म्हणूनही मोठे आहेत असे मत सभेच्या अध्यक्षांनी या प्रसंगी व्यक्त केले. यावेळी निंबाळकरांच्या कविता वाचनाचा कार्यक्रम झाला. त्यांनतर त्यांच्या सन्मानार्थ झालेल्या कविसंमेलनात निरंजन मार्कंडेयवार, उमेशचंद्र सरोदय, रत्नाकर भेलकर, वर्षा झाडे, मनीषा साधू, सुमती वानखेडे आदींनी भाग घेतला.

१९ मार्च, २००३ कवी सुरेश भट यांना श्रद्धांजली अर्पण करण्याकरता डॉ. राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली एका श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. रमेश अंभईकर, वामन निंबाळकर, प्रा. हरिभाऊ केदार, प्रा. अरविंद खांडेकर, बळवंत भोयर, दै. तरुण भारत तर्फे विनोद देशमुख, दै. लोकमत तर्फे संपादक किशोर कुळकर्णी, विदर्भ हिंदी साहित्य संमेलनातर्फे श्री. उमेश चौबे, लोहिया अध्ययन केंद्रातर्फे श्री. हरीश अड्याळकर, परिवर्तन साहित्य महामंडळातर्फे डॉ. ज्योती लांजेवार तसेच अन्य विविध संस्था, लेखक व इतर मान्यवरांनी या सभेत आपल्या संवेदना व्यक्त केल्या. विदर्भ साहित्यसंघाच्या वतीने उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या.

◗ एप्रिल, २००३

दि. ४ एप्रिल, २००३ रोजी विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालय समितीतर्फे 'मर्ढेकरांचे साहित्य विश्व' या विषयावर एका चर्चासत्राचे आयोजन डॉ. ज्योती लांजेवार यांच्या अध्यक्षतेखाली सांस्कृतिक सभागृहात करण्यात आले. या चर्चासत्रात 'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र' या विषयावर श्रीमती सुलभा शिरसाट व डॉ. विजय इंगळे यांनी तसेच 'मर्ढेकरांचे काव्यशास्त्र' या विषयावर डॉ. रवींद्र शोभणे यांनी अभ्यासपूर्ण मते मांडली. डॉ. सुभाष पाटील यांनीही या विषयावर मते व्यक्त केली.

१४ एप्रिल विदर्भ साहित्य संघ आणि मुक्तिवाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने 'चवदार तळ्यातील अग्निफुले' या कवी का. रा. वालदेकर यांच्या कविता संग्रहाचे प्रकाशन प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या हस्ते झाले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी ताराचंद्र खांडेकर होते. नाटककार प्रेमानंद गज्वी, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, भास्कर सोनटक्के यांनी का. रा. वालदेकर यांच्या कवितांवर विचार मांडले.

▶ मे, २००३

दि. १ मे, २००३ रोजी प्रख्यात नाट्य लेखक व दिग्दर्शक कै. नाना जोग यांच्या स्मृतिदिनानिमित्य विदर्भ साहित्य संघातर्फे त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विदर्भ साहित्य संघातील कै. नाना जोग यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

४ मे, २००३ विदर्भ साहित्य संघ आणि बुद्धिस्ट अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने प्रेमनारायण त्रिपाठी यांना श्रद्धांजली अपर्ण करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात मदन गडकरी व संजय जीवने या वक्त्यांची भाषणे झाली.

१२ मे, २००३ उर्दू भाषेची ओळख व्हावी व त्या भाषेतील साहित्याचा आस्वाद घेता यावा यासाठी विदर्भ साहित्य संघातर्फे श्री कमर हयात यांच्या मार्गदर्शनाखाली उर्दू शिकणाऱ्यांसाठी निःशुल्क शिकवणी वर्ग सुरू झाले. या उपक्रमास उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

▶ जून २००३

१ जून, २००३ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी माईसाहेब आंबेडकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दि. १ जून रोजी विदर्भ साहित्य संघातर्फे कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या शोकसभेत डॉ. भाऊ लोखंडे हे प्रमुख वक्ते होते. तसेच डॉ. ज्योजी लांजेवार व ताराचंद्र खांडेकर या मान्यवरांनीही श्रद्धांजलीपर भाषणे केली.

▶ जुलै, २००३

राजहंस प्रकाशनाच्या 'मंथन' व्यासपीठातर्फे विदर्भ साहित्य संघाच्या सहकार्याने दि. ५ व ६ जुलै २००३ रोजी सायंटिफिक सोसायटीच्या सभागृहात 'राष्ट्रवादी आंबेडकर आणि बुद्धिवादी सावरकर' या विषयावर प्रा. शेषराव मोरे यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. मधूसूदन चान्सरकर होते.

१७ जुलै वाङ्मयाच्या क्षेत्रातील राष्ट्रीय पातळीवरील सर्वोच्च प्रतिष्ठाप्राप्त 'सरस्वती सन्मान' प्राप्त झाल्याबद्दल प्रख्यात नाटककार प्रा. महेश एलकुंचवार आणि महाराष्ट्र सरकारचा सन्मान 'महाराष्ट्र भूषण' प्राप्त झाल्याबद्दल डॉ. अभय व डॉ. सौ.

राणी बंग यांचा सत्कार विदर्भ साहित्य संघ आणि नागपूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात करण्यात आला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण सातपुतळे होते. सत्कारमूर्ती प्रा. महेश एलकुंचवार यांचा सत्कार अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष प्रा. के. ज. पुरोहित यांच्या हस्ते तसेच डॉ. अभय बंग व राणी बंग यांचा सत्कार न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला. सत्कारमूर्ती प्रा. महेश एलकुंचवार यांना सरस्वतीची चांदीची मूर्ती व मा. गांधीजींची स्वाक्षरी असलेले त्यांच्ये छायाचित्र तसेच डॉ. अभय बंग यांना चांदीची गणेश मूर्ती व डॉ. राणी बंग यांना चांदीची दुर्गेची मूर्ती व मा. गांधीजींची स्वाक्षरी असलेले त्यांचे छायाचित्र भेट म्हणून देण्यात आले.

प्रा. सुरेश द्वादशीवार, प्रा. राम शेवाळकर, माजी महापौर श्री. अटल बहादूर सिंग यांनी याप्रसंगी सत्कारमूर्तींच्या कार्याचा गौरव करणारी भाषणे केली. व्यासपीठावर नागपूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरु डॉ. मधुकर रोडे, श्री. गोविंदराव वंजारी, अमरावती विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. के. जी देशमुख ही शिक्षण क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती. या भावपूर्ण सत्कार समारंभास रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◗ ऑगस्ट, २००३

२ ऑगस्ट, २००३ विदर्भ साहित्य संघ आणि आखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद नागपूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने प्रसिद्ध कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या जन्मदिवसानिमित्य 'काव्यकन्या बहिणाबाई' हा एकपात्री प्रयोग सादर करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी होते.

२९ ऑगस्ट : विदर्भ साहित्य संघातर्फे शिकविल्या जाणाऱ्या उर्दू भाषा शिक्षण वर्गाच्या प्रथम सत्राचा प्रमाणपत्र वितरण समारंभ डॉ. सर्फुद्दिन साहिल व डॉ. विनय वाईकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला.

◗ सप्टेंबर, २००३

७ सप्टेंबर,२००३ : विदर्भ साहित्य संघ आणि कौस्तुभ प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने सौ. रेखा मोरोणे यांच्या 'सूर संगीतिकांचे' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ सर्वोदय आश्रम सभागृहात करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार

श्री. वामन तेलंग होते. पुस्तकाचे प्रकाशन प्रा. डॉ. राम शेवाळकरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. अनंत अडावदकर हे प्रमुख वक्ते होते.

१३ सप्टेंबर अज्ञात कवयित्रींच्या लोकगीतांवर आधारित 'शेवंतीचं बन' हा संगीतमय कार्यक्रम विदर्भ साहित्य संघ आणि सप्तक यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ सप्टेंबर रोजी सायंटिफिक सोसायटीच्या सभागृहात आणि स्त्रीशिक्षण प्रसारक मंडळ नागपूर यांच्या सहकार्याने शिक्षक सहकारी बँकेच्या सभागृहात महाल येथे सादर करण्यात आला. चंद्रकांत काळे निर्मित या कार्यक्रमात माधुरी पुरंदरे, प्राची दुवळे व चंद्रकांत काळे यांनी लोकगीते सादर केले. सुप्रसिद्ध कवी राजा वढे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजिलेल्या या कार्यक्रमास रसिकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

२६ सप्टेंबर प्रख्यात कथाकार प्रा. के. ज पुरोहित 'शांताराम' यांनी वयाची ८० वर्षे आणि कथा लेखनाची ६० वर्षे पूर्ण केल्या निमित्याने त्यांच्या गौरवार्थ 'शातारामांचे कथाविश्व' या विषयावर एका चर्चासत्राचे आयोजन केले गेले. या चर्चा सत्राचे उद्‌घाटन प्रा. राम. शेवाळकर यांनी केले. अध्यक्षस्थानी प्रा. सुरेश द्वादशीवार होते या चर्चासत्रात डॉ. आशा सावदेकर, डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. किशोर सानप यांनी आपले निबंध सादर केले. चर्चक म्हणून डॉ. वीणा मुळे, डॉ. छाया नाईक, डॉ. अरुणा देशमुख या सहभागी झाल्या होत्या. प्रा. के. ज. पुरोहित यांचा या प्रसंगी विशेष सत्कार करण्यात आला.

२९ सप्टेंबर विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालय समितीतर्फे प्रसिद्ध कवी बाळकृष्ण वन्नोरे यांच्या कवितांवर एका चर्चात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी होते. तसेच डॉ. रवींद्र शोभणे व डॉ. शुभांगी पातुरकर यांनी चर्चेत भाग घेतला.

◗ ऑक्टोबर, २००३

१५ ऑक्टोबर प्रख्यात समीक्षक, विचारवंत प्रा. रा. ग. जाधव यांची औरंगाबाद येथे होणाऱ्या ७७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याप्रीत्यर्थ विदर्भ साहित्य संघातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. सर्वोदय आश्रम सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सुरेश द्वादशीवार होते. प्रमुख अतिथी डॉ. राम शेवाळकर होते. तसेच वसंत आबाजी डहाके आणि डॉ. ज्योती लांजेवार या वक्त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणानंतर प्रा. जाधव यांनी सत्कारास उत्तर देतांना

कमल गेडाम, प्रा. यशोदा पाटील व डॉ. मधुमती वानखेडे ह्यांनी कथाकथन केले.

ह्या व्यतिरिक्त प्रा. सुरेश खोब्रागडे लिखित 'मी आंबेडकर बोलतोय' हा देवा वोरकर यांनी सादर केलेला एकपात्री प्रयोग, श्री रमेश थोरात यांचा 'फॉरेन रिटर्न कचऱ्या हिंदुस्तानी' हा एकपात्री प्रयोग, तसेच र. स. गिन्हेपुंजे दिग्दर्शित सावरीच्या युवा जागृती मंडळाने सादर केलेली 'दंढार' या संमेलनाची विशेष आकर्षणे ठरली.

संमेलनाचा समारोप रामटेकच्या संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पकंज चांदे ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. श्री. गोविंदराव वंजारी हे अतिथी म्हणून उपस्थित होते.

संमेलनातील सर्वच कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती.

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती -

प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही इ. ५ वी ते साहित्य पारंगत (एम. ए. समकक्ष) पर्यंतच्या परीक्षा घेण्यात आल्या.

विद्यालयीन समकक्ष परीक्षा (इ. ५ वी ते ९ वी आणि ११ वी) व महाविद्यालयीन समकक्ष परीक्षा दि. १४, १५ फेब्रुवारी २००३ रोजी घेण्यात आल्या.

विदर्भात या परीक्षांची एकूण १३५ केंद्र आहेत.

विद्यालय व महाविद्यालय या स्तरांवरील विविध समकक्ष परीक्षात एकूण १५,००० विद्यार्थी सहभागी झाले होते.

शालेय विद्यार्थ्यांसाठी इयत्ता १० वी समकक्ष साहित्य विनीत द्वितीय या परीक्षेत विदर्भातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कै. ना. कृ. दिवाणजी यांच्या नावे पुरस्कार देण्यात येतो. यंदा तो कु. अल्का अरुण लखोटे यांना प्राप्त झाला.

अभिनंदन -

सत्र डिसेंबर २००२ व फेब्रुवारी २००३ मध्ये प्रथम भाषा मराठी परीक्षेत विदर्भातून सर्वप्रथम आलेले विद्यार्थी.

अ.क्र.	परीक्षेचे नाव	विद्यार्थी / विद्यार्थिनींची नावे विद्यालय / महाविद्यालय
१.	मराठी प्राथमिक	आशीष महादेवराव नघाटे विश्वास माध्य. विद्यालय, नागपूर
२.	मराठी प्रारंभ	कु. गौरी चंद्रशेखर राऊत विद्यामंदिर हायस्कूल, कोराडी

३.	मराठी प्रारंभोत्तर	कु. हेमलता बालचंद्र झाडे बळीरामजी दखने हायस्कूल, कन्हान
४.	पूर्वविनीत	विनय विठ्ठलराव कानपूरवार शिवाजी हायस्कूल, चामोर्शी
५.	साहित्य विनीत - १	कु. आभा श्रीराम भुस्कुटे सोमलवार हायस्कूल, रामदासपेठ, नागपूर कु. नीरजा आनंद मराठे सोमलवार हायस्कूल, रामदासपेछ, नागपूर
६.	साहित्य विनीत - २	कु. अल्का अरुण लखोटे मानवता हायस्कूल, नागपूर
७.	साहित्य परिचित - १	कु. प्रतिभा मारोती विरूटकर लोकमान्य महाविद्यालय, वरोरा
८.	साहित्य परिचित - २	कु. कल्पना पंढरी गोहणे कला वाणिज्य महा., भिसी

द्वितीय भाषा मराठी परीक्षेत विदर्भातून सर्वप्रथम आलेले विद्यार्थी.

अनु.	परीक्षेचे नाव	विद्यार्थी / विद्यार्थिनींची नावे विद्यालय / महाविद्यालय
१.	मराठी प्रवेश	कु. रूही अशोक मासोदकर सोमलवार हायस्कूल, खामला, नागपूर
२.	मराठी परिचय	कु. रिद्धी सदानंद कापसे कु. रूची अशोक चौधरी टिप टॉप कॉन्व्हेंट, नागपूर कु. मयुरा बाळकृष्ण बेडेकर- ''
३.	मराठी बोध	कु. पूनम वसंत गेव्हाणी भरत इंग्लिश हायस्कूल, वर्धा
४.	मराठी प्रबोधिनी	कु. स्नेहल चंद्रकांत जरोदे भरत इंग्लिश मिडियम हाय, वर्धा
५.	मराठी प्रबोध	रोहित जयंत जोशी सोमलवार हायस्कूल, खामला, नागपूर

सत्र डिसेंबर २००२ व फेब्रुवारी २००३ मधील
सर्वाधिक परीक्षार्थी प्रचार पुरस्कार

अनु.	विद्यालयीन	विद्यार्थी संख्या	पुरस्कार	
१.	प्रथम	सोमलवार हायस्कूल, खामला, नागपूर	६६९	३०१/-
२.	द्वितीय	विद्यामंदिर हायस्कूल, कोराडी	४९४	२०१/-
३.	तृतीय	राजेंद्र हायस्कूल, नागपूर	४८०	१०१/-

अनु.		महाविद्यालयीन	विद्यार्थी संख्या	पुरस्कार
१.	प्रथम	महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर	८७१	३०१/-
२.	द्वितीय	कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर	३५९	२०१/-
३.	तृतीय	लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर	३४१	१०१/-

म. म. वा. वि. मिराशी सार्वजनिक वाचनालय / भाऊजी दफ्तरी संदर्भ ग्रंथालय :

विदर्भ साहित्य संघाच्या दोन्ही ग्रंथालयात मिळून १ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००३ पर्यंत एकूण १०८१ ग्रंथाची भर पडली. त्यातील ५० ग्रंथ नवीन विकत घेण्यात आले. त्यात संदर्भ ग्रंथ, कोश व काही नावाजलेली आत्मचरित्रे, कादंबऱ्यांची भर पडली. १० ग्रंथ युगवाणी परीक्षणार्थ प्राप्त झालेत.

जाने. २००३ ते डिसें. २००३ या कालावधीत या परीक्षांचा आणि पर्यायाने मराठीचा प्रसार आणि प्रचार व्हावा या हेतूने परीक्षा समिती सदस्यांनी प्रचार मोहीम राबवली. या अंतर्गत १५ केंद्रे पुनःस्थापित केली तर नवीन १० केंद्रे यावर्षीपासून सुरु करण्यात आली. या मोहिमेत विदर्भ साहित्य संघाचे पदाधिकारी डॉ. उत्तम रूद्रावार (पुसद) आणि डॉ. माधुरी मुनशी (खामगांव) तसेच संस्थेच्या आजीव सदस्या सौ. विद्या कावडकर (खामगांव), सौ. शीला हिरूरकर (नागपूर), डॉ. सुभाष गढीकर (कारंजा लाड) आणि प्रा. अनिल नितनवरे (साकोली) यांचे उल्लेखनीय सहकार्य लाभले.

शाखा वृत्त -

शाखा अकोला

'शव्दयोगिनी - ज्ञानतपस्विनी' हा श्रेष्ठ साहित्यकार दुर्गा भागवत आणि शांता शेळके यांच्या स्मृतींना मानवंदना देणारा कार्यक्रम दि. १६ जून रोजी झाला. वि. सा. संघाचे उपाध्यक्ष व पदसिद्ध सदस्य प्राचार्य डॉ. विट्ठल वाघ तसेच कार्याध्यक्ष प्रा. पद्मा मांडवगणे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. प्रारंभी प्रा. नारायण कुळकर्णी कवठेकर यांनी दोन्ही ज्येष्ठ - श्रेष्ठ साहित्यिकांच्या साहित्याचे नेटक्या शब्दात विवेचन केले. त्यानंतर डॉ. साधना कुळकर्णी यांनी दुर्गा भागवतांच्या ऋतुचक्रातील विविध लेखांमधील अंशांचे अभिवाचन केले. श्री. शरद पांडे व सहकारी यांनी सादर केलेली. शांता शेळकेंच्या काव्यावर आधारित गीतमैफल झाली. आश्विनी हिंगे, सायली पांडे, आनंद जहागिरदार , (तवला - विवेक देशपांडे, संवादिनी - गजानन रत्नपारखी) यांचा यात सहभाग होता. निवेदन - सीमा रोठे - शेट्ये ह्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजानन नारे यांनी तर आभार प्रदर्शन प्रशांत असनारे यांनी केले.

दर्दी रसिक श्रोत्यांच्या उपस्थितीत, मोजक्या कवींच्या काव्यप्रतिभेसह, रुढार्थाने अध्यक्ष - प्रमुख पाहुणे आदी सोपस्कारांना फाटा देत 'आल्या आषाढसरी' या एका अनौपचारिक काव्यमैफिलीचे विदर्भ साहित्य संघाच्या सदस्यांसाठी दि. १४ जुलै रोजी आयोजन करण्यात आले. यामध्ये गजानन घोंगडे, बालकवी आतिष सोसे, लक्ष्मीकांत देशपांडे, डॉ. पुष्पा गायकवाड, डॉ. ज्योती बक्षी, मिलिंद वढे, शोभना पिंपळकर, यशवंत देशमुख, अॅड. अनंद खेळकर, श्रीकांत कोरान्ने, प्रशांत असनारे आदी कवींचा सहभाग होता.

या दोन्ही कार्यक्रमाचे आयोजन अकोला न्यू इंग्लिश हायस्कूलच्या लोकमान्य टिळक सभागृहात करण्यात आले होते.

२९ मार्च २००३ रोजी दिवंगत साहित्यिक प्रा. किशोर मोरे आणि सुरेश भट यांच्या स्मृतींना उजाळा देण्याकरिता 'अभिवादन' सभेचे आयोजन करण्यात आले. स्थानिक न्यू इंग्लिश हायस्कूलच्या टिळक सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात प्रारंभी माजी प्राचार्य डॅडी देशमुख यांनी आपले स्नेही स्व. किशोर मोरे यांच्या अनेक भावपूर्ण आठवणी सांगितल्या. या आठवणींमधून मोरे सरांची शिस्तबद्धता, कल्पकता, आयोजकता, स्वभावातील जिंदादिली, विद्यार्थीप्रियता, स्वावलंबित्व, स्वाभिमानी माणूसपण पुन्हा एकवार सर्वांना जाणवले. प्रा. नारायण कुळकर्णी कवठेकर यांनी सुरेश भट यांच्या एकंदर साहित्यावर तसेच त्यांच्या कलंदर स्वभावावर प्रकाश टाकला. श्री. शरद पांडे आणि

अनुक्रमणिका

सहकाऱ्यांनी सुरेश भटांची गाणी सादर केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहसचिव श्री. विनायक क्षीरसागर यांनी तर आभारप्रदर्शन सचिव श्री. गजानन नारे यांनी केले. कार्यक्रमाला शाखा अध्यक्ष श्री. सुधाकर गणगणे, विदर्भ साहित्य संघ चे उपाध्यक्ष प्राचार्य विठ्ठल वाघ, व स्थानिक कार्यकारिणी सदस्य यांचेसह बहुसंख्येने रसिकजन, पत्रकार उपस्थित होते.

शाखा : लाखनी

लाखनी शाखेतर्फे इंदिरा बोरकर व्याख्यान मालेचे फेब्रुवारी महिन्यात आयोजन करण्यात आले. पुणे येथील सौ. सुनंदा जोशी यांनी 'राष्ट्रपुरुष राम आजच्या संदर्भात' या विषयावर विचार व्यक्त केले. पुसद येथील वत्सलाबाई नाईक महाविद्यायाचे प्राचार्य उत्तम रुद्रावार यांनी 'योगेश्वर कृष्ण आजच्या संदर्भात' या विषयावर दुसरे पुष्प गुंफले. प्राचार्य जुल्फी शेख यांनी तिसरे पुष्प गुंफतांना 'संत साहित्य आजच्या संदर्भात' या विषयाची मांडणी केली. तीन दिवस झालेल्या व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी प्रा. यशोदा पाटील होत्या. समारोप प्राचार्य श्रीमती बगमारे यांनी केला. प्रास्ताविक व परिचय द. सा. बोरकर यांनी केला. संचालन प्रा. सौ. नीलिमा कापसे यांनी केले.

१७ ऑगस्ट २००३ रोजी शाखेची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली.

२ एप्रिल २००३ रोजी शाखेचे ३३ वे कविसंमेलन झाले. अध्यक्षपद अंजनाबाई खुणे यांनी भूषविले.

याशिवाय शाखेने गणराज्यदिनी राष्ट्रभक्तिपर गीतगायन स्पर्धा, तसेच शालिनीबाई कथाकथन स्पर्धा, आयोजित केली. साने गुरूजींची ५३ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. ह. रा. मोहतुरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला.

शाखा : वरुड

दि. २९ ऑगस्ट २००३ रोजी श्री. चक्रधर स्वामी जयंती निमित्य प्रा. पुरुषोत्तम नागपुरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

दि. ७ नोव्हेंबर आणि ८ नोव्हेंबर २००३ रोजी केशवसुत स्मृतिदिनानिमित्य दोन दिवस कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दि. ७ नोव्हेंबर रोजी गुरुदेव आश्रम केंद्र येथे प्रा. सतीश तराळ यांचे व्याख्यान झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. कृष्णा चौधरी होते.

दि. ८ नोव्हेंबर रोजी प्रार्थना मंदिरात एका कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. श्रीमती श्रद्धा पराते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कविसंमेलनात विष्णु

सोळंके, विनय मिरासे, देवानंद गोरडे, डॉ. श्याम सोनारे, डॉ. माणिक भोयर, कु. सातपुते, आदि कवींनी भाग घेतला. कार्यक्रमाचे संचालन सुरेश आकोटकर यांनी केले.

दिनांक २८ नोव्हेंबर २००३ महात्मा फुले पुण्यतिथीनिमित्य प्रा. मीना टाकरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

दि. ३१ डिसेंबर २००३

डॉ. पद्‌माकर हरिदास यांच्या तीन साहित्यवृत्तींचे प्रकाशन झाले. हिंदी काव्य संग्रह पंक प्रसूत, ठूंठ के किसलय, मराठी काव्य संग्रह - तिवडीच्या फुलांची ओंजळ या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

सुप्रसिद्ध साहित्यिक माजी डीन नागपुर विद्यापीठ व भूतपूर्व संपादक (दैनिक मातृभूमी) श्री. शिवचंदजी नागर यांच्या शुभहस्ते झाले. अध्यक्षस्थानी श्री. इंद्रजित नानवाणी होते. तसेच डॉ. विमलशंकर नागर, रीडर हिंदी विभाग, डी. एस. एम. कॉलेज, मुरादाबाद विद्यापीठ यांच्या प्रमुख उपस्थित कार्यक्रम झाला.

❏❏❏

श्रद्धांजली

मराठीचे ख्यातनाम कवी सुरेश भट, बामनराव गावडे, अरुण दिवेकर, मनोहर सिंग. लालाजी गोखले, अप्पासाहेब भोसले, गोविंदभाई श्रॉफ, दिलीप कुळकर्णी, शंकरभाई भट, प्रतिभा बरुआ पांडे, मधुकर कुळकर्णी, हरिवंशराय बच्चन, बी. सी. सन्याल, यशवंत केळकर, कमर जलालाबादी, वैकुंठ दत्ताराम कुंकळीकर, रामकृष्ण, अनंत मराठे, कुसुमताई चव्हाण, गौरी देशपांडे, मनोहर गांधी, सुरेश भट, गौरीपंत शिवानी, लीलावती जोगळेकर, किशोर मोरे, वामन पात्रीकर, डी. एस. पंडितजी, माजी आमदार ताजने, प्रेम नारायण त्रिपाठी, रेवती करमरकर.

डॉ. नितू मांडके, माईसाहेब आंबेडकर, अनिल विश्वास, विश्वनाथ नरवणे, डॉ. वसंतराव वानकर, कुमार दिघे, जानकीदास, स्नेहलता दसनूकर, सुभाष मुखोपाध्याय, केतकी दास, सुहास शिरवळकर, के. भोगीरायन, भीष्म सहानी, वामनराव गड्डमकर, प्रकाश संत

अजित वाच्छानी, श्यामजी कृष्ण वर्मा, सोमशेखर, भास्करराव निनावे, म.कृ. सावंत, नियाज अहमद खान, दे. व. गोहोकर, महेश सावंत, मोरोपंत पिंगळे, मधुकर भाकरे, जी. एस. रामचंद, पांडुरंग शास्त्री आठवले, सुकेश संन्याल, हेमू अधिकारी, मधुकर गुळवणी, कोलबाजी पिंपळघरे, प्रा. रामकृष्ण मोरे, दिनकराव खडक्कार, डॉ. अरविंद वामन कुळकर्णी, ताराबाई शास्त्री, शंकुतलाबाई घनवटे, मोहन कडू यांना विनम्र श्रद्धांजली

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ
दरवर्षी देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची यादी

- ग. त्र्यं. माडखोलकर, स्मृती पुरस्कार - 'जीवनव्रती' (दर दोन वर्षांनी)
- पु. य. देशपांडे स्मृती - कादंबरी पुरस्कार
- वा. वि. मिराशी स्मृती - वैचारिक वाङ्मय पुरस्कार
- अण्णासाहे खापर्डे स्मृती - आत्मचरित्र लेखन पुरस्कार
- कुसुमानिल स्मृती - समीक्षा पुरस्कार
- शरच्चंद्र मुक्तिबोध स्मृती - कविता लेखन पुरस्कार
- य. खु. देशपांडे स्मृती - शास्त्रीय लेखन पुरस्कार
- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्मृती - चरित्र लेखन पुरस्कार
- वा. कृ चोरघडे स्मृती - कथा लेखन पुरस्कार
- संत गाडगेबाबा स्मृती - प्रवासवर्णन लेखन पुरस्कार

या व्यतिरिक्त दोन - नवोदित साहित्य लेखन पुरस्कार

- कथाकार के. ज. पुरोहित 'शांताराम' पुरस्कृत कथा पुरस्कार
- स्व. हरिकिशन अग्रवाल स्मृती पत्रकारिती पुरस्कार
- व. कृ. वऱ्हाडपांडे स्मृती विशेष पुरस्कार
- डॉ. शकुंतला खोत पुरस्कृत - नाट्य एकांकिका लेखन पुरस्कार
- पां. व. गाडगीळ 'युगवाणी' लेखन पुरस्कार
- ल. दे. जोशी शालेय निबंध लेखन स्पर्धा पुरस्कार

विदर्भ साहित्य संघ
वर्षभरात आयोजित करण्यात येणाऱ्या व्याख्यानमाला

१) कै. ना. के. बेहरे - व्याख्यानमाला
२) कै. ग. त्र्यं. माडखोलकर - व्याख्यानमाला
३) कै. शिवदास कृष्ण वारलिंगे - व्याख्यानमाला
४) कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर - व्याख्यानमाला
५) श्री. गणेश व्याख्यानमाला - व्याख्यानमाला
६) कै. ए. श्री. पटवर्धन - व्याख्यानमाला
७) कै. दत्तो वामन पोतदार - व्याख्यानमाला
८) कै. एस. एम. जोशी - व्याख्यानमाला
९) कै. 'राजावढे' स्मृती काव्यविषयक उपक्रम
१०) 'कै. वसुमती-वसंत वऱ्हाडपांडे' - व्याख्यानमाला

विदर्भ साहित्य संघ विद्यमान कार्यकारिणी

१) प्रा. सुरेश द्वादशीवार, अध्यक्ष,
'अंभर्डेकर संकुल' १ ला माळा,
जे. पी. चेंबर्स मागे, माधवनगर,
नागपूर - ४४००१०

२) श्री. मनोहर म्हैसाळकर, कार्याध्यक्ष,
एस. एच. ४०१, शेवाळकर इस्टेट,
डागा लेआऊट, उत्तरअंबाझरी मार्ग,
नागपूर - ४४००१०

३) डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, उपाध्यक्ष,
'कृष्णकुंज' खरे टाऊन, धरमपेठ,
नागपूर - ४४००१०

४) डॉ. विठ्ठल वाघ, उपाध्यक्ष,
२, 'गुलवास', सुधीर कॉलनी,
अकोला,

५) सौ. शोभा उवगडे, सरचिटणीस,
२१९, 'अरूणशोभा' धरमपेठ, खरे
टाऊन, नागपूर - ४४००१०

६) श्री. सुरेश शेन्द्रे, कोषाध्यक्ष,
१० जिजामाता अपार्टमेंट,
प्लॉट नं. ७, धंतोली. नागपूर - १२

७) श्री. नरेश सब्जीवाले,
कार्यालय चिटणीस,
३६ ब, पांडे लेआऊट,
खामला रोड, नागपूर - ४४००२५

८) श्री. वामन तेलंग.
१/३, पत्रकार कॉलनी, वसंतनगर,
नागपूर - ४४००२२

९) डॉ. भ. ल. भोळे,
१६ / बी, विद्याविहार कॉलनी,
राणाप्रताप नगर,
नागपूर - ४४००२२

१०) श्री. प्रकाश एदलावादकर,
१२, रामजीवन चौधरी अपार्टमेंट,
क्रिडा चौक, हनुमाननगर,
नागपूर - ४४०००९

११) डॉ. सुलभा हेर्लेकर,
'विष्णु सदन', अभ्यंकर रोड,
धंतोली, नागपूर - ४४००१२

१२) डॉ. शुभदा फडणवीस,
अ / ३०२, 'उज्वल निलायम'
खामला, नागपूर - ४४००२५

१३) सौ. संयोगिता धनवटे,
प्लॉट नं. ६१/६२, 'राजमाची'
फार्म लॅन्ड, रामदासपेठ,
नागपूर - ४४००१०

१४) डॉ. ईश्वर नंदपुरे,
'प्रज्ञास्पर्श' ३८, शास्त्री लेआऊट,
सुभाषनगर, नागपूर - ४४००२२

१५) प्रा. सीमा रोठे, शास्त्रीनगर,
आकाशवाणी मागे, अकोला,

१६) श्री. मोहन बालाजी देशपांडे,
रंजीतप्रेसजवळ, कनारटोळी,
गोंदिया

अनुक्रमणिका

१७) श्री. ह. गो. पिंपळगावकर,
भाजीबाजार, अमरावती

१८) प्रा. सदानंद देशमुख,
मु. पो. जानेफळ, ता. मेहकर,
जि. बुलढाणा

१९) प्रा. सतीश तराळ,
सदानंद कॉलनी,
ता. दर्यापूर, जि. अमरावती

२०) डॉ. उत्तम रूद्रवार,
'शब्दश्री',
मोतीनगर, पुसद जि. यवतमाळ

२१) प्रा. जयंत मादुस्कर,
श्रीनिवास कॉलनी, रामनगर, वर्धा,

२२) श्री. गो. ना. मादुस्कर,
'आल्हादनिवास',
मु. पो. गडचिरोली

२३) प्रा. राजन जयस्वाल,
मु. पो. नागभिड,
त. नागभिड,
जि. चंद्रपूर

२४) प्रा. द. सा. बोरकर,
'मुक्ताभवन' समर्थ नगर,
मु. पो. लाखनी, त. लाखनी,
जि. भंडारा

२५) प्रा. माधुरी मुन्शी,
अग्रवाल कॉलनी,
खामगांव

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ : विक्रीस तयार असलेली प्रकाशने

१)	प्रयोगक्षम मराठी नाटके : डॉ. मु. श्री. कानडे	रु. ६ /-
२)	मराठी वर्णोच्चार विकास : डॉ. द. ह. अग्निहोत्री	रु. ३० /-
३)	''प्रातिभ'' लघुकथा संग्रह (१९८०)	रु. २० /-
४)	समग्र वजावा	रु. २० /-
५)	ज. के. उपाध्ये यांची १८८३ - १९१३ कविता संपादन - आशा सावदेकर	रु. ३० /-
६)	दक्षिणेतील दोन आचार्य : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	रु. ५ /-
७)	युगवाणी साहित्य सूची (संपादन : केशव जोशी)	रु. ७० /-
८)	कविता विदर्भाची : डॉ. सौ. आशा सावदेकर	रु. ५० /-
९)	वसंत वैभव डॉ. सौ. कुंदा केळापुरे / डॉ. मदन कुळकर्णी	रु. ८० /-
१०)	धन्यतेची थाप : डॉ. वि. भि. कोलते	रु. १०० /-
११)	वक्ता दशसहस्त्रेषु (प्रा. राम शेवाळकर) संपादक डॉ. वि. स. जोग	रु. १२५ /-
१२)	अध्यक्षीय भाषणे, खंड २ संपादक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी (विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनाध्यक्षांच्या भाषणांचे संकलन)	रु. २५० /-
१३)	अध्यक्षीय भाषणेः संपादक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी (विदर्भ साहित्य संघाच्या विविध प्रवाही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांचे संकलन)	रु. २०० /-
१४)	युगवाणी साहित्य सूची, खंड २ (संपादन : केशव जोशी)	रु. ५० /-
१५)	वैदर्भीय मराठी प्रबंध सूची (१९३९ - ९८) संपादक डॉ. व. वि. कुलकर्णी	रु. १०० /-
१६)	विदर्भ साहित्य संघ - अमृत महोत्सवी स्मरणिका - १९९९	रु. २०० /-
१७)	सांजदिव्याचे हंवर - शिवा राऊत (निवडक कविता) संकलन / संपादन डॉ. आशा सावदेकर, वामन तेलंग	रु. ६० /-

पत्रव्यवहाराचा पत्ता

विदर्भ साहित्य संघ

सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, सीतावर्डी, नागपूर : ४४००१२,
दूरभाष : २५२३९२९

युगवाणी जाने. / डिसें २००३

मूल्य २५ /- रु.

अनुक्रमणिका